७० वर्ष

दैनिक **संध्या**

नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

बुधवार, दि. २१ जानेवारी २०२६

www.dainikesandhya.com | www.youtube.com/@sandhyalivenews

संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : ०२८ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रूपये

## मेडिकल ॲडमिशनच्या नावाखाली कोट्यवधींची फसवणूक

केज (दै. संध्या) : मेडिकल शिक्षणातील प्रवेश मिळवून देण्याच्या नावाखाली विद्यार्थ्यांशी व पालकांशी ओळख वाढवून लाखो-कोट्यवधी रुपयांची फसवणूक केल्याचा आरोप सौरभ कुलकर्णी याच्यावर करण्यात आला आहे. बीएएमएसच्या प्रवेशासाठी गेलेल्या एका विद्यार्थ्याला एमबीबीएसला प्रवेश मिळवून देण्याचे आमिष दाखवून त्याच्याकडून १० लाख १० हजार रुपयांची रक्कम उकळल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. तक्रारीनुसार, सौरभ कुलकर्णी हा वैद्यकीय पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी मॅनेजमेंट कोट्यातून प्रवेश मिळवून देण्याचे आश्वासन देत महाराष्ट्रासह इतर राज्यांतील विद्यार्थ्यांची फसवणूक करत असल्याचे समोर आले आहे. अशाच एका प्रकरणात १३ जानेवारी २०२६ रोजी बीड जिल्ह्यातील धारूर तालुक्यातील डॉ. तोंडे यांची फसवणूक करून ८ लाख रुपये उकळल्याप्रकरणी केज उपविभागाचे सहाय्यक पोलीस अधीक्षक व्यंकटराम यांच्या पथकाने सौरभ कुलकर्णी याला कराड येथून अटक केली.

### ढिंग-टांग




# भाजप नेत्यांकडून शिंदेसेनेची वरिष्ठांकडे तक्रार

## शिवसेनेचे राहुल शेवाळे दिल्ली दरबारी, मुंबई महापौरपदाबाबत वाटाघाटींना वेग

**मुंबई (दै. संध्या)**

महानगरपालिकेच्या निकालाने भाजपला सर्वात मोठा पक्ष बनवले असले, तरी महायुतीमधील अंतर्गत कलह आता चव्हाट्यावर आला आहे. "उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेमुळे मुंबईत भाजपचे नुकसान झाले असून, त्यांच्या खराब स्ट्राईक रेटचा परिणाम युतीच्या जागांवर झाला," अशी तक्रार राज्यातील भाजप नेत्यांनी केंद्रीय नेतृत्वाकडे केली आहे. दुसरीकडे, महापालिकेच्या रणनितीसाठी शिवसेनेकडून राहुल शेवाळे दिल्लीत पोहोचल्याची माहिती समोर आली आहे. दिल्लीत शेवाळे यांची भाजप नेत्यांसोबत बैठक होणार आहे.

राज्यातील भाजप नेत्यांच्या मते, मुंबईत शिंदेंच्या शिवसेनेची कामगिरी निराशाजनक राहिली आहे. एकनाथ शिंदे यांनी हट्टाने जास्त जागा लढवल्या, पण त्या प्रमाणात यश मिळवता आले नाही.



जर भाजपने या जागा लढवल्या असत्या, तर स्वबळावर १०० हून अधिक जागा जिंकता आल्या असत्या, अशी भूमिका या नेत्यांनी दिल्लीत मांडली आहे. मुंबईत भाजपचा स्ट्राईक रेट सर्वाधिक असून त्याखालोखाल उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेचा क्रमांक लागतो, तर अजित पवार गटाचा स्ट्राईक रेट सर्वात कमी राहिला आहे.

दुसरीकडे, मुंबई महापालिकेचा निकाल लागल्यापासून फोडाफोडीच्या भीतीने शिंदे गटाने आपल्या २९ नगरसेवकांना मुंबईतील एका आलिशान हॉटेलमध्ये ठेवले आहे.

भाजप नेत्यांनी शिंदेंच्या या 'हॉटेल पॉलिटिक्स'वरही तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. दरम्यान, या राजकीय पेचातून मार्ग काढण्यासाठी आणि सत्तेचा वाटा ठरवण्यासाठी शिवसेना शिंदे गटाचे खासदार राहुल शेवाळे दिल्लीत पोहोचले आहेत.

तिथे भाजपच्या वरिष्ठ नेत्यांसोबत होणाऱ्या बैठकीत महापौरपद आणि पालिकेच्या तिजोरीच्या चाव्या मानल्या जाणाऱ्या 'स्थायी समिती'वर चर्चा होण्याची दाट शक्यता आहे.

राजकीय वर्तुळात अशी चर्चा आहे की, महापौरपदाचा हट्ट कायम ठेवून शिंदे गट भाजपवर दबाव निर्माण करत आहे. जर महापौरपद मिळाले नाही, तर किमान स्थायी समिती, सुधार, शिक्षण, बेस्ट आणि आरोग्य यांसारख्या महत्त्वाच्या समित्यांवर आपले वर्चस्व असावे, असा शिंदे गटाचा प्रयत्न आहे. सत्तेच्या वाटाघाटीत आक्रमक भूमिका घेणारे एकनाथ शिंदे सहजासहजी माघार घेत नाहीत, याचा भाजपला यापूर्वीचाही अनुभव आहे. त्यामुळे सुरुवातीला मोठी मागणी करायची आणि नंतर सोयीची तडजोड करून आर्थिक सूत्रे असलेल्या समित्या पदरात पाडून घ्यायची, अशी रणनीती शिंदे गट वापरण्याची चिन्हे आहेत.

### मुंबई महापौरपदासाठी भाजप पक्षश्रेष्ठी आग्रही

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीत ऐतिहासिक यश मिळवून मुंबई काबीज केल्यानंतर आता महापौरपदावरून महायुतीमध्ये पेच निर्माण झाला आहे. ८९ जागांसह सर्वात मोठा पक्ष ठरलेल्या भाजपने आपलाच महापौर बसवण्याचा निर्धार केला असला, तरी बहुमताच्या ११४ या आकड्यासाठी त्यांना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेच्या २९ नगरसेवकांवर अवलंबून राहावे लागणार आहे. याच पार्श्वभूमीवर, 'मुंबईच्या महापौरपदाबाबत कोणतीही तडजोड करू नका', असा कडक आणि स्पष्ट संदेश दिल्लीतील भाजप पक्षश्रेष्ठींनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिला आहे.

### ब्रेकिंग न्यूज

## सुप्रीम कोर्टाने मेनका गांधींना झापले

नवी दिल्ली (दै. संध्या) : "अजमल कसाबने देखील न्यायालयाचा अवमान केला नव्हता, मात्र तुमच्या अशिलाने तो केला आहे," अशा कडक शब्दांत भटक्या कुत्र्यांच्या प्रश्नावर सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशावर टीका केल्या प्रकरणी माजी केंद्रीय मंत्री आणि प्राणी हक्क कार्यकर्त्या मनेका गांधी यांना सर्वोच्च न्यायालयाने आज (दि. 20) झापले. तसेच न्यायालयाने त्यांच्याविरोधात अवमानेची कारवाई सुरू केली नसली तरी, त्यांच्या विधानांबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली. न्यायमूर्ती विक्रम नाथ, न्यायमूर्ती संदीप मेहता आणि न्यायमूर्ती एन.व्ही. अंजारिया यांच्या खंडपीठासमोर या प्रकरणाची सुनावणी झाली. मनेका गांधी यांनी एका पॉडकास्टमध्ये न्यायालयाच्या भूमिकेवर कडाडून टीका केली होती. यावर भाष्य करताना न्यायालयाने म्हटले की, "गांधी यांनी कोणताही विचार न करता सर्व प्रकारच्या कमेंट्स केल्या आहेत. त्यांचे बोलणे आणि त्यांची देहबोली अत्यंत आक्षेपार्ह आहे."

## २६/११ सारख्या हल्ल्याची तयारी?

नवी दिल्ली (दै. संध्या) : भारताविरोधात पुन्हा एक मोठा दहशतवादी कट रचला जात असल्याचा दावा केला जात आहे. पाकिस्तानमध्ये सक्रिय असलेली दहशतवादी संघटना लष्कर-ए-तैयबा कडून 26/11सारखा हल्ला करण्याची तयारी सुरू असल्याचे संकेत काही व्हिडीओ आणि पुराव्यांमधून मिळत आहेत. सोशल मीडियावर व्हायरल होत असलेल्या एका व्हिडीओमध्ये लष्कर-ए-तैयबाची सहयोगी संघटना म्हणून ओळखल्या जाणाऱ्या PMMLचा नेता हारिस डार प्रशिक्षणाचा आढावा घेताना दिसत असल्याचा दावा केला जात आहे. इतकंच नाही, तर सोशल मीडिया ऑपरेशन्सचेही प्रशिक्षण दिले जात असल्याचा दावा करण्यात आला आहे. सुरक्षा तज्ज्ञांच्या मते, अशा प्रकारचे प्रशिक्षण म्हणजे समुद्री मार्गाने भारतावर हल्ला करण्याचा कट आहे. व्हिडीओमध्ये लष्करचा एक कमांडर उघडपणे कबूल करत आहे की "लष्करची 'वॉटर फोर्स' तयार केली जात आहे." कमांडरच्या म्हणण्यानुसार, PMML आणि लष्करमध्ये तीन भागांत कार्यक्रम घेण्यात आले आणि 135 तरुणांना बोट चालवणे व समुद्री ऑपरेशन्सचे प्रशिक्षण देण्यात आले.

## भाजपच्या बालेकिल्ल्यात भूकंप?

**नागपूर (दै. संध्या)**

राज्यातील महानगरपालिका निवडणुकांचे निकाल जाहीर झाल्यानंतर महायुतीसाठी एकीकडे आनंदाची लाट असताना, दुसरीकडे एका मोठ्या महानगरपालिकेत सत्तेला हादरा बसण्याची शक्यता निर्माण झाली आहे. मुंबईसह अनेक महापालिकांवर भाजपच्या नेतृत्वाखालील महायुतीने सत्ता स्थापन केली असली, तरी नागपूर महानगरपालिकेत निवडून आलेल्या 40 नगरसेवकांचे भवितव्य धोक्यात आले आहे. पुढील 48 तासांत या नगरसेवकांचे सदस्यत्व रद्द होण्याची शक्यता असून, तसे झाल्यास नागपूर मनपात पुन्हा पोटनिवडणुकांचा सामना करावा लागू शकतो. नागपूर महानगरपालिकेसाठी 15 जानेवारी रोजी मतदान प्रक्रिया पार



- नागपुरात ४० नगरसेवक अपात्र ठरण्याची शक्यता : ४८ तासांत राजकीय भूकंपाची शक्यता

पडली होती, तर 16 जानेवारीला निकाल जाहीर झाला. एकूण 151 जागांसाठी झालेल्या या निवडणुकीत भाजपने मोठे यश मिळवत 102 जागांवर विजय मिळवला आणि सर्वात मोठा पक्ष ठरला. काँग्रेसने 35 जागा जिंकत दुसरा क्रमांक मिळवला, तर एमआयएमने 6, मुस्लीम लीगने 4, ठाकरे गटाने 2 जागा जिंकल्या.

## अहिल्यादेवींची प्रतिमा तोडून हिंदूंचा अपमान : नाना पटोले

**नागपूर (दै. संध्या)**

- मुंबईला केंद्रशासित करण्याचा सरकारचा डाव असल्याचा केला दावा

काँग्रेस नेते नाना पटोले यांनी पत्रकार परिषद घेत महापालिका निवडणुकीच्या निकालांवर भाष्य करत सरकारवर टीका केली. तसेच आगामी जिल्हा परिषदेच्या निवडणुका बॅलेट पेपेरवर घेण्यात यावी अशी मागणी त्यांनी राज्य निवडणूक आयोगाकडे केली आहे. तसेच मुंबईला महाराष्ट्रापासून तोडण्याचे काम सरकारकडून सुरू झाले असून उद्या मुंबई केंद्रशासित झाली तर त्यात नावीन्य वाटायला नको, असा गंभीर आरोपही पटोले यांनी केला आहे. तसेच अहिल्याबाई होळकरांची प्रतिमा तोडून भारतातील हिंदूंचा अपमान करण्याचे



काम या मोदी सरकारने केले असल्याची टीका नाना पटोले यांनी केली आहे.

नाना पटोले म्हणाले, देशात हिंदू खतरेमध्ये आहेत असे वल्गना करणाऱ्या या ज्या हिंदुत्ववादी संघटना आहेत, त्यांना आम्ही काय बोलावे, पण या ठिकाणी पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकरांच्या प्रतिमेला तोडून महाराष्ट्राचाच नव्हे, महाराष्ट्रातील धनगर समाजाचाच नव्हे, तर संपूर्ण भारत देशातल्या हिंदूंचा अपमान करण्याचे पाप या मोदी आणि योगी सरकारने केले आहे. ही आमची भूमिका आहे. महानगरपालिकेच्या निवडणुकीवर भाष्य करताना नाना पटोले म्हणाले, मतदार यादीत घोळ झाला होता आणि म्हणून आम्ही निवडणूक आयोगाला सांगितले होते की मतदार याद्या पारदर्शक करावी, जी शाई लावण्यात आली ती कशी पुसली जाते ते तुमच्या माध्यमातून पाहिले आणि दुसरे महत्त्वाचे म्हणजे ईव्हीएमवर आता लोकांचा विश्वास राहिलेला नाही. त्यामुळे मतदान करायला जायचेच कशाला, हा जो अविश्वास मतदान प्रक्रियेवर झाला आहे त्यामुळे अनेक राज्यांमध्ये बॅलेटवर निवडणुका घेण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. त्यामुळे आता जिल्हा परिषदेच्या निवडणुका ज्या आहेत, त्या निवडणुका बॅलेटवर घेण्यात याव्यात, अशी मागणी आम्ही निवडणूक आयोगाकडे आणि राज्य सरकारकडे केली आहे.

## भाजप कार्यकर्त्यांचा 'युती तोडा'चा नारा!

- संभाजीनगरमध्ये भाजप-सेना युतीची घोषणा होताच राडा
- मंत्री अतुल सावेंची गाडी अडवली

**छ. संभाजीनगर (दै. संध्या)**

छत्रपती संभाजीनगरमध्ये आगामी जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर 'कीज हॉटेल' येथे भाजप आणि शिवसेनेच्या नेत्यांची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली असून, या बैठकीनंतर महायुतीची अधिकृत घोषणा करण्यात आली आहे. यापूर्वी महानगरपालिका निवडणुकीत तब्बल 12 बैठका होऊनही शेवटच्या क्षणी युती तुटली होती, ज्यामध्ये भाजपने मोठे यश मिळवले होते मात्र शिवसेनेला अपेक्षित यश मिळाले नव्हते. आता पुन्हा एकदा दोन्ही पक्षांनी एकत्रित निवडणुका लढवण्याचा निर्णय घेतला असला, तरी या घोषणेनंतर भाजप कार्यकर्त्यांनी आक्रमक पवित्रा घेतल्याचे पाहायला मिळत असून, मागील कटू अनुभवांच्या पार्श्वभूमीवर या नव्या युतीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.



भाजप नेते व मंत्री अतुल सावे, खासदार भागवत कराड, आमदार संजय केनेकर आणि शिवसेनेचे पालकमंत्री संजय शिरसाठ, खासदार संदिपान भुमरे, आमदार रमेश बोरणारे, आमदार संजना जाधव यांच्या उपस्थितीत पार पडलेल्या बैठकीत महायुतीची अधिकृत घोषणा करण्यात आली. मात्र या निर्णयामुळे वैजापूरमधील भाजप कार्यकर्त्यांमध्ये तीव्र असंतोष पसरला आहे. युतीला कडाडून विरोध करत या कार्यकर्त्यांनी 'युती तोडा' अशी मागणी लावून धरली आणि थेट मंत्री अतुल सावे यांच्या गाडीला घेराव घालत जोरदार घोषणाबाजी केली. जिल्ह्याच्या राजकारणात वरिष्ठ पातळीवर युती निश्चित झाली असली, तरी स्थानिक कार्यकर्त्यांच्या या आक्रमक पवित्र्यामुळे महायुतीसमोर मोठे आव्हान उभे ठाकले आहे. भाजप नेते अतुल सावे आणि शिवसेनेचे संजय शिरसाट यांनी संयुक्त पत्रकार परिषद घेत जिल्हा परिषद निवडणुकीसाठी महायुतीची अधिकृत घोषणा केली. या जागावाटपानुसार भाजपला 27 तर शिवसेनेला 25 जागा मिळाल्या आहेत. मात्र, ही जागावाटपाची चर्चा अत्यंत तणावपूर्ण वातावरणात पार पडली. बैठकीत जागांच्या मुद्द्यावरून मतभेद झाल्याने संजय शिरसाट संतापून बाहेर आले होते, परंतु शिवसेनेचे ज्येष्ठ नेते संदीपान भुमरे यांनी त्यांची समजूत काढून त्यांना पुन्हा चर्चेसाठी प्रवृत्त केल्याची माहिती समोर आली आहे.

## महापौर काँग्रेसचा होणार असल्याचा वडेट्टीवार यांचा दावा

**चंद्रपूर (दै. संध्या)**

चंद्रपूर महापालिकेत काँग्रेसची सत्ता येणार असून त्यासाठीचे आवश्यक संख्याबळ जमवल्याचे काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी आज स्पष्ट केले. काँग्रेसचे नगरसेवक भाजपच्या संपर्कात ही भाजप नेत्यांची विधान म्हणजे हवेतील पतंगबाजी असल्याचा टोला विजय वडेट्टीवार यांनी लगावला. काँग्रेस पक्षाचा नेता म्हणून चंद्रपुरात काँग्रेसची सत्ता स्थापन करणे आणि तिथला महापौर बसवणे ही आमची प्राथमिकता आहे, त्यासाठी आवश्यक संख्याबळ मिळवल्याचे काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी सांगितले. चंद्रपुरात कुणालाही तोडफोड करणे, नगरसेवक पळवणे यासाठी स्कोप नाही.



त्यामुळे कोणी काहीही विधान केले तरी काँग्रेसचाच महापौर होणार असे सांगत वडेट्टीवार यांनी भाजपच्या दाव्यातील हवा काढली. भाजपचे नगरसेवक काँग्रेसच्याही संपर्कात असल्याचे संकेत वडेट्टीवार यांनी यावेळी दिले. चंद्रपुरात जनतेने काँग्रेसला कौल दिला असल्याने तिथे जनतेला अपेक्षित असा काँग्रेसचा महापौर होणार असे वडेट्टीवार म्हणाले.

# बजाज पुणे ग्रँड टूरच्या माध्यमातून पुणेकरांनी अनुभवला वेगवान थरार

### स्पर्धेमुळे पुण्याचे सौंदर्य अधिक खुलले, नामवंत खेळाडूंचे कौशल्य प्रत्यक्ष पाहण्याची संधी

**पुणे (दै. संध्या)**

- स्पर्धेच्या माध्यमातून 'सायकल चालवा, आजाराला पळवा'चा संदेश

बजाज पुणे ग्रँड टूर अंतर्गत आज पहिल्या टप्प्याची सुरुवात टी.सी.एस. सर्कल, हिंजेवडी येथून उत्साहात झाली. आंतरराष्ट्रीय दर्जाच्या या सायकल स्पर्धेला अबालवृद्ध पुणेकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. भारतीय म्हणून अभिमान बाळगत नागरिकांनी रस्त्यांच्या दुतर्फा उभे राहून सायकलपटूंना प्रोत्साहन दिले.

यावेळी नागरिकांनी नामवंत सायकलपटूंची तंदुरुस्ती, शिस्तबद्ध तयारी आणि धावत्या सायकलींचा वेगवान थरार अनुभवला. आंतरराष्ट्रीय सायकल स्पर्धेचे प्रथमच होणारे आयोजन आणि त्यातून दिला जाणारा पर्यावरण रक्षण व आरोग्याचा संदेश नागरिकांना आवडल्याचे त्यांच्या प्रतिक्रीयेवरून दिसून आले. तरुणाईला स्पर्धेमुळे मिळत असलेली प्रेरणाही त्यांच्या प्रतिसादातून आणि बोलण्यातून व्यक्त झाली.

स्पर्धेच्या यशस्वी आयोजनाबद्दल नागरिकांनी जिल्हा प्रशासनाच्या नियोजनाचे कौतुक केले. फैजान अन्सारी (मुंबई) म्हणाले, "मी भारतीय म्हणून मुंबईहून पुण्यात आलो आहे. ही स्पर्धा पाहण्यासोबतच खेळाडूंचे मनोबल वाढविणे हा उद्देश आहे. आजच्या तरुण पिढीने निरोगी आयुष्यासाठी सायकलचा अधिकाधिक वापर करणे आवश्यक आहे."

साक्षात छत्रपती शिवाजी महाराज या मातीच्या कणकणात असल्याची



अनुभूती इथे आल्यावर होत असल्याचे राजस्थानच्या संतोष वर्मा यांनी पुण्याच्या ऐतिहासिक वारशाचा उल्लेख करत सांगितले. ते म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या या नगरीत बजाज पुणे ग्रँड टूरचे आयोजन झाले आहे. स्पर्धेच्या मार्गामध्ये महाराजांच्या गडकिल्ल्यांचा समावेश केल्याने त्यांचा ऐतिहासिक वारसा अनुभवता येणार आहे.

स्पर्धेच्या अनुषंगाने करण्यात आलेली रंगरंगोटी, स्वच्छ व सुस्थितीत असलेले रस्ते यामुळे हिंजेवडीसह पुणे परिसराचे सौंदर्य अधिक खुलले आहे. सदृढ समाजनिर्मितीसाठी अशा सायकल स्पर्धांचे आयोजन अत्यंत महत्त्वाचे असल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली.

हिंजेवडी ग्रामपंचायतीच्यावतीने या स्पर्धेची माहिती देण्यात आली. त्यामुळे शिक्षक व विद्यार्थ्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर उत्सुकता निर्माण झाली. जगभरातील तंदुरुस्त खेळाडू प्रत्यक्ष पाहण्याची संधी विद्यार्थ्यांना मिळाली. त्यांच्यापासून प्रेरणा घेऊन भविष्यात उत्तम खेळाडू घडविण्याचे प्रयत्न केले जातील असा विश्वास व्यक्त करून स्थानिक शिक्षिका अश्विनी पवार यांनी अशा आंतरराष्ट्रीय स्पर्धांचे आयोजन पुढेही व्हावे अशी अपेक्षा व्यक्त केली.

रमेश मधुरे (माजी सैनिक) यांनी बजाज पुणे ग्रँड टूरचे आयोजन हे पुण्यासाठी अभिमानास्पद असल्याचे सांगितले. नामवंत खेळाडूंचे कौशल्य पाहण्याची तसेच स्थानिक सायकलपटूंना प्रेरणा मिळण्याची ही मोठी संधी असल्याचे नमूद करून निरोगी जीवनासाठी सायकलचा वापर ही काळाची गरज असल्याचे ते म्हणाले.

# संपादकीय

## दावोसचा संदेश

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सध्या दावोसला गेलेत. तेथे ते जागतिक आर्थिक मंचाच्या बैठकीस हजर राहणार. मुख्यमंत्री फडणवीस यांनी १६ लाख कोटींचे करार करण्याचे उद्दिष्ट ठेवले. सरकारने फडणवीस यांच्या नेतृत्वाचा उपयोग देशात गुंतवणूक आणण्यासाठी करण्याचा प्रयत्न केला आहे. गेल्या वर्षी मुख्यमंत्री दावोसला उपस्थित राहिले होते तेव्हा आदित्य ठाकरे यांनी मुख्यमंत्र्यांवर टीका केली होती, की ही गुंतवणूक देशी कंपन्यांचीच आहे. केवळ ११ कंपन्या परदेशी आहेत. पण या राजकीय आरोप-प्रत्यारोपांना बाजूला ठेवले तरीही एक बाब लक्षात येते ती ही, की मुख्यमंत्री फडणवीस यांनी प्रचंड गुंतवणूक आणली आहे आणि त्याचा उपयोग भारतातील बेरोजगारी दूर हटवण्यासाठी करण्यात येईल. गेल्या वर्षी १६ लाख कोटी रुपयांचे एमओयू करण्यात आले होते. त्यापैकी प्रत्यक्षात ७२ टक्के अमलात आले आहेत. यंदाही मोठ्या प्रमाणात महाराष्ट्रात गुंतवणूक आणण्यावर भर राहणार असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले. यंदा अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प हेही जागतिक आर्थिक मंचाचे आकर्षण असणार आहेत. कारण त्यांच्यासमवेत शिष्टमंडळ हे सर्वात मोठे असेल असे सांगण्यात येते. पण ट्रम्प यांनी अनेक देशांना टॅरिफ लावून जेरीस आणले आहे आणि त्यामुळे त्यांच्या वाटाघाटीत काय होते हे महत्त्वाचे आहे. पण विषय आपला महाराष्ट्राचा चालला आहे, तर फडणवीस सांगतात की यंदा गतवर्षीपेक्षाही जास्त गुंतवणूक आणणार आहे ते विशेष महत्त्वाचे आहे. मुळात दावोस गुंतवणूक ही जागतिक अर्थव्यवस्थेवर मोठा परिणाम करते. जिथे देश आणि राज्ये, जसे की महाराष्ट्र किंवा मध्य प्रदेश राज्यातून जागतिक कंपन्यांना आकर्षित करण्यासाठी प्रचंड प्रयत्न होतात. त्यामुळे रोजगार निर्मिती, तंत्रज्ञान हस्तांतरण आणि शाश्वत विकासाला चालना मिळते. भू-राजकीय तणाव आणि आर्थिक अनिश्चिततेच्या पार्श्वभूमीवर भारत हे एक प्रमुख गुंतवणूक ठिकाण म्हणून उदयास येत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी नेहमी सांगतात, की भारत हे गुतवणूकदारांचे अत्यंत आकर्षक आणि विश्वासाचे ठिकाण म्हणून सध्या उदयाला आले आहे. त्याचाच परिणाम म्हणजे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा हा दावोस दौरा आहे. कॅनडा आणि मेक्सिकोपाठोपाठ अमेरिकेने भारतावरही टॅरिफ लावण्याचा आणि तोही भरमसाट टॅरिफ लावण्याचा निर्णय ट्रम्प यांनी घेतल्याच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री फडणवीस यांच्या दौऱ्याला विशेष महत्त्व आहे. कारण मुख्यमंत्री फडणवीस यांनी दावोस येथून जी गुंतवणूक आणतील त्यातून येथे रोजगार निर्माण होतील आणि त्याचा परिणाम येथील तरुणांना रोजगारांचा लाभ देण्यात होईल. त्याचबरोबर महाराष्ट्र हे प्रगत राज्य आहे आणि त्याचे पडसाद राज्याच्या औद्योगिक वाटचालीत दिसून येतात. मुख्यमंत्र्यांचा दावोस दौरा हे त्याचेच फल आहे. मुख्यमंत्र्यांच्या या दावोस दौऱ्याने स्टील म्हणजे पोलाद, केमिकल्स आणि सिमेंट बॅटरी या उद्योगात मोठी गुंतवणूक होईल. मुख्यमंत्री फडणवीस यांच्याच काळात महाराष्ट्र पाचव्या क्रमांकावरून पहिल्या क्रमांकावर आला आणि त्याचे एकमेव कारण होते ते औद्योगिक गुंतवणूक. राज्याची अर्थव्यवस्था एक लाख कोटी डॉलर्सवर नेण्यासाठी राज्यात प्रचंड गुंतवणूक येण्याची गरज आहे आणि ती मुख्यमंत्री फडणवीसच आणू शकतात, असा विश्वास सर्वांनाच आहे. गेल्या काही वर्षांत भारतातील काही औद्यागिक राज्यांच्या सरकारांनी उदा. महाराष्ट्र, आसाम यांनी उच्चाधिकार शिष्टमंडळे दावोसला पाठवली आहेत. त्यात संबंधित राज्यांचे मुख्यमंत्रीही आहेत आणि हाच पॅटर्न यंदाही अमलात आणला आहे. ज्या क्षेत्रात गुंतवणूक केली जाणार आहे, ती क्षेत्रे आहेत स्वच्छ ऊर्जा, सागरी अन्नाची निर्यात आणि तत्सम क्षेत्रे. स्विस कंपन्यांना आपल्याकडे आकर्षित करून घेण्यात मुख्यमंत्री यशस्वी होतील यात काही शंका नाही. महाराष्ट्राची स्पर्धा ही आसाम आणि मध्य प्रदेश या अन्य राज्यांशी असली तरीही त्यात विखार नाही. केवळ आपल्या राज्यासाठी जास्तीत जास्त गुंतवणूक आणणे आणि आपल्या लोकांना चांगल्यातील चांगले जीवन बहाल करणे हेच उद्दिष्ट आहे. कारण शेवटी राज्यकर्त्यांचे उद्दिष्ट तर आपल्या जनतेचे कल्याण करणे हेच असते. यंदा दावोस येथील भारताचे प्रतिनिधित्व भारतातील महाराष्ट्राचे फडणवीस तसेच आणि तेलंगणाचे रेवंथ रेड्डीशिवाय आसामचे विस्वकर्मा आणि झारखंडचे हेमंत सोरेन करतील.

## गुरु वचन

### विश्वासघात म्हणजे आत्मघात

गुरू हरगोविंदसिंहजी यांच्या अत्यंत निकटवर्तियांपैकी एक म्हणजे पाइंदे खाँ. गुरुंना त्याच्यावर स्वत::पेक्षा जास्त विश्वास होता. त्याचे कतृत्व, त्याचे शौर्य या साऱ्यांवर गुरुजींचा अत्यंत विश्वास होता. परंतु पाइंदे खाँने याचा वेगळा अर्थ काढला आणि तो शिष्यांमध्ये गुरुजींचीच बदनामी करू लागला.

शिष्यांनी त्याला खूप समजावण्याचा प्रयत्न केला. परंतु, त्याचा काहीच परिणाम झाला नाही. तो कोणाचेच ऐकत नव्हता. शिष्यांनी गुरुजींनाही त्याच्या या गोष्टी सांगितल्या होत्या. गुरुजी मात्र शांत असल्याने शिष्यांना याचेही आश्चर्य वाटत होते. त्यांना कळतच नव्हते, की गुरुजींना अचानक काय झाले, पाइंदे खाँ गुरुजींच्या इतक्या जवळचा आणि तोच त्यांची बदनामी करतोय?

शेवटी गुरुजींच्या सहनशीलतेचा अंत झाला आणि त्यांनी घोषणा केली, की पाइंदे खाँला दरबारातून काढून टाकावे. यानंतर पाइंदे खाँने बंडखोरी केली आणि तो मोगलांना जाऊन मिळाला. त्याने गुरुजींना जाताना धमकीही दिली 'तुम्ही मोगलांपुढे टिकूच शकणार नाहीत' गुरुजी शांत होते त्यांनी त्याची हकालपट्टी केली.

यानंतर पाइंदे खाँ थेट शहाजानला जाऊन भेटला आणि त्याने हरगोविंदसिंहजी विरोधात त्याचे कान भरले. शहाजहानने मग काले खाँच्या नेतृत्वाखाली एक फौज गुरुंवर हल्ला करण्यासाठी पाठवली. जालंधरमध्ये मोगल आणि शीख सैन्याचे युद्ध झाले.

या युद्धात पाइंदे खाँ ने गुरुंवर हल्ला चढवण्याचा प्रयत्न केला. गुरुंनी त्याचे वार चुकवत त्याला माफी मागायला सांगितली आणि असे केले तर, मी तुला माफ करेन असे आश्वासनही त्याला दिले. परंतु तो ऐकण्याच्या परिस्थितीत नव्हता, त्याला झालेल्या गर्वाने त्याच्या मेंदूवर ताबा मिळवला होता. त्याने पुन्हा गुरुजींवर हल्ला चढवण्याचा प्रयत्न केला. परंतु त्याच्या फारसा परिणाम झाला नाही.

गुरुजींनी त्याचा हाही वार चुकवला. त्याला पुन्हा शरण येण्याचे आवाहन केले. परंतु तो ऐकण्यास तयार नव्हता. शेवटी गुरुजींना त्याचा वध करावाच लागला. इकडे मोगल सैन्याचेही बारा वाजले. त्यांचाही पराभव झाला. आणि काले खाँ आल्या पावली पळत सुटला.

## उपदेशकथा

### लगाम हाती हवा

इराणचा क्रूरकर्मा बादशहा नादिरशहाने 'बुद्धीचे बळ नि मनगटाची मस्ती' यांच्या जोरावर दिल्लीपर्यंत धडक मारून साम्राज्य विस्तार केला. त्यावेळी दिल्लीच्या तख्तावर मोहम्मदशाहा रंगीले हे होते. या दिल्लीपतीने विजयी नादिरशहाला हत्तीच्या अंबारीत बसवून शहराची सैर घडवण्याचा हुकूम दिला. शाही पीलखान्यातील ऐरावतासारखा उमदा हत्ती हजर झाला. सोन्याची अंबारी, भरजरी झूल, त्याला रुप्याच्या झालरी नि झिरमिल्या, मोत्यांच्या माळा, इराणच्या शहाला हत्ती हे वाहन अपरिचित होते. अंबारीत स्थानापन्न होतो तो त्याला अंबारीपुढे एक शाही हुजऱ्यासारखा दिसणारा इसम बसलेला दिसला. तो बिचारा माहूत होता. 'कोण रे बाबा तू? तुझं काय काम? लगाम माझ्या हाती सोपव नि आपला रस्ता सुधार.' नादिरशहानं फर्माविले. माहूत चमकला. थोडा वेळ थांबला. अखेर धैर्य एकवटून त्याने म्हटले, 'खाविंद, कसूर माफ असावी. हत्तीला लगाम नसतो. माहूतच हातच्या अंकुशानं जनावरावर नियंत्रण ठेवतो.' नादिरला नवल वाटलं. 'आश्चर्य आहे. या अजस्त्र प्राण्याला लगाम नसतो? तर मग मी उतरतो. ज्या वाहनाचा लगाम माझ्या हाती नाही त्यावर मी बसणार नाही. स्वत:ची बहुमोल जिवन दुसऱ्याच्या हाती सोपवणारा हा नादिरशहा नव्हे.' माहुताने इशारत करताच हत्ती झुकला. पुढचे गुडघे टेकले. शाही स्वारी पायउतार झाली.

कथा उपदेश : जीवनाची वेसणदोरी त्याने सदोदित स्वत:च्या हाती ठेवली यातच कदाचित त्याच्या यशाची गुरूकिल्ली असेल.

## पंचांग

| | |
|---|---|
| पंचांग | योग:व्यतीपात १८:५७:५४ |
| २१ जानेवारी २०२५ | करण:तैतिल १४:४८:०२ |
| बुधवार | करण:गर २६:४७:२५+ |
| विक्रम संवत्– २०८२ | सूर्य:मकर |
| माघ शके संवत्– १९४७ | चन्द्र:कुम्भ०१:३५:०८ |
| संवत्सर – विश्वावसूनाम | हिजरी सन् – १४४६ |
| अयन– उत्तरायणारंभ | मुस्लिम मास – शाबान |
| मास– माघ | तारीख – १ |
| ऋतु– सौर शिशिर | विशेष |
| शुक्ल पक्ष | भारतीय माघ मासारंभ |
| तिथि:तृतीया | भगवान माडेय जयंती |
| २६:४७:२५+ | झेबूजी महाराज पुण्यतिथी |
| नक्षत्र:धनिष्ठा १३:५८:०० | यात्रा – जागजई |

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. ८४०

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 2 | | | | | 5 | | | |
| | | | | 3 | | 8 | | 9 |
| 9 | | 6 | | 7 | | 5 | | 2 |
| | 2 | 7 | 4 | | | | 6 | |
| | | 5 | 6 | | 7 | 2 | | |
| | 1 | | | | 8 | 7 | 5 | |
| 5 | | 2 | | 4 | | 6 | | 7 |
| 1 | | 3 | | 9 | | | | |
| | | | 5 | | | | | 3 |

### : सूडोकु :

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३-३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

### सूडोकु क्र. ८३९ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 4 | 1 | 5 | 3 | 7 | 9 | 6 | 8 | 2 |
| 8 | 2 | 7 | 6 | 1 | 5 | 3 | 4 | 9 |
| 3 | 9 | 6 | 2 | 4 | 8 | 1 | 7 | 5 |
| 6 | 4 | 2 | 5 | 8 | 3 | 7 | 9 | 1 |
| 5 | 7 | 9 | 1 | 2 | 4 | 8 | 3 | 6 |
| 1 | 8 | 3 | 9 | 6 | 7 | 5 | 2 | 4 |
| 2 | 5 | 4 | 7 | 3 | 6 | 9 | 1 | 8 |
| 9 | 3 | 8 | 4 | 5 | 1 | 2 | 6 | 7 |
| 7 | 6 | 1 | 8 | 9 | 2 | 4 | 5 | 3 |


## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १९८६ – पुर्व बेरुतमध्ये बॉम्ब हल्ल्यात २७ ठार.
- १९९० – पॅट्री शीहानने एलपीजीए जमेका गोल्फ कलास्कि जिंकला.
- १९९८ – पॉ जॉन पॉल दुसरे क्युबाचा दौऱ्यावर गेले.
- २००८ – पाकिस्तानचे राष्ट्रपती परवेज मुशर्रफ आणि माजी क्रिकेटपटू इमरान खान यांना हॉल ऑफ शेम पुरस्कार जाहीर झाला.

### राष्ट्रीय

- १९५२ – नेहरुच्या काँग्रेस पक्षाने निवडणूक जिंकली.
- १९७२ – मणिपूर,मेघालय आणि त्रिपुरा भारताचे वेगळे राज्य बनले.



- २००८ – बिल्किस बानो सामूहिक बलात्कार प्रकरणी मुंबई सत्र न्यायालयाने ११ आरोपींना जन्मठेपेची शिक्षा सुनावली.

### जन्म

- १३३८ – फ्रांसचा राजा चार्लेस व्ही. यांचा जन्म.
- १८२१ – अमेरीकेचे उपराष्ट्रपती जॉन केबल ब्रीक्रीनरेज यांचा जन्म.
- १८२९ – स्वीडनचा राजा ऑस्कर दुसरा फ्रीडरीक यांचा जन्म.

### निधन

- १५९६ – जर्मन पंतप्रधान जॉन लीगारीयस यांचे निधन.
- १७७४ – तुर्कीचे सुल्तान मुस्तफा तिसरा यांचे निधन.
- १७९३ – फ्रांसचा राजा लुईस सोळावा यांचे निधन.
- २००८ – कर्करोगाचा शोध लावणाऱ्या शास्त्रज्ञ जुदाह फोकमॅन यांचे निधन.

## : SMS :

Kya Aap Marne Ke Baad Bhi Sexy Ladkiya dekhna Chahte Hain?

" DONATE UR EYES" Social Msg Ko bhi Kamine logon ke liye interesting banakar Bhejna Padta hAI....

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | २६.८ | १४.६ |
| अहमदनगर | २६.९ | १४.२ |
| अकोला | २८.८ | १७.२ |
| अमरावती | २८.९ | १७.६ |
| बीड | २९.७ | १६.४ |
| भंडारा | २८.५ | १२.१ |
| बुलढाणा | २२.१ | ८.५ |
| चंद्रपूर | २९.९ | १५.२ |
| चेन्नई | २९.४ | १९.९ |
| नवी दिल्ली | २२.८ | ११.१ |
| धुळे | २६.९ | १५.४ |
| गोंदिया | २८.६ | १५ |
| जळगाव | २९.२ | १७.२ |
| कोल्हापूर | २७.७ | १३.१ |
| लातूर | २८.३ | १६.८ |
| मुंबई | २७.१ | १८.३ |
| नागपूर | २८.२ | १५.६ |
| नांदेड | २९.४ | १७.५ |
| नंदूरबार | २५ | १२.८ |
| नाशिक | २६.३ | १०.४ |
| पुणे | २६.७ | ११.५ |
| पंढरपूर | २८.४ | १६.९ |
| सातारा | २७.८ | १०.३ |
| सांगली | २८.२ | १५.३ |
| सोलापूर | २९.१ | १७.१ |
| वर्धा | २९.४ | १५.२ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** मेष: शुभ रंग : हिरवा, शुभ दिशा : दक्षिण प्रतिष्ठा वाढेल. सहकार्यांच्या अपेक्षा पूर्ण कराल.

**तुळ :** शुभ रंग : जांभळा, शुभ दिशा : पूर्व पैसे हातात येतील. एखाद्याच्या सहकार्याने कामात यश मिळेल.

**वृषभ :** शुभ रंग : पिवळा, शुभ दिशा : पूर्व कर्जात कपात होईल. कामातील अडथळे दूर होतील. नवीन कामे जुळून येतील.

**वृश्चिक :** शुभ रंग : हिरवा, शुभ दिशा : पश्चिम खर्चाची कामे होतील. जुन्या कामातील अडथळे दूर होतील. मित्रांचे सहकार्य लाभेल.

**मिथुन :** शुभ रंग : लाल, शुभ दिशा : पूर्व स्पष्ट धोरणांमुळे अनुकूलता येईल. जीवनात आशाजनक स्थिती निर्माण होईल.

**धनु :** शुभ रंग : पिवळा, शुभ दिशा : पूर्व कौटूंबिक समस्यांचे समाधान होईल. एखाद्या महापुरुषाशी भेट होईल. आर्थिक स्थिती खालावलेली असेल.

**कर्क :** शुभ रंग : केसरी, शुभ दिशा : पश्चिम नशीब साथ देणार नाही. आपल्या मनमोकळेपणाचा फायदा दुसरे लोक घेतील.

**मकर :** शुभ रंग : केसरी, शुभ दिशा : दक्षिण मुलांमुळे तनाव निर्माण होऊ शकतो. एखाद्या वादावर तोडगा निघेल.


**सिंह :** शुभ रंग : गुलाबी, शुभ दिशा : पश्चिम कामे यशस्वी होतील. शारीरिक आरोग्य उत्तम राहिल. मित्रांचे संपूर्ण सहकार्य लाभेल.

**कुंभ :** शुभ रंग : लाल, शुभ दिशा : दक्षिण प्रयत्न अयशस्वी झाल्याने मन दु:खी होईल. एखाद्या जवळच्याच्या व्यवहारात प्रतिकूलता येईल.

**कन्या :** शुभ रंग : निळा, शुभ दिशा : पश्चिम नवीन संबंधांचा फायदा होईल. कामे होणार नाही. आरोग्याची काळजी घ्या.

**मीन :** शुभ रंग : काळा, शुभ दिशा : पूर्व नशीबाची पूर्ण साथ मिळेल. अधिकारीवर्गाचे सहकार्य मिळेल. कामात दिरंगाई केल्यास नुकसान सोसावे लागेल.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. ८४०



### आडवे शब्द

१. व्याकूळ, घाबरलेला
५. असामान्य
८. पान (सं.)
९. दृष्ट
१०. 'पुरी'चे दैवत
१२. मोठा नगारा
१३. नवरदेव
१४. व्याख्यान
१५. रेशमचा किडा
१६. अंदाज, तर्क
१८. राबता, जाणे-येणे
२०. प्रमाणपत्र
२२. मच्छर
२४. स्वाभिमानी स्त्री
२५. पल्लवीने रेणुका शहाणेच्या चित्रपटात साकारलेली भूमिका
२७. धमकी, श्वास
३०. व्यवस्थित
३२. अखबार
३३. कासंडी, दुधाची घागर
३४. हाताचा एक अवयव
३६. व्यवस्था
३८. ऋण, व्याजाने घेतलेली रक्कम
४०. जहाजांचा मुक्काम
४१. फळातील द्रव
४२. हाताने सूत काढून हातमागावर विणलेले कापड
४३. पंगत
४५. दरोडा
४७. अपशकुन
५०. नकला करणारा
५२. हिशोबाची एक बाजू
५४. यात्रेत नियमित जाणारा
५६. दुधाच्या वड्या
५८. शेजारी शेजारी
६०. झकास
६१. एक मंगलवाद्य
६३. निवासस्थान
६४. समोरसमोरची चकमक
६५. पूर्णपणे
६७. एक सुगंधी वनस्पती
६८. समुद्र
७०. रमणीय
७१. असुर, दानव, देवांचा शत्रू
७२. गाजावाजा
७३. किंमत, पैसा
७४. विशेष, ७५. चंद्र
७६. निकट, जवळ
७८. भूकंप, ८०. मलई
८१. फरक, ८२. घराणे
८३. रंग बदलणारा प्राणी

### उभे शब्द

१. यजमानीण, २. पहारेकरी
३. कलंक
४. सुकुमार
५. न थांबता
६. धैर्य
७. दारूचा एक प्रकार
८. उद्याच्या नंतरचा दिवस
११. गर्दीचा विळखा
१३. भावाची पत्नी
१५. कृत्रिम शीतपे (इंग्रजी) उन्हाळ्यात या कंपन्यांमध्ये शीतयुद्ध रंगते!
१७. धार्मिक पर्यटन
१८. महिला, बाई
१९. प्रफुल्लित
२१. पटपट, वेळ न दवडता
२३. मानसिक धक्का (हिंदी)
२६. वस्तूचा छोटा तुकडा
२८. समोरच्याच्या मनातील विचार ओळखणारा
२९. वार्ताहर
३०. पाणी
३१. आई-वडील
३३. सूत काढण्याचे एक साधन
३५. आरोळी, ललकारी
३७. जिव्हा
३९. मळलेले
४०. आपला नसलेला
४४. अरण्य
४६. अंजन
४८. चेष्टेखोर
४९. न वापरलेली, नवी
५१. दुलई
५३. चौसोपी वाड्यातील मधली खोली
५५. लेखणी
५६. भिऊन पळ काढणारा
५७. भटकणारा
५९. आशीर्वाद
६१. माळ, हार
६२. नुकतेच आगमन झालेला, नवखा
६४. तुलनेतील सारखेपणा
६५. अनुत्तीर्ण
६७. चर्चा
६८. लाकडाची उत्कृष्ट जात
६९. रानरेडा
७०. सुंदर तरुणी
७३. दरवाजा
७४. मृत्तिकापात्र
७५. सुविधा
७७. मगज
७८. द्रव्य
७९. बीजगणितात आढळणारा श्रीकृष्णाचा मामा

### जम्बो शब्दकोडे क्र. ८३९ चे उत्तर

आडवे उत्तर : १.रातोरात ४.छायाचित्र ६.जन गण मन ११.रुपाया १३.नवार १४.जर १५.खराब १७.भारवाहक १९.जून २१.दलाल २३.जमा २५.शाहीर २७.कडकड २९.मतदार ३१.नगद ३२.कारण ३४.धनी ३५.कर्म ३६.पाळीव ३८.विणकर ४०.पालम ४२.लघु ४३.जुना ४४.मातीमोल ४६.नगर ४८.तनय ५१.यमल ५२.हकनाक ५४.आजतक ५६.किसान ५८.गवगवा ५९.परागंदा ६०.धमाल ६१.तेरडा ६२.नत ६४.अननस ६५.सर ६६.आज ६७.प्रवाह ६९.कबरस्तान ७१.सर ७२.नरबळी ७४.दर्द ७५.जनककन्या ७८.तलाशी ७९.समस्त ८०.नातलग ८१.रमा

उभे उत्तर : २.तोतरा ३.तरू ४.छाया ५.चिक्कार ६.जनकजननी ७.नवा ८.गरजू ९.मज १०.नरवर १२.पायल १५.खडक १६.बदक १७.भारत १८.वावर २०.नशा २२.लाडका २४.माग २६.हीरक २८.डहाळी २९.मण ३०.दाभण ३३.रस्सी ३४.धरती ३६.पाळत ३७.वलय ४१.मनकवडा ४५.मोहन ४७.रविवासर ४९.नजरानजर ५०.तेज ५३.नागर ५४.आदानप्रदान ५५.तक्क्या ५७.सालस ६०.धनवान ६१.तेजाब ६३.तवा ६५.सनदशीर ६६.आसपास ६८.हस्तक ६९.कळी ७०.रयत ७३.रचना ७५.जस्त ७६.कट्टा ७७.न्यायी

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे-४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे - ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०-२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

# नव्या, जुन्या दिग्दर्शकांनी उलगडल्या त्यांच्या चित्रपट निर्मितीच्या कथा

**पुणे (दै. संध्या) :**

काही नवे, काही जुने दिग्दर्शक एकत्र आले आणि उलगडल्या यावर्षीच्या मराठी चित्रपटांच्या कथा. पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात आज मराठी चित्रपट स्पर्धेतील आदिशेष (रमेश मोरे), तो, ती आणि फुजी (मोहित टाकळकर), तिघी (जिजीविषा काळे), जीव (रविंद्र माणिक जाधव), गोंधळ (संतोष डावखर), गमन (मनोज नाईक साठम) आणि बाप्या (समीर तिवारी) या स्पर्धेतील चित्रपटांच्या दिग्दर्शकांबरोबर आज 'पिफ'चे उपसंचालक विशाल शिंदे यांनी संवाद साधला.

'तिघी' या चित्रपटाच्या दिग्दर्शिका जिजीविषा काळे म्हणाल्या, "माझा प्रवास 'वजनदार' या चित्रपटात सहाय्यक म्हणून सुरू झाला. आता १२ वर्षांनी माझा दिग्दर्शक म्हणून चित्रपट येतोय.



पॅशन कितीही जोरदार असली तरी योग्य माणसे बरोबर नसतील तर तुमची गोष्ट पुढे जात नाही. त्यादृष्टीने मी भाग्यवान आहे. मला सतत चांगली माणसे मिळाली. त्यामुळे मी इथपर्यंत आले. पालकांची मी एकुलते एक मुल असल्याने मला सतत एकटे वाटत आले आणि तीच गोष्ट मी माझ्या चित्रपटातून मांडली आहे." त्या म्हणाल्या, "मी माझ्या आयुष्यात पाहिलेल्या बायका माझ्या चित्रपटात दिसतील."

'तो, ती आणि फुजी', या चित्रपटाचे दिग्दर्शक मोहित टाकळकर म्हणाले, "मी पूर्वीपासून नाटक करत होतो पण चित्रपट तयार करण्याचा विचार मनात सतत घोळत होता. त्यातून मग पुढे चित्रपट कण्याचा निर्णय घेतला. मी शहरात वाढलो. मला गोष्टी मिळालेल्या आहेत. मात्र तरीही शहरी कोलाहलात अनेक प्रश्न भेडसावत आहेत. तेच विषय हे माझ्या चित्रपटातून येतात. शहरी जीवनात नात्यांमध्ये बदल घडतात, तेच मी माझ्या आताच्या चित्रपटात मांडण्याचा प्रयत्न केला आहे."

'जीव'चे दिग्दर्शक रवींद्र माणिक जाधव म्हणाले, "धुळ्यात शिक्षक म्हणून मी काम करतो, मात्र चित्रपट करण्याचा विचार मनात होता आणि त्यातून मी २०१३ रोजी पहिला माहितीपट तयार केला. हँडीकॅमवर 'शाळाबाह्य', 'निरोध' असे माहितीपट तयार केले. माहितीपट तयार केला. चित्रपट कसा तयार करायचा हे काहीच माहीत नव्हते. पुढे 'थाळ भांकसर' हा माहितीपट हजारांमध्ये केला आणि त्याला २ लाखाचे बक्षीस मिळाले. मग त्यातून अजून काम करण्याची प्रेरणा मिळाली. लिखाण करत असताना एका माणसाने शाळेमध्ये नागपंचमीची एक आठवण २०१८ मध्ये सांगितली आणि त्यातून ' जीव' चित्रपटाची कथा पुढे आली. बायको आर्थिकदृष्ट्या मागे उभी राहिली आणि चित्रपट पूर्ण झाला."

'गमन'चे दिग्दर्शक मनोज नाईक साटम म्हणाले, "मी फोटोग्राफर होतो. लग्नाचे फोटो काढायचो. तेंव्हा व्हिडिओ शुटिंग पाहत पुढे आलो आणि त्यातून चित्रपट तयार करण्याचा विचार करत होतो. लहानपणापासून अनेक चित्रपटांची दृश्य मनात ठसली. एक कथा डोक्यात होती, ती लिहिली त्याची पुढे कादंबरी झाली. ती २०१५ मध्ये प्रसिद्ध झाली आणि उमेद आली. त्याचाच पुढे चित्रपट झाला. हा चित्रपट करताना अर्थातच पैसे नव्हते. हातात होते ते सगळे पणाला लावले. केवळ वेडे होणे किंवा डुबणे, असे दोन पर्याय होते. मी डुबायचे ठरवले. कोकणातूनच पात्रं पुढे आली आणि चित्रपट पूर्ण झाला."

' बाप्या'चे दिग्दर्शक समीर तिवारी म्हणाले, "मी उत्तर प्रदेशमधील आहे. मात्र बायको मराठी आहे आणि मला मराठीमधूनच चित्रपट करायचा होता. ४ वर्ष निर्माता मिळवण्यात गेले. शेवटी बायकोने पैसे उभे केले आणि चित्रपट तयार झाला. गिरीश कुलकर्णी यांनी मदत केली आणि माझ्या मनातील कथा पुढे आली. समाजातील गोष्टी ज्या मी पाहिलेल्या आहेत, त्याच चित्रपटात पुढे आल्या."

' आदिशेष'चे दिग्दर्शक रमेश मोरे म्हणाले, "मी मुबईच्या झोपडपट्टीत वाढलो आहे. मी चित्रपट तयार करण्याचे कोणतेही तंत्र शिकलेलो नाही. चित्रपट करतच शिकत गेलो. मी साहित्याचा विद्यार्थी आहे. साहित्याच्या शिक्षकाने मला आत्मविश्वास दिला. चित्रपट तयार करण्याचा अडखळत हा प्रवास केला. साडेतीन वर्षे निर्माते शोधत होतो. प्रोजेक्ट आणि चित्रपट यात फरक असल्याचे निर्मात्यांच्या लक्षात येत नव्हते. शेवटी एक प्राध्यापक निर्माते म्हणून पुढे आले." ते म्हणाले की कोविडमध्ये आपण जे अनुभवले. त्यातून आपल्यामधला शेष पुढे आला. तोच डोक्यात होता. आ. ह. साळुंके यांचे बळीवंश हे पुस्तक वाचले आणि कथेतील पात्रं पुढे आली. कोकणातूनच कलाकार चित्रपटात येत गेले आणि चित्रपट तयार झाला.

'गोंधळ'चे दिग्दर्शक संतोष डावखर म्हणाले, "मला चित्रपट निर्मितीची काही पार्श्वभूमी नाही. १० वी मध्ये असताना पहिला चित्रपट पाहिला होता. तो डोक्यात घोळत होता. नंतर २०१३ मध्ये पहिली शॉर्टफिल्म तयार केली. ओटीटी मराठी चित्रपट नाकारत होते. मग सगळ्यांना दाखवावे असा विचार मानत होताच. रॉबर्ट मकी यांचे पटकथेवरचे पुस्तक वाचून अनेक चित्रपट पाहिले. त्यातून शिक्षण घेत गेलो. चित्रपटाचा विषय गोंधळ असा होता. मी अनेक गोंधळी मंडळींना बोलावले आणि त्यांची गाणी ऐकली. बँकेकडून कर्ज काढले आणि चित्रपट तयार केला."

## थोडक्यात पण महत्वाचे...




### पुणे पीपल्स बँकेच्या अमृतमहोत्सवानिमित्त बोधचिन्ह अनावरण

■ सामाजिक कार्यकर्ते डॉ.राजेंद्र धामणे व डॉ.सुचेता धामणे मानकरी

पुणे (दैनिक संध्या) : वसंतपंचमीच्या दिवशी सन १९५२ साली स्थापन झालेल्या पुणे पीपल्स को-ऑप बँक लि., पुणे अमृतमहोत्सवी वर्षात (७५) पदार्पण करीत आहे. त्यानिमित्त शुक्रवार, दि. २३ जानेवारी रोजी दुपारी ४ वाजता गणेश कला क्रीडा रंगमंच येथे विषेश कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून अमृतमहोत्सवानिमित्त बोधचिन्ह अनावरण आणि पुणे पीपल्स पुरस्कार प्रदान सोहळा होणार आहे, अशी माहिती बँकेचे अध्यक्ष श्रीधर गायकवाड यांनी पत्रकार परिषदेत दिली.पत्रकार परिषदेला बॅंकेचे उपाध्यक्ष बिपीनकुमार शहा, व्यवस्थापकीय समिती अध्यक्ष ॲड.सुभाष मोहिते, संचालक सीए जनार्दन रणदिवे, बबनराव भेगडे, सुभाष नडे, डॉ. रमेश सोनवणे, सुभाष गांधी, मिलिंद वाणी, वैशाली छाजेड, निशा करपे, संजीव असवले, डॉ.विश्वनाथ जाधव, स्वीकृत तज्ञ संचालिका श्वेता ढमाळ, मुख्य कार्यकारी अधिकारी संजय भोंडवे, व्यवस्थापकीय मंडळ सदस्य सीए अजिंक्य रणदिवे, कौस्तुभ भेगडे, उदय जग्ताप, राजेंद्र गांगर्डे, अरुण डहाके आदी उपस्थित होते. कार्यक्रमात अमृत महोत्सवाच्या बोधचिन्हाचे अनावरण मान्यवरांच्या हस्ते होणार असून मनोरुग्ण महिलांसाठी अजोड कार्य करणाऱ्या माऊली सेवा प्रतिष्ठान, अहिल्यानगरचे संस्थापक डॉ.राजेंद्र धामणे व डॉ.सुचेता धामणे यांना पुणे पीपल्स पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. रुपले १ लाख १ हजाराचा धनादेश, सन्मानपत्र, सन्मानचिन्ह असे पुरस्काराचे स्वरुप आहे. राज्याचे सहकार आयुक्त व सहकारी संस्था निबंधक दीपक तावरे आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्र-कुलगुरु डॉ.पराग काळकर यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

### लढाई संपली आता सर्वजण एकत्र येऊ...; औंध बोपोडीला विकासात अग्रेसर ठेऊ

पुणे (दैनिक संध्या) : निवडणूक म्हटलं की प्रतिस्पर्धी उमेदवावर टीका करायची, मात्र त्या पलीकडे जाऊन निवडणूक संपल्यावर दोन परस्पर विरोधी निवडणूक लढवलेले उमेदवार एकमेकांना भेटतात हे अलीकडे दुर्मिळ झाले आहे. मात्र लढाई संपली आता सर्वजण एकत्र येऊ... आपल्या औंध बोपोडीला विकासात अग्रेसर ठेऊ, असे म्हणत औंध – बोपोडी प्रभागातील नवनिर्वाचित नगरसेवक चंद्रशेखर उर्फ सनी निम्हण यांनी घेतली विरोधकांची भेट घेतली. या विषयी बोलताना सनी निम्हण म्हणाले, निवडणूका येतात जातात. निवडणुकीची लढाई ही व्यक्तीशी नसून विचारांची लढाई असते असे मी मानतो. हाच विचार पुढे नेत आज निवडणुकीच्या धामधुमीनंतर प्रकाशजी ढोरे यांची सदिच्छा भेट घेतली. या प्रसंगी विनायक रणपिसे उपस्थित होते. येत्या काळात औंध बोपोडी परिसराचा नियोजनबद्ध विकास करण्यासाठी विचारांची देवाणघेवाण झाली. या परिसराविषयी त्यांचा ध्यास आणि कार्य पाहता पुढील काळात औंध बोपोडीच्या विकासासाठी त्यांचे सहकार्य आणि मार्गदर्शन मोलाचे ठरणार आहे. शेवटी वैचारिक भूमिका जरी वेगळी असली तरी औंध बोपीडीच्या विकासासाठी आपण सर्व मतभेद बाजूला ठेऊन एकत्र यायला पाहिजे असे मानणारा मी एक कार्यकर्ता आहे.

## गणेशजन्मानिमित्त 'दगडूशेठ' ला स्वराभिषेक आणि जन्म सोहळा गुरुवारी (दि.२२)

**पुणे (दै. संध्या) :**

श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट आणि सुवर्णयुग तरुण मंडळ च्यावतीने यंदाचा गणेश जन्म सोहळा माघ शुद्ध चतुर्थी म्हणजेच गुरुवार, दिनांक २२ जानेवारी रोजी बुधवार पेठेतील दगडूशेठ गणपती मंदिरात आयोजित करण्यात आला आहे. विनायक अवतार असलेला हा गणेशजन्म सोहळा यंदा देखील सुवर्णपाळण्यामध्ये दुपारी १२ वाजता होणार आहे. यंदा स्वराभिषेक, गणेशयाग, श्री गणेश जागर, नगरप्रदक्षिणा असे विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रम देखील आयोजित करण्यात आले आहेत, अशी माहिती ट्रस्टचे अध्यक्ष सुनील रासने यांनी दिली.

गणेश जन्म सोहळ्यानिमित्त बुधवार, दि. २१ जानेवारी रोजी पहाटे ४ ते ६ यावेळेत मंदिरात भारतरत्न पं.भीमसेन जोशी यांचे नातू विराज जोशी हे श्रीं चरणी स्वराभिषेकातून गायनसेवा अर्पण करणार आहेत. स्वराभिषेकातून विविध प्रकारची गीते ऐकण्याची संधी भक्तांना यानिमित्ताने मिळणार आहे.

गणेश जन्माच्या दिवशी गुरुवार, दि. २२ जानेवारी रोजी संपूर्ण मंदिराला आकर्षक पुष्पसजावट व विद्युतरोषणाई करण्यात येणार आहे. गुरुवारी पहाटे ३ वाजता ब्रह्मणस्पती सूक्त अभिषेक होणार आहे. याशिवाय गणेशसुक्त अभिषेक देखील मंदिरात सुरु असणार आहेत. तसेच सकाळी ६ ते १० आणि दुपारी १.३० ते सायंकाळी ५ यावेळेत गणेश याग होईल.

## दिग्दर्शक डॅन वॉलमन यांचा नव्या दिग्दर्शकांना सल्ला

**पुणे (दै. संध्या) :**

चित्रपट तयार करण्याचे काम कायम करत रहा, थांबू नका, यश मिळेल, असा सल्ला आज इस्रायलचे दिग्दर्शक डॅन वॉलमन यांनी नव्या स्वतंत्र दिग्दर्शकांना दिला.

पुणे चित्रपट महोत्सवा(पिफ)त आज 'कमी संसाधनांतून सर्जनशीलतेकडे - नव्या स्वतंत्र दिग्दर्शकांना सल्ला', या विषयावर डॅन वॉलमन बोलत होते. यावेळी महोत्सवाचे अध्यक्ष डॉ. जब्बार पटेल उपस्थित होते.




डॅन वॉलमन म्हणाले, "कायम करत रहा आणि चित्रपट तयार करत रहा. आपल्याला हवी तशी परिस्थिती तयार होईल, तेंव्हा चित्रपट तयार करू, असा विचार करत बसू नका. कमी खर्चाच्या कथा निवडा. कथा अशीच निवडा की ज्याच्यामध्ये लोकेशन आणि अभिनेत्यांवर जास्त खर्च होणार नाही आणि चित्रपट करण्यापूर्वी कालावधीचा विचार करा." ते म्हणाले, "जगामध्ये युद्ध, हिंसा, द्वेष सुरू आहेत आणि त्यामुळे निराशा येऊ शकते. मला मात्र त्यातून निराश न होता जिवंत ठेवण्यासाठी सतत चित्रपट तयार करणे, गरजेचे असते."

ज्यांच्याकडे संसाधनांची कमी आहे, पण ज्यांना चित्रपट तयार करायचे आहेत, त्यांच्यासाठी बायबलमधील दोन शिकाऱ्यांचे उदाहरण देत ते म्हणाले, "थांबू नका. कमी लोकांमध्ये काम करा. मी सहाय्यक ठेवत नाही. त्यामुळे काम जलद होते आणि खर्च कमी होतो.मी प्रसिद्ध नटांपेक्षा चांगले अभिनेते घेतो. "

ते म्हणाले, की ते न्युयॉर्कमध्ये १९६० च्या दशकात फिल्म मेकिंग शिकले, तेंव्हा अंडरग्राउंड फिल्म चळवळ सुरू होती. स्वतंत्र चित्रपट दिग्दर्शकांनी न्यूयॉर्कच्या अंडरग्राउंड फिल्म चळवळीसारखे प्रयत्न केले पाहिजेत. त्यातून मोठ्या चित्रपटगृहात चित्रपट दाखवण्यापेक्षा छोट्या छोट्या ठिकाणी चित्रपट दाखवता येतील.

एआयबद्दलच्या एका प्रश्नाला उत्तर देताना ते म्हणाले, की एआयचा वापर कसा करावा याचा विचार करावा लागेल. त्याचा सर्रास वापर करण्यामध्ये खूप तोटे आहेत. चित्रपटात एआयचा वापर केल्याने माणसांना मिळणारा प्रत्यक्ष अनुभव कमी होतो.

## मोरया गोसावी पालखी सोहळ्याचे ग्रामदैवत श्री कसबा गणपती मंदिरात स्वागत

### ग्रामदैवत श्री कसबा गणपती मंदिर देवस्थान; शेकडो वर्षांची परंपरा आजही अव्याहतपणे सुरू

**पुणे (दै. संध्या) :**

चिंचवड मधून श्री मोरया गोसावी पालखीचे प्रस्थान झाल्यानंतर पालखी सोहळा पुण्याचे ग्रामदैवत श्री कसबा गणपती मंदिरात माघ शुद्ध प्रतिपदेला श्री जयति गजाननाच्या दर्शनासाठी थांबण्याची गेल्या शेकडो वर्षांची परंपरा आहे. श्रीमन्महासाधू मोरया गोसावी पालखी सोहळा यावर्षी देखील ग्रामदैवत श्री कसबा गणपती मंदिरात विसावला.

प्रथेनुसार ग्रामदैवत श्री कसबा गणपती मंदिराचे सांप्रत ठकार, महिला, वहिवाटदार, पुजारी पालखीचे औक्षण करतात. त्यानुसार यंदा सांप्रत ठकार पुजारी, पल्लवी आल्हाद ठकार यांनी पालखीचे औक्षण केले. शेकडो वर्षांची ही परंपर आजही अव्याहतपणे चालू आहे.



यावेळी मंदिराचे प्रमुख विश्वस्त विनायक बाजीराव ठकार, विश्वस्त स्वानंद ठकार, आशापूरक ठकार, मंदिराच्या विश्वस्त संगीता ठकार, मधुरा ठकार, सीमा ठकार, सुधा ठकार, गायत्री ठकार उपस्थित होत्या. चिंचवड देवस्थानचे प्रमुख विश्वस्त मंदार महाराज देव यांनी ग्रामदैवत श्री कसबा गणपती चे दर्शन घेतल्यानंतर सध्याचे पुजारी वहिवाटदार आल्हाद ठकार यांनी मंदार महाराज देव यांचे शाल, श्रीफळ देऊन स्वागत केले. मंदिरात मंदार महाराज देव यांचे औक्षण पल्लवी आल्हाद ठकार यांनी केले.

दरवर्षी माघ आणि भाद्रपद महिन्यच्या शुद्ध प्रतिपदा ते शुद्ध चतुर्थी दरम्यान श्रीमन्महासाधू मोरया गोसावी यांची चिंचवड ते मोरगाव अशी पायी पालखी यात्रा संपन्न होते. यंदाच्या वर्षी दिनांक १९ जानेवारी रोजी माघ शु. प्रतिपदेला या पालखी सोहळ्याने चिंचवड येथून मोरगावकडे प्रस्थान केले. यानंतर पालखी सोहळा मुक्कामी मार्गस्थ झाला. चिंचवड देवस्थान आयोजित या पालखी यात्रेतील ग्रामदैवत श्री कसबा गणपती दर्शन हा एक अतिशय महत्त्वाचा टप्पा आहे.

ग्रामदैवत श्री कसबा गणपती मंदिर ट्रस्टच्या वतीने माघ गणेश जन्मोत्सवाला डॉ. पं. प्रमोद प्रभाशंकर गायकवाड आणि शिष्यांनी सनई वादनाने सुरुवात केली. त्यानंतर महाडकर गुरुजी यांचे गणेश पुराण झाले. सायंकाळी उस्ताद बिस्मिल्ला खा यांचे पट्ट शिष्य पंडित शैलेश भागवत यांचे शहनाई वादन झाले. त्यांना तबल्यावर महेश केंगार यांनी तर हार्मोनियम वर सुधीर टेकाळे यांनी साथ दिली.

## निलेश घायवळने 'या' दिवशी रचला गोळीबाराचा कट

**पुणे (दै. संध्या) :**

कुख्यात गुंड नीलेश घायवळ याच्या टोळीविरोधात पुणे गुन्हे शाखेने मोठी कारवाई करत ९ आरोपींविरोधात तब्बल 6,455 पानी दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले आहे. गणेशोत्सव विसर्जनाच्या दिवशी परिसरात दहशत निर्माण करण्यासाठी गोळीबाराचा कट रचण्यात आल्याचे पोलिस तपासात उघड झाले आहे.

कोथरूड परिसरात टोळीची दहशत कमी झाल्याने ती पुन्हा निर्माण करण्यासाठी नीलेश घायवळ याने आपल्या साथीदारांना, "हमराज चौक, शास्त्रीनगर परिसरात जोरात धमाका करा, शस्त्र आणि पैसे मी पुरवतो. केस लागली तरी बाहेर काढतो", असे सांगितल्याचे दोषारोपपत्रात नमूद करण्यात आले आहे. हा कट ६ सप्टेंबर २०२५, गणेश विसर्जनाच्या दिवशी रचण्यात आला होता. या कटानुसार १७ सप्टेंबर २०२५ रोजी रात्री साडेअकराच्या सुमारास मुठेश्वर मित्रमंडळ चौकाजवळ गप्पा मारत उभ्या असलेल्या नागरिकांवर घायवळ टोळीतील गुंडांनी गोळीबार केला. या गंभीर गुन्ह्यात पोलिसांनी मोक्का (MCOCA) अंतर्गत कारवाई केली आहे.

या प्रकरणात मयूर ऊर्फ राकेश कुंबरे, मयंक मॉन्टी व्यास, गणेश राऊत, दिनेश फाटक, आनंद चांदलेकर, मुसाब शेख, जयेश वाघ, अक्षय गोगावले आणि अजय सरोदे अशा ९ आरोपींवर दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. या गुन्ह्यात ९ जणांना अटक करण्यात आली असून ८ आरोपी फरार आहेत. न्यायालयाने त्यांना फरार घोषित केले आहे.

# तुंबाडनंतर राही बर्वेचा प्रयोगशील थ्रिलर 'मयसभा'

**पुणे (दै. संध्या) :**

'तुम्बाड' या चित्रपटाने सिनेसृष्टीत वेगळाच ठसा उमटवणारे दिग्दर्शक राही अनिल बर्वे यांचा 'मयसभा' हा चित्रपट पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात प्रदर्शित झाला. "२००७ साली 'पिफ'मध्ये प्रेक्षक म्हणून सुरू झालेला माझा प्रवास आज 'मयसभा'च्या स्क्रीनिंगपर्यंत पोहोचला आहे," असं बर्वे यांनी सांगितलं.

'मयसभा' हा त्यांचा एक वैयक्तिक प्रयोग असल्याचं त्यांनी स्पष्ट केलं. "हा चित्रपट कोणत्याही ठराविक चित्रपट रचनेत बसवायचा नव्हता. विशेषतः दुसरा अर्धा भाग अधिक प्रयोगशील आणि वेगळा आहे," असं बर्वे म्हणाले. त्यामुळे या चित्रपटात पारंपरिक कथानकाची अपेक्षा ठेवणाऱ्यांनाही नवीन अनुभव मिळेल.



चित्रपटाची मुख्य कथा सिने-विश्वातील कलाकार परमेश्वर खन्ना यांच्या भोवती फिरते. बॉलिवूड अभिनेता जावेद जाफरी यांनी परमेश्वर खन्ना या गुंतागुंतीच्या पात्राची भूमिका साकारली आहे. "तो नायकही नाही, खलनायकही नाही," असं बर्वे सांगतात. परमेश्वरची पत्नी जयमाला यांच्या एका कृतीमुळे त्याच्यावर आणि मुलगा वासूवर खोल परिणाम होतो, परंतु चूक कोणाची हे शेवटपर्यंत रहस्यच राहते.

ही कथा एक बंद पडलेल्या थिएटरमध्ये घडते. बर्वे यांच्या म्हणण्यानुसार, चित्रपटात चार प्रमुख पात्रं असली तरी सर्वात महत्त्वाचं पात्र हे थिएटरच आहे. धूर, मच्छर आणि अस्ताव्यस्त वातावरणामुळे ते थिएटर जणू एक अडगळीची खोली बनते. या थिएटरमध्ये दडलेला सोन्याचा खजिना हा कथेला रहस्यात्मक वळण देतो.

फक्त २५ जणांची टीम आणि २३ दिवसांत हा चित्रपट तयार झाला, कोणत्याही मोठ्या औद्योगिक पाठिंब्याशिवाय निर्माता गिरीश यांच्या पाठिंब्यामुळे हा चित्रपट पूर्ण झाला," असं बर्वे म्हणाले.

**नात्यांची कसोटी आणि स्त्रीचा लढा : 'शॅडो बॉक्स'**

कौटुंबिक वास्तव, मानसिक संघर्ष आणि नात्यांतील ताण यांची परिणामकारक मांडणी करणारा 'शॅडो बॉक्स' हा बंगाली-हिंदी चित्रपट 'पिफ'मध्ये प्रदर्शित झाला. कुटुंबासाठी सातत्याने झटणारी स्त्री. तिचा पती, सामाजिक उपेक्षेला सामोरा जाणारा माजी सैनिक आणि एका अनपेक्षित घटनेनंतर कुटुंबातील नात्यांवर येणारा ताण हा चित्रपटाचा मुख्य आशय आहे. चित्रपटाचे अभिनेते चंदन बिष्ट म्हणाले, "या चित्रपटात स्त्रीचा संघर्ष आणि कुटुंबासाठीची तिची ताकद ठळकपणे चित्रित करण्यात आली आहे.

**स्त्रीवाद आणि निसर्ग संवर्धन साधणारा 'स्पायिंग स्टार्स'**

श्रीलंकन दिग्दर्शक विमुक्ति जयसुंदरा यांचा चित्रपट 'स्पायिंग स्टार्स' दाखवण्यात आला. त्यानंतर त्यांनी संवाद साधला ते म्हणाले, "आपण सध्या अशा वातावरणात जगत आहोत, जिथे निसर्गालाच संघर्ष करावा लागत आहे. त्यामुळे निसर्ग संवर्धन महत्वाचे आहे, या हेतूने 'स्पायिंग स्टार्स'ची निर्मिती केली आहे."

अभिनेत्री इंदिरा तिवारी म्हणाल्या, "मनुष्य म्हणून आपण निसर्गाचे घटक आहोत आणि मनुष्य म्हणून आपण पुढच्या पिढीला काहीतरी देणं लागतो आणि हा चित्रपट हे त्याचे उत्तम उदाहरण आहे."

या चित्रपटाच्या निर्मितीमध्ये श्रीलंका राष्ट्रीय चित्रपट महामंडळ, फ्रान्सचे सीएनसी यांचा सहभाग आहे. ऑक्टोबर २०२४ मध्ये श्रीलंकेच्या मध्य भागातील डोंगराळ प्रदेशात याचे चित्रीकरण करण्यात आले आहे. स्वित्झर्लंडच्या 'व्हिजन्स सुड एस्ट' या निधीतूनही या चित्रपटाला पोस्ट-प्रॉडक्शनसाठी आर्थिक मदत मिळाली आहे.

**'अ प्रेग्नंट विडो' : विधवेच्या आयुष्यातील संघर्ष**

"तिच्या पोटात वाढणाऱ्या जीवाला भविष्य हवं होतं, पण व्यवस्थेला तिच्या वेदनेची फाईलही उघडायला वेळ नव्हता," अशी दारुण परिस्थिती विषद करणारा मल्याळम चित्रपट 'अ प्रेग्नंट विडो' हा केवळ एका स्त्रीची कथा नाही, तर तो समाजव्यवस्थेवर टाकलेला एक संयत पण थेट प्रश्न आहे. दिग्दर्शक उन्नी के. आर. यांनी या चित्रपटातून गर्भवती विधवेच्या आयुष्यातील भावनिक, सामाजिक आणि प्रशासकीय संघर्ष अत्यंत सूक्ष्मतेने मांडला आहे. पतीच्या हत्येनंतर गर्भवती असलेली ही स्त्री न्याय, सुरक्षितता आणि मूलभूत हक्कांसाठी झगडताना दिसते. तिच्या वाट्याला येणारी उदासीनता, संशय आणि असहायता ही भूमिका अधिक वास्तववादी बनवते. अजीश कृष्णा यांची भूमिका या कथेत वेगळा भावनिक संदर्भ निर्माण करते.

दिग्दर्शक उन्नी के. आर. म्हणाले, "हा चित्रपट सहानुभूतीची मागणी करत नाही, तर समजून घेण्याची जबाबदारी प्रेक्षकांवर सोपवतो."

या चित्रपटाची अभिनेत्री जी इरिंगो रेती यांनी चित्रपटानंतर संवाद साधला. त्या म्हणाल्या, "अनेक प्रसंगांमध्ये मला रडावंसं वाटायचं,पण आईला रडता येत नव्हतं. कॅमेऱ्यासमोर मला रडण्याची परवानगी नव्हती." त्या म्हणाल्या की त्यात सामाजिक समुपदेशकासोबत सुमारे वीस मिनिटे चालणारा संवाद. हा महत्त्वाचा पण भावनिकदृष्ट्या गुदमरवणारा प्रसंग होता थकवा, असहायता आणि शांत सहनशीलता व्यक्त करताना अश्रू आवरावे लागत होते.

**निरागस नजरेत साठलेली भीती — 'ब्ल्यू हेरॉन'**

काही कथा मनाला हळूच स्पर्श करून जातात आणि नंतर बराच काळ शांतपणे मनात रेंगाळत राहतात, 'ब्ल्यू हेरॉन' हा असाच एक भावनिक अनुभव देणारा चित्रपट आहे. १९९० च्या दशकाच्या उत्तरार्धात, सहा जणांचे एक कुटुंब नव्या आशेने व्हॅनकुव्हर आयलंडवर स्थायिक होते.

बाहेरून पाहता सगळं साधं, सुंदर आणि सुरळीत वाटतं. पण या शांततेआड दडलेली अस्वस्थता हळूहळू उघड होत जाते. या कथेचं वैशिष्ट्य म्हणजे तिची मांडणी. सगळ्या घडामोडी 'साशा' या लहान मुलीच्या नजरेतून मांडण्यात आली आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### सलून ब्युटीपार्लर क्षेत्राच्या उज्वल भवितव्यासाठी HBF विचार मंथन आवश्यक

मुंबई (दैनिक संध्या) : ब्युटीपार्लर क्षेत्रातील भारतातील अग्रगण्य संस्था हेअर अँड ब्युटी फेडरेशन तर्फे नुकतेच उदयपूर राजस्थान येथे HBF मंथन आयोजित करण्यात आले. सलोन एज्युकेशनसाठी युनिव्हर्सिटीच्या धर्तीवर राज्यस्तरीय बोर्डाची स्थापना करणे ,राज्यस्तरीय आणि देश स्तरावर स्पर्धा परीक्षा घेणे, या क्षेत्रात आरोग्य, स्वच्छता आणि सुरक्षितता याविषयी जागरूकता आणणे , घातक आणि डुप्लिकेट प्रॉडक्टसवर निर्बंध लादणे, सलून क्षेत्रात आर्थिक साक्षरता रुजविणे आणि सगळ्यात महत्त्वाचे या क्षेत्राला शासनाच्या अत्यावश्यक सेवेत आणणे अशा महत्त्वाच्या मुद्द्यांवर चर्चा करण्यासाठी भारतातील सर्व राज्यातील प्रमुख संस्थांच्या पदाधिकाऱ्यांना एकत्र करून विचार मंथन करण्यात आले. हे विचार मंथन हेअर अँड ब्युटी फेडरेशनचे अध्यक्ष श्री. अशोकजी पालीवाल उपाध्यक्ष श्री. उदय टक्के आणि श्री. साविओ परेरा यांच्या व्यवस्थापनाने संपन्न झाले. महाराष्ट्रातून सलून ब्युटीपार्लर असोसिएशन या संस्थेतर्फे अध्यक्ष श्री. प्रसाद चव्हाण, मुंबई अध्यक्ष श्री. तुषार चव्हाण आणि मुंबई सचिव श्री. सचिन टक्के, ठाणे जिल्हा समन्वयक श्री.बंधू चव्हाण तसेच चिपळूण नाभिक संस्थेचे अध्यक्ष श्री.महादेव चव्हाण आणि तालुकाअध्यक्ष श्री.संजय जाधव हे उपस्थित होते. या विचार मंथनामध्ये जी चर्चा आणि निर्णय झाले ते महाराष्ट्रातल्या तळागाळातल्या सर्व सलून ब्युटी पार्लर व्यावसायिकांपर्यंत पोहोचले पाहिजेत असे आवाहन महाराष्ट्रातील सर्व संस्थांना महाराष्ट्र प्रभारी श्री.उदयजी टक्के आणि सौ.हर्षदा टक्के यांनी केले आहे.



### मुळशी–मावळ टप्प्यात ल्यूक मडग्वेचे वर्चस्व; हर्षवीर सिंग ठरला सर्वोत्तम सायकलपटू

■ खासदार मेधा कुलकर्णी, आमदार उमा खापरे, अमित गोरखे, शंकर जगताप यांच्या हस्ते खेळाडुंचा गौरव

पुणे (दैनिक संध्या) : भारतातील पहिल्यावहिल्या ‘UCI २.२’ श्रेणीतील आंतरराष्ट्रीय बहु-स्तरीय सायकलिंग स्पर्धा ‘बजाज पुणे ग्रँड टूर २०२६’ च्या मुळशी–मावळ टप्प्यात चीनच्या ‘ली निंग स्टार’ संघाच्या ल्यूक मडग्वे याने दमदार कामगिरी करत निर्विवाद वर्चस्व गाजवले, तर भारतीय राष्ट्रीय संघाच्या हर्षवीर सिंग सेखॉन याने सर्वोत्तम भारतीय सायकलपटू ठरण्याचा मान पटकावला. हिंजवडी येथील टी.सी.एस. (TCS) सर्कल येथून सुरू झालेल्या ८७.२ किलोमीटरच्या ‘मुळशी–मावळ माईल्स’ या पहिल्या टप्प्यात ल्यूक मडग्वे याने अवघ्या २ तास २१ सेकंदात शर्यत पूर्ण करत विजेतेपद मिळवले. सुरुवातीपासूनच वेगवान आणि तांत्रिक खेळाचे दर्शन घडवणाऱ्या या टप्प्यात शेवटच्या काही क्षणांत मडग्वे याने निर्णायक आघाडी घेत विजयावर शिक्कामोर्तब केले. एस्टोनियाच्या ‘क्विक प्रो टीम’चा अँड्रियास मॅटिल्डास (०२:००:२७) दुसऱ्या, तर बेल्जियमच्या ‘टार्टलेटो–इसोरेक्स’ संघाचा योर्बेन लॉरीसन (०२:००:३०) तिसऱ्या क्रमांकावर राहिला. UCI नियमांनुसार पहिल्या तीन क्रमांकाच्या खेळाडूंना अनुक्रमे १०, ६ आणि ४ सेकंदांचा टाइम बोनस देण्यात आला असून, तो पुढील टप्प्यांसाठी महत्त्वाचा ठरणार आहे. दरम्यान, शर्यत सुरू झाल्यानंतर पहिल्या चेकपॉईंटनंतर दुसऱ्या गटातील काही सायकलपटूंमध्ये अपघात झाला. सुरक्षिततेच्या दृष्टीने आणि UCI च्या सुरक्षा प्रोटोकॉलनुसार स्पर्धा सुमारे २३ मिनिटे थांबवण्यात आली होती. वैद्यकीय आणि तांत्रिक पथकाने तातडीने मदत केल्यानंतर शर्यत पुन्हा सुरू करण्यात आली. पहिल्या टप्प्यानंतर विविध श्रेणींतील आघाडीवर असलेल्या खेळाडूंना जर्सी प्रदान करण्यात आल्या. सर्वसाधारण वर्गीकरण आणि पॉइंट्स वर्गीकरणात ल्यूक मडग्वे याने यलो आणि ग्रीन जर्सी मिळवली. बेस्ट क्लायंबर म्हणून क्रिस्टियन रायलेनु (चीन) याला पोलका डॉट जर्सी, सर्वोत्तम आशियाई खेळाडू म्हणून जंबालजाम्ट्स सैनबयार (मंगोलिया) याला ऑरेंज जर्सी, सर्वोत्तम युवा खेळाडू म्हणून तामर स्पिएरो (नेदरलँड) याला व्हाईट जर्सी, तर सर्वोत्तम भारतीय खेळाडू म्हणून हर्षवीर सिंग सेखॉन याला ब्लू जर्सी प्रदान करण्यात आली. या टप्प्यातील विजेत्या खेळाडूंचा गौरव खासदार मेधा कुलकर्णी, आमदार उमा खापरे, अमित गोरखे, शंकर जगताप, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आयुक्त श्रावण हर्डीकर, पिंपरी-चिंचवड शहरचे पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांच्यासह आदी मान्यवर यांच्या हस्ते करण्यात आला. आता सर्वांचे लक्ष उद्या, २१ जानेवारी रोजी होणाऱ्या ‘मराठा हेरिटेज सर्किट’ या दुसऱ्या टप्प्याकडे लागले आहे. १०५.३ किलोमीटरच्या या खडतर मार्गात सायकलपटूंना १,०५१ मीटरची उंची सर करावी लागणार असून, पुरंदर किल्ला, सिंहगड आणि खडकवासला तलाव परिसरातून जाणारा हा टप्पा खेळाडूंच्या सहनशक्तीची कसोटी पाहणारा ठरणार आहे. पुणे जिल्हा प्रशासन, महाराष्ट्र शासन आणि सायकलिंग फेडरेशन ऑफ इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या पाच दिवसांच्या स्पर्धेत ३५ देशांतील १७१ आंतरराष्ट्रीय सायकलपटू सहभागी झाले असून, एकूण ४३७ किलोमीटरच्या या स्पर्धेमुळे पुण्याच्या सांस्कृतिक व ऐतिहासिक वारशाचे जागतिक स्तरावर दर्शन घडत आहे.

### पुणे महापालिका निवडणुकीचा निकाल; 57 देशांतील नागरिकांचे ऑनलाइन लक्ष

पुणे (दैनिक संध्या) : महापालिकेच्या निवडणुकीचा निकाल नागरिकांना ऑनलाइन बघता यावा यासाठी सुविधा उपलब्ध करून देणारी पुणे महापालिका राज्यात एकमेव महापालिका ठरली आहे. एका दिवसात तब्बल ४१ लाख व्ह्यू संकेतस्थळाला मिळाले आहेत. भारतासह ५७ देशातील नागरिकांचे लक्ष महापालिकेच्या निवडणुकीकडे असल्याचेही समोर आले आहे. पुणे महापालिकेच्या निवडणुकीची मतमोजणी १६ जानेवारी रोजी सकाळी १० पासून सुरु झाली, मध्यरात्री सुमारे दीड वाजेपर्यंत सुरु होती. विधानसभा, लोकसभा निवडणुकीला निवडणूक आयोगाकडून ऑनलाइन निकाल बघता यावा यासाठी माहिती संकेतस्थळावर फेरीनिहाय आकडेवारी उपलब्ध करून दिली जाते. पण स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचा निकाल ऑनलाइन बघण्याची व्यवस्था नसते. त्यामुळे प्रसारमाध्यमांकडून जाहीर केलेल्या निकालावरच नागरिकांना अवलंबून राहावे लागते. पुणे महापालिकेच्या माहिती तंत्रज्ञान विभागाने पुणेकरांना ऑनलाइन निकाल बघता यावा यासाठी प्रत्येक मतमोजणी केंद्रावर व्यवस्था केली होती. १६५ जागांपैकी किती ठिकाणची मतमोजणी सुरु आहे हे त्यावरून कळत होते.

# मुख्यमंत्र्यांनी दावोसमधून अनुभवला ‘ग्रँड टूर’चा थरार

**पुणे (दै. संध्या) :**



महाराष्ट्राच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवणारी आणि भारतीय क्रीडा विश्वात नवा इतिहास घडवणारी ‘बजाज पुणे ग्रँड टूर’ ही आंतरराष्ट्रीय सायकल स्पर्धेला आज सुरूवात झाली. देशातील ही पहिलीच आंतरराष्टीय ‘ग्रँड टूर’ सायकल स्पर्धा असल्याने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दावोस येथील आपल्या व्यस्त कार्यक्रमात वेळ काढून स्पर्धेचे थेट प्रक्षेपण पाहिले.

‘बजाज पुणे ग्रँड टूर’ला जागतिक स्तरावर ‘टूर डी फ्रान्स’सारख्या स्पर्धांना असलेली प्रतिष्ठा मिळली आहे. मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी दावोस येथील औद्योगिक परिषदेसाठी जाण्यापूर्वी शुभारंभ कार्यक्रमात जगभरातील सायकलपटूंचे स्वागत केले होते. दावोस येथे राज्याच्या औद्योगिक विकासासाठी विविध उद्योग संस्थांशी सामंजस्य करार करण्यात व्यस्त असतांनाही त्यांनी महाराष्ट्र आणि पुण्याची आठवण ठेवली. राज्याच्या क्रीडा संस्कृतीला चालना देण्यासाठी महत्वाच्या असलेल्या या महत्वाच्या स्पर्धेचा आनंद घेण्यासाठी त्यांनी सोबत असलेल्या अधिकाऱ्यांच्या लॅपटॉपवर स्पर्धेतील थरार अनुभवला.

या ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार होत असतांना त्यांनी सायकलपटूंच्या कौशल्याचेही कौतुक केले. सायकलपटूंना पुण्यात मिळणारा प्रतिसाद, इथल्या उत्सवाचे स्वरुप, सायकलपटूंना प्रोत्साहन देण्यासाठी आलेली तरुणाई पाहून त्यांनी आनंद व्यक्त केला. ही स्पर्धा राज्यातील क्रीडा क्षेत्राला प्रेरक ठरेल आणि सायकलचे शहर ही पुण्याची जुनी ओळख नव्या रुपात पुढे येईल, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस दावोस येथे वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमसाठी गेले आहेत. दिवसभराच्या व्यस्त कार्यक्रमात दोन्ही देशातील वेळांचा फरक लक्षात घेवून त्यांनी स्पर्धेच्यावेळी थेट प्रक्षेपण पाहण्याची इच्छा व्यक्त केल्यावर सोबत असलेल्या अधिकाऱ्यांनाही या गोष्टीचे कौतुक वाटले. मुख्यमंत्री सचिवालयाच्या अपर मुख्य सचिव अश्विनी भिडे, प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी, उद्योग विभागाचे प्रधान सचिव पी. अन्बलगन, विकास आयुक्त दिपेंद्रसिंह कुशवाह, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी.वेलारसू यांनी देखील थेट प्रक्षेपण पाहताना स्पर्धेचा आनंद घेतला. एका बाजूला महाराष्ट्रात हजारो कोटी रुपयांची गुंतवणूक आणण्यासाठी विविध देशांतील उद्योगसमूहांसोबत सामंजस्य करार होत असताना, दुसऱ्या बाजूला राज्यातील क्रीडा क्षेत्रात घडणाऱ्या या ऐतिहासिक घडामोडीकडे दिलेले विशेष लक्ष क्रीडा क्षेत्राला निश्चितपणे प्रोत्साहन देणारे आहे.

भारतामध्ये पहिल्यांदाच होत असलेल्या ‘ग्रँड टूर’ स्वरूपाच्या या स्पर्धेला जागतिक व्यासपीठावरून मिळालेली ही दाद क्रीडा क्षेत्रासाठी अभिमानास्पद ठरली आहे.

आंतरराष्ट्रीय दर्जाचे नियम, अत्याधुनिक आयोजन आणि विविध देशांतील नामवंत सायकलपटूंचा सहभाग यामुळे ‘बजाज पुणे ग्रँड टूर’ने पुण्याला जागतिक सायकलिंगच्या नकाशावर ठळक स्थान मिळवून दिले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दावोससारख्या आंतरराष्ट्रीय मंचावरून या स्पर्धेचा थरार अनुभवणे, हे आयोजक, खेळाडू तसेच क्रीडाप्रेमींसाठी मोठे प्रोत्साहन ठरले असून, यामुळे महाराष्ट्रात क्रीडा संस्कृती अधिक बळकट होण्यास निश्चितच चालना मिळणार आहे.

## ‘इन्फिनिटी लर्न’कडून ‘इन्फिनिटी वन’लॉँच

**पुणे (दै. संध्या) :**

■ इयत्ता चौथी ते बारावीसाठी प्रीमियम वैयक्तिक १:१ ऑनलाइन ट्युशन

भारतातील आघाडीच्या डिजिटल शिक्षण प्लॅटफॉर्मपैकी एक असलेल्या आणि श्री चैतन्य एज्युकेशनल इन्स्टिट्यूशन्सचा उपक्रम असलेल्या ‘इन्फिनिटी लर्न’ने ‘इन्फिनिटी वन’ या प्रीमियम, वैयक्तिक १:१ ऑनलाइन ट्युशन उपक्रमाची घोषणा केली. हा कार्यक्रम इयत्ता चौथी ते बारावीमधील विद्यार्थ्यांसाठी असून, त्यात ‘सीबीएसई’, ‘फाउंडेशन’, ‘जेईई’ आणि ‘नीट’ या अभ्यासक्रमांचा समावेश आहे. आजच्या शिक्षणव्यवस्थेतील एक महत्त्वाची अडचण लक्षात घेऊन ‘इन्फिनिटी वन’ची रचना करण्यात आली आहे. आज विद्यार्थ्यांकडे शिकण्याचे साहित्य मुबलक प्रमाणात उपलब्ध असले, तरी वैयक्तिक लक्ष, वेळेवर मार्गदर्शन आणि शिस्तबद्ध शैक्षणिक पाठबळ अनेकदा मिळत नाही. ‘इन्फिनिटी वन’ अंतर्गत १०० टक्के थेट (लाइव्ह) १:१ ऑनलाइन वर्ग घेतले जातात. त्यामध्ये प्रत्येक विद्यार्थ्यासाठी स्वतंत्र शिक्षक असतो. त्यामुळे शिकण्याचा वेग, ताकद आणि सुधारणा आवश्यक असलेले भाग यानुसार शिक्षणाची रचना केली जाते. प्रत्येक विद्यार्थ्याची सुरुवात सखोल ओळख (इंडक्शन) आणि निदानात्मक मूल्यांकनाने होते. त्यानंतर शालेय अभ्यासक्रम आणि स्पर्धा परीक्षांच्या उद्दिष्टांशी सुसंगत असा वैयक्तिक शैक्षणिक आराखडा तयार केला जातो. थेट वर्गांबरोबरच सातत्यपूर्ण मूल्यमापन, हस्तलिखित उत्तरपत्रिकांचे परीक्षण, रेकॉर्ड केलेले सत्र, एकत्रित शैक्षणिक साधने आणि २४ तास शंका निरसनाची सुविधा दिली जाते.

## राष्ट्रभक्तीचा संदेश पोहोचवण्याचा मुख्य उद्देश – माधुरी मिसाळ

### श्री गुरु तेग बहादूरजी यांच्या ३५० व्या शाहिदी समागमाच्या निमित्त नांदेडमध्ये भव्य कार्यक्रम

**नांदेड (दै. संध्या) :**



श्री गुरु तेग बहादुरजी यांच्या ३५० व्या शाहिदी समागमाच्या निमित्ताने ‘हिंद दी चादर’ अंतर्गत नांदेड येथे २४ व २५ जानेवारी रोजी भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती अल्पसंख्याक व औकाफ राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी दिली. हा दोन दिवसीय कार्यक्रम मोठ्या प्रमाणावर होणार असून यामध्ये देशभरातून १० ते १२ लाख नागरिकांची उपस्थिती अपेक्षित असल्याचे त्यांनी सांगितले.

या ऐतिहासिक कार्यक्रमाला केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह विविध राज्याचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे यांच्यासह अनेक मंत्री, संत-महंत यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. विविध समाजघटकांचा सहभाग या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य असून सिख, सिकलीगर, बंजारा, लबाना, सिंधी, मोहयाल, वाल्मिकी, उदासीन, भगत नामदेव वारकरी संप्रदायातील मोठ्या संख्येने नागरिक या समागमात सहभागी होणार आहेत.

या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांपर्यंत व तरुण पिढीपर्यंत देशासाठी बलिदान देणाऱ्या महान व्यक्तिमत्त्वांची माहिती पोहोचवणे हा आहे. श्री गुरु तेग बहादुरजी यांनी धर्म, मानवता व राष्ट्रासाठी दिलेले सर्वोच्च बलिदान आजच्या पिढीपर्यंत पोहोचल्यास त्यांच्या मनामध्ये राष्ट्रभक्ती, त्याग व सामाजिक ऐक्याची भावना अधिक दृढ होईल, असे राज्यमंत्री मिसाळ यांनी नमूद केले.

दि. २५ जानेवारी रोजी होणारा मुख्य कार्यक्रम यशस्वी करून श्री गुरु तेग बहादुरजी यांच्या बलिदानाचा संदेश संपूर्ण महाराष्ट्रात पोहोचवण्याचा संकल्प असल्याचेही त्यांनी सांगितले. या भव्य समागमाच्या माध्यमातून सामाजिक एकोपा, राष्ट्रीय एकात्मता आणि सांस्कृतिक मूल्यांचा जागर करण्यात येणार असल्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले.

## देशभरातील गुंतवणूकदारांकरिता खास अभियानाला प्रारंभ

**मुंबई (दै. संध्या) :**



फ्रँकलिन टेम्पलटन (इंडिया) ने 'चेंज द सोच - कन्याकुमारी टू काश्मीर ड्राइव्ह' या आपल्या देशव्यापी मोहिमेला आज हिरवा झेंडा दाखवला. सर्वसामान्यांमध्ये विशेषतः महिलांमध्ये आर्थिक सक्षमीकरणाला प्रोत्साहन देण्यासाठी सरु करण्यात आलेले हे अशा प्रकारचे पहिले अभियान आहे. भारतात फ्रँकलिन टेम्पलटनच्या वाटचालीला ३० वर्ष पूर्ण झाल्याबद्दल ही ३० दिवसांची मोहिम देशाचे दक्षिण टोक असलेल्या कन्याकुमारीपासून सुरू होईल आणि देशातील २१ शहरांमधून प्रवास करत जम्मू आणि काश्मीरमधील श्रीनगरमध्ये तिची सांगता होईल. उपस्थितांशी संवाद साधणारी आर्थिक शिक्षण सत्रे, तज्ज्ञांचे मार्गदर्शन आणि सामुदायिक सहभाग या आधारे म्युच्युअल फंड गुंतवणुकीचे रहस्य दूर करणे, त्याचबरोबर आपल्या आर्थिक भविष्याची जबाबदारी स्वीकारण्यासाठी हजारो भारतीयांमध्ये आत्मविश्वास निर्माण करणे, हे या मोहिमेचे प्रमुख उद्दिष्ट आहे. देशभरात आर्थिक समावेशनाला प्रोत्साहन देणाऱ्या या मोहिमेचे नेतृत्व फ्रँकलिन टेम्पलटन इंडियाचे अध्यक्ष अविनाश सातवळेकर हे करणार आहेत. या मोहिमेदरम्यान ते दर दोन दिवसाला विविध शहरांतील किंवा गावातील महिला गटांबरोबर गुंतवणूकदार शिक्षण कार्यशाळेतून संवाद साधणार आहेत. या कार्यशाळेत जीवनातील उद्दिष्टे साध्य करण्यासाठी बचत, गुंतवणूक आणि दीर्घकालीन संपत्ती निर्माण करण्याचे महत्त्व हे मुद्दे या महिला गटांसमोर स्पष्ट केले जाणार आहेत. या उपक्रमात विविध क्षेत्रातील घटकांना सहभागी करुन घेतले जाणार आहे. विशेषतः विविध क्षेत्रातील महिलांचा सहभाग मोठ्या प्रमाणात राहणार आहे. यामध्ये शेतकरी (मासेमारी समुदाय ते पीकांच्या लागवडीमध्ये प्रत्यक्ष सहभागी असलेल्या महिला), शैक्षणिक क्षेत्र (विद्यार्थीनी, माता, शाळा आणि विद्यापीठातील शिक्षिका), बचत गट (अन्न आणि हातमाग क्षेत्रात कार्यरत महिला), उद्योजक, खासगी आणि सरकारी क्षेत्रातील महिला कर्मचारी त्याचबरोबर सैन्य, नौदल आणि पोलिस कर्मचारी या क्षेत्रातील महिलांचा समावेश राहणार आहे.

या उपक्रमाविषयी बोलताना फ्रँकलिन टेम्पलटन-इंडियाचे अध्यक्ष अविनाश सातवळेकर म्हणाले, "भारताच्या दीर्घकालीन सामाजिक-आर्थिक प्रगतीसाठी महिलांमध्ये आर्थिक साक्षरता हा अतिशय मूलभूत आणि महत्वाचा घटक राहणार आहे. शहरांनी आर्थिक साक्षरेतबाबत प्रगती साध्य केली असली तरीही भारतातील टियर टू आणि टियर थ्री प्रदेशांमधील लाखो महिला आर्थिक ज्ञान आणि वित्तीय पर्यायांच्या उपलब्धतेबाबत आजही वंचित आहेत. या उपक्रमाद्वारे आम्ही विविध क्षेत्रातील महिलांशी संवाद साधणार आहोत आणि त्यांना बचत, गुंतवणूक आणि डिजिटल वित्तीय पर्याय स्वीकारण्यासाठी ज्ञान प्रदान करताना त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण करत अधिक सक्षम करणार आहोत."

ते पुढे म्हणाले, "जेव्हा महिला परिपूर्ण आर्थिक निर्णय घेतात, तेव्हा त्यांचे कुटूंब अधिक लवचिक बनू शकते. यातून समुदायांची भरभराट होऊ शकते आणि देश समावेशक विकासाच्या अधिक जवळ जाऊ शकतो. ही दरी भरून काढणे हे शिक्षणापेक्षाही अधिक महत्वाचे आहे. खासकरुन २०४७ पर्यंत विकसित भारत (विकसित राष्ट्राचा दर्जा) साकारण्याचा आणि अधिक समावेशक तसेच शाश्वत आर्थिक परिसंस्था निर्माण करण्याच्या भारताच्या महत्त्वाकांक्षेच्या दिशेने टाकलेले हे एक महत्त्वाचे पाऊल ठरणार आहे."

## सूर्यदयो स्मॉल फायनान्स बँकेचा गोल्ड लोन व्यवसायात प्रवेश

**नवी दिल्ली (दै. संध्या) :**



■ सुरक्षित कर्जवाढ धोरणाअंतर्गत देशभर टप्प्याटप्प्याने विस्तार

सूर्यदयो स्मॉल फायनान्स बँक (SSFB), भारतातील एक अग्रगण्य न्यू-एज डिजिटल बँक, यांनी सुरक्षित कर्जवाढीच्या व्यापक धोरणाचा भाग म्हणून “गोल्ड लोन” विभागात प्रवेश केल्याची घोषणा केली आहे. या सेवेची सुरुवात महाराष्ट्रातून करण्यात आली असून, येत्या काही महिन्यांत इतर राज्यांमध्ये टप्प्याटप्प्याने विस्तार करण्यात येणार आहे. गोल्ड लोन बाजारात प्रवेश करणे हे सूर्यदयो स्मॉल फायनान्स बँकेच्या विविध, पूर्ण-सेवा रिटेल बँक म्हणून होत असलेल्या सातत्यपूर्ण परिवर्तनाचे द्योतक आहे, ज्यामध्ये संतुलित आणि सुरक्षित मालमत्ता मिश्रणावर भर देण्यात आला आहे. हा निर्णय बँकेच्या अधिक सुरक्षित, तारण-आधारित आणि सूक्ष्म कर्ज पोर्टफोलिओ उभारण्याच्या धोरणाशी सुसंगत आहे, ज्यामुळे विद्यमान तसेच नव्या ग्राहकांच्या बदलत्या कर्ज गरजा पूर्ण करता येतील. गोल्ड लोनमध्ये प्रवेश हा बँकेच्या प्रवासातील एक स्वाभाविक आणि धोरणात्मक टप्पा आहे. गेल्या अनेक वर्षांत SSFB ने अनसिक्योर्ड व्यवसाय कर्जामध्ये मजबूत पाया घातला आहे, विशेषतः महिला उद्योजकांना पाठबळ देत त्यांना व्यवसाय सुरू करण्यास, वाढविण्यास आणि टिकवून ठेवण्यास मदत केली आहे. या व्यवसायांच्या वाढीसोबतच त्यांच्या कार्यभांडवलाच्या गरजाही वाढल्या आहेत. अनेक दीर्घकालीन ग्राहकांनी बँकेकडे विश्वासार्ह आणि पारदर्शक गोल्ड लोन सोल्यूशनची मागणी केली होती.

# पुणे ग्रँड टूरच्या निमित्ताने शहराच्या भिंती झाल्या 'बोलक्या'

## भिंतींवर साकारला क्रीडा आणि संस्कृतीचा वारसा!

**पुणे (दै. संध्या) :**




पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहरात होत असलेल्या 'बजाज पुणे ग्रँड टूर २०२६' या ऐतिहासिक सायकलिंग स्पर्धेच्या पार्श्वभूमीवर या दोन्ही महानगरातील भिंती अक्षरशः बोलू लागल्या आहेत. शहराचे सौंदर्य वाढवण्यासाठी आणि नागरिकांमध्ये खेळाप्रती उत्साह निर्माण करण्यासाठी महापालिकेच्यावतीने ठिकठिकाणी आकर्षक भित्तिचित्रे साकारण्यात आली आहेत. यामुळे रस्ते केवळ रहदारीचे मार्ग न राहता, ते आता एक मुक्त कलादालन वाटू लागले आहेत.

या भित्तिचित्रांमध्ये केवळ सायकलिंगच नव्हे, तर विविध खेळांतील दिग्गज आणि उगवत्या ताऱ्यांचा गौरव करण्यात आला आहे. यामध्ये प्रामुख्याने २०२० चा रोड वर्ल्ड चॅम्पियनचा असलेला इटलीचा एलिसा बालसामो याचे चित्र क्रीडाप्रेमींचे लक्ष वेधून घेत आहे. जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत सहभागी होणारे पहिले भारतीय रोड सायकलपटू अरविंद पवार यांचे चित्र आजच्या तरुणाईसाठी प्रेरक आहे.

२०२५ च्या ट्रॅक आशिया कपमध्ये सुवर्णपदक जिंकणाऱ्या हर्षिता जाखड यांचे चित्र 'वुमन पॉवर'चा संदेश देणारे आहे. सायकलिंगच्या क्षेत्रात देशाचे नाव उज्ज्वल करणाऱ्या अल्ट्रा-सायकलपटू कबीर यांच्या संघर्षाची गाथा भिंतीवर रेखाटली आहे.

केवळ खेळाडूच नव्हे, तर महाराष्ट्राची गौरवशाली परंपरा आणि संस्कृतीचे दर्शनही या भिंतींवर घडते. एका बाजूला 'वारी' आणि पारंपारिक वेशभूषेतील स्त्री-पुरुषांची चित्रे आहेत, तर दुसऱ्या बाजूला बास्केटबॉल, वेटलिफ्टिंग, योग आणि टेनिस खेळणाऱ्या महिलांची चित्रे 'Women of Pune' या संकल्पनेखाली साकारण्यात आली आहेत. 'भारतातील पहिली जागतिक सायकलिंग स्पर्धा' असा उल्लेख असलेली ही चित्रे पुण्याला जागतिक क्रीडा नकाशावर नेण्यासाठी सज्ज झाली आहेत.

महापालिका आयुक्त श्रावण हर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली पुणे आणि पिंपरी-चिंचवड महानगरपालिका माध्यमातून शहराच्या सौंदर्यीकरणाचा हा प्रकल्प राबवण्यात आला आहे.

सिमेंटच्या निर्जीव भिंतींवरील रंग, कला आणि संस्कृतीचा हा सुंदर संगम पाहून नागरिक समाधान व्यक्त करत आहेत. सायकल चालवणाऱ्या आणि व्यायाम करणाऱ्या नागरिकांसाठी यामुळे उत्साहवर्धक वातावरण तयार झाले आहे.

"शहरातील भिंतींवर आपले खेळाडू आणि आपली संस्कृती पाहताना अभिमान वाटतो. यामुळे केवळ शहराचे रूपच पालटले नाही, तर खेळाबद्दलची जागृतीही वाढली आहे,"

अशी प्रतिक्रिया एका स्थानिक नागरिकाने दिली. 'बजाज पुणे ग्रँड टूर' च्या निमित्ताने झालेला हा कलेचा आविष्कार पुणेकरांसाठी एक मोठी पर्वणी ठरत असून या कलेच्या माध्यमातून पिंपरी चिंचवडमध्ये क्रीडा उत्सवासाठी योग्य वातावरण निर्मिती झाली आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...




### लातूर जिल्हा मित्र मंडळाचे 41 वे रक्तदान शिबीर आकुर्डी येथे संपन्न

पिंपरी (दैनिक संध्या) : लातूर जिल्हा मित्र मंडळ आणि सुप्रीम हॉस्पिटल यांच्या वतीने ४१ वे रक्तदान शिबीर रविवारी (दि. १८) रोजी आकुर्डी प्राधिकरण, जय हिंद चौक येथे सकाळी ९ ते दुपारी ३ या वेळेत आयोजित करण्यात आले होते. कार्यक्रमाचे उद्घाटन उद्योजक लक्ष्मीकांत कोल्हे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष उद्योजक बाबूराव सगावकर, प्रमुख पाहुणे उद्योजक अजय मुंगडे, प्रा. रामदास बिरादार, अध्यक्ष नंदकिशोर गुंजोटे, उपाध्यक्ष संगनाथ राऊत, राहुल देशमुख, सचिव औदुंबर नाईक, कार्याध्यक्ष भास्कर जगताप, मंडळाचे कार्यकर्ते प्रमोद गंगापुरे, मयुर कुमदाळे, प्रशांत गुंजोटे, महेश राऊत, विवेक जगताप, देवानंद गंगापुरे, चेतन गंगापुरे, विवेक दळवी आदी उपस्थित होते. गेल्या ४० वर्षांपासून लातूर जिल्हा मित्र मंडळ सातत्याने रक्तदान शिबिराचे आयोजन करत आहे. उपक्रमाचे हे ४१ वे वर्ष आहे. यावर्षी १०९ पेक्षा अधिक नागरिकांनी रक्तदान केले. पिंपरी सेरॉलॉजिकल रक्तपेढी येथे संकलित रक्त पिशव्या देण्यात आल्या.

### राष्ट्रवादीकडून जि.प.-पं.स. उमेदवार जाहीर, भाजपला 24 तासांचा अल्टिमेटम

वडगाव मावळ (दैनिक संध्या) : मावळ तालुक्यातील जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवारांच्या नावांची घोषणा आमदार सुनील शेळके व तालुकाध्यक्ष गणेश खांडगे यांनी पत्रकार परिषदेत केली. दरम्यान, वराळे पंचायत समिती गणातील उमेदवारीबाबत भाजप कोअर कमिटी अध्यक्षांनी दिलेला शब्द पाळावा यासाठी 24 तासांचा अल्टिमेटम देत या गणातील उमेदवारी नंतर जाहीर करू, असेही स्पष्ट केले. पत्रकार परिषदेस राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष विठ्ठलराव शिंदे, ज्येष्ठ नेते बबनराव भेगडे, गणेश ढोरे, रामनाथ वारिंगे, नारायण ठाकर, प्रकाश पवार, प्रवक्ते राज खांडभोर, युवक अध्यक्ष किशोर सातकर, विद्यार्थी सेलचे अध्यक्ष सुशांत बालगुडे आदी उपस्थित होते. या वेळी तालुकाध्यक्ष खांडगे यांनी तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या 5 गटांतील व पंचायत समितीच्या 10 पैकी 9 जागांवरील पक्षाचे उमेदवार जाहीर केले. यावेळी आमदार शेळके यांनी बोलताना युतीबाबत भाजपच्या स्थानिक नेत्याकडून होत असलेल्या दुटप्पी भूमिकेबाबत टीका केली. एकीकडे प्रस्ताव द्यायचा आणि आमचाच उमेदवार पळवून न्यायचा, स्थानिक नेत्यांनी युती करणार नाही म्हणायचे आणि वरिष्ठ नेत्यांनी युतीसाठी फोन करायचे असे प्रकार भाजपकडून सुरू आहेत. त्यामुळे आता त्यांनी कुठलाही प्रस्ताव आणू नये आम्ही निवडणूक लढायला सज्ज आहोत, असे स्पष्ट केले. दरम्यान, भाजप कोअर कमिटी अध्यक्ष निवृत्ती शेटे यांनी वराळे पंचायत समिती गणात राजेंद्र कडलक यांना उमेदवारी दिल्यास आम्ही उमेदवारी घेणार नाही, असा प्रस्ताव दिला होता. आज आम्ही कडलक यांना उमेदवारी जाहीर करतो, त्यांना 24 तासांचा वेळही देतो, त्यांनी दिलेला शब्द पाळावा, असे खुले आव्हान देऊन अन्यथा आम्ही अतुल मराठे यांना उमेदवारी देणार असल्याचेही सांगितले. तसेच, जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणूक राष्ट्रवादी काँग्रेस, रिपब्लिकन पक्ष व स्वाभिमानी रिपब्लिकन पक्ष युतीच्या माध्यमातून लढविणार आहे. रिपब्लिकन पक्षाला खडकाला पंचायत समिती गणामध्ये उमेदवारीची संधी दिली असून, स्वाभिमानी रिपब्लिकन पक्षालाही आगामी काळात योग्य पदाची संधी दिली जाईल, असेही आमदार शेळके व तालुकाध्यक्ष खांडगे यांनी स्पष्ट केले.

### पिंपळे गुरवमध्ये पदपथावर कचऱ्याचा ढिगारा, पादचाऱ्यांचा जीव धोक्यात

पिंपळे गुरव (दैनिक संध्या) : साठ फुटी रोडवरील पदपथावर मोठ्या प्रमाणात कुशन कव्हर व इतर कचरा साचून राहिल्याने पादचाऱ्यांना येथून प्रवास करताना मुख्य रस्त्याचा वापर करावा लागत आहे. यामुळे पादचाऱ्यांना जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे. गेल्या अनेक दिवसांपासून हा कचरा उचलला जात नसल्याने आरोग्य विभागाच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या ठिकाणी स्मशानभूमी असल्यामुळे अंत्यविधीसाठी मोठ्या प्रमाणात नागरिकांची ये-जा असते. तसेच परिसरातील पादचारी, वयोवृद्ध नागरिक, महिला व लहान मुलांसाठी हाच पदपथ सुरक्षित चालण्याचा एकमेव पर्याय आहे. मात्र, पदपथावर कुशन कव्हरचा प्रचंड ढिगारा साचल्यामुळे नागरिकांना नाईलाजाने थेट रस्त्यावरून चालावे लागत असून, अपघाताचा मोठा धोका निर्माण झाला आहे. प्लास्टिक व कापडी कचरा उन्हात सडत असल्याने दुर्गंधी पसरली आहे. परिणामी डास, माशा वाढण्याची शक्यता असून, संसर्गजन्य आजारांचा धोका निर्माण झाला आहे. असे असताना आरोग्य विभागाने या ठिकाणी अद्याप कोणतीही ठोस कारवाई न केल्याने नागरिक संतप्त झाले आहेत. स्मार्ट सिटीची फक्त जाहिरातबाजी सुरू असून, प्रत्यक्षात मूलभूत स्वच्छतेकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप स्थानिक नागरिकांकडून केला जात आहे. पदपथ मोकळा न केल्यास आंदोलनाचा इशाराही नागरिकांनी दिला आहे.

# मावळात भाजपा-राष्ट्रवादी आमनेसामने

**युतीला स्पष्ट नकार**

**वडगाव मावळ (दै. संध्या) :**

मावळ तालुक्यातील आगामी जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांमध्ये भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांच्यात थेट सामना होणार असल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे. राष्ट्रवादी काँग्रेससोबत कोणत्याही परिस्थितीत युती केली जाणार नाही, अशी ठाम भुमिका भाजपचे ज्येष्ठ नेते व माजी राज्यमंत्री संजय भेगडे यांनी सोमवारी (दि. १९) आयोजित पत्रकार परिषदेत स्पष्ट केली. भाजप कार्यालयात झालेल्या या पत्रकार परिषदेमुळे मावळ तालुक्यातील राजकीय वातावरण अधिक तापले असून निवडणूक लढत तीव्र होण्याचे संकेत मिळाले आहेत. भेगडे यांनी यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार सुनील शेळके यांच्या जुन्या वक्तव्याचा उल्लेख करत, तळेगाव दाभाडे नगरपरिषद निवडणुकीत भाजपसोबत युती करून चूक झाली, असे आमदार शेळके यांनी जाहीरपणे मान्य केले होते. त्यामुळे पुन्हा राष्ट्रवादीसोबत युती करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही, असा स्पष्ट संदेश दिला आहे.




भाजपने या निवडणुकीसाठी शिंदेंची शिवसेना आणि रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट) यांच्यासोबत महायुती करण्याचा निर्णय घेतल्याची माहिती भेगडे यांनी दिली. त्यानुसार शिंदेंच्या शिवसेनेला पंचायत समितीच्या टाकवे गणातून, तर रिपब्लिकन पार्टी आठवले गटाला खडकाळे गणातून उमेदवारी देण्यात येणार असल्याचे जाहीर करण्यात आले.

पत्रकार परिषदेत महायुतीच्या जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांसाठी उमेदवारांची पहिली यादी जाहीर करण्यात आली. इंदोरी-वराळे जिल्हा परिषद गटातून मेघा प्रशांत भागवत यांना भाजपकडून अधिकृत उमेदवारी देण्यात आली असून, यामुळे या गटातील लढत अधिक रंगतदार होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

त्यासोबतच इंदोरी गणातून श्रीकृष्ण अण्णासाहेब भेगडे, वराळे गणातून रवींद्र निवृत्ती शेटे, चांदखेड गणातून सुवर्णा बाळासाहेब घोटकुले, उर्से गणातून बाळासाहेब नथू पारखी, काले गणातून सीमा मुकुंदराव ठाकर, कार्ला गणातून रंजना सुरेश गायकवाड, टाकवे गणातून अश्विनी सोमनाथ कोंडे (शिंदेसेना) यांना उमेदवारी देण्यात आली आहे. या पत्रकार परिषदेनंतर मावळ तालुक्यातील राजकीय हालचालींना वेग आला असून, आगामी निवडणुकीत महायुती विरुद्ध राष्ट्रवादी काँग्रेस अशी थेट लढत होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे येत्या काही दिवसांत प्रचार अधिक तीव्र होण्याची चिन्हे दिसून येत आहेत.

**शक्तीप्रदर्शनाची तयारी**

महायुतीकडून पंचायत समितीच्या गणनिहाय उमेदवारांची नावे जाहीर करण्यात आली आहे. उर्वरित उमेदवारांची घोषणा मंगळवारी संध्याकाळी करण्यात येणार असल्याची माहिती देताना भेगडे यांनी सांगितले की, मंगळवारी वडगाव मावळ येथे महायुतीच्या सर्व १५ उमेदवारांचा संयुक्त अर्ज भरण्यासाठी मिरवणूक काढण्यात येणार आहे. या शक्तिप्रदर्शनातून महायुतीची ताकद दाखवली जाणार असल्याचे संकेत देण्यात आले आहेत.

## संविधान चौकात सिग्नलचा खांब कोसळला

**देहूरोड (दै. संध्या) :**

मुंबई-पुणे महामार्गावरील देहूरोड येथील संविधान चौक येथे असलेला वाहतूक सिग्नलचा खांब पडल्याने महामार्गावरील वाहतुकीचा पूर्णपणे बोजवारा उडाला आहे. या घटनेमुळे हजारो वाहनचालकांची मोठी गैरसोय झाली असून, प्रवाशांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. संविधान चौक (सेंट्रल चौक) हा देहूरोड परिसरातील अत्यंत वर्दळीचा चौक असून, मुंबई-पुणे व बंगळुरूच्या दिशेने जाणाऱ्या वाहनांची येथे दिवसभर मोठी गर्दी असते. अशा महत्त्वाच्या चौकात वाहतूक सिग्नलचा खांब कोसळल्यामुळे वाहतुकीचे नियोजन पूर्णपणे कोलमडले आहे. सिग्नल बंद पडल्याने वाहनचालकांना अंदाजाने वाहन चालवावे लागले, परिणामी चौकात गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली आहे. विशेषतः कार्यालयीन वेळेत, शाळा-महाविद्यालयांच्या सुटीच्या सुमारास तसेच अवजड वाहतूक सुरू असताना या

**■ महामार्गावरील वाहतूक विस्कळीत**

घटनेचा मोठा फटका बसला आहे. महामार्गावर दोन्ही बाजूंनी वाहनांच्या लांबच लांब रांगा लागतात. अनेक वाहनचालकांना तासनतास कोंडीत अडकून राहावे लागत आहे. त्यामुळे रुग्णवाहिका, अत्यावश्यक सेवांची वाहने तसेच सार्वजनिक वाहतुकीलाही अडथळा निर्माण झाला असून, या घटनेमुळे अपघाताचा धोकादेखील वाढला होता. सिग्नल नसल्याने काही वाहनचालक नियमांकडे दुर्लक्ष करत चौक ओलांडण्याचा प्रयत्न करत आहेत, ज्यामुळे मोठा अपघात होण्याची शक्यता टळली जाऊ शकत नाही. स्थानिक नागरिकांनी सांगितले, की सिग्नलचा खांब जुना आणि जीर्ण अवस्थेत होता. वेळोवेळी देखभाल न झाल्यामुळेच ही घटना घडल्याचा आरोपही प्रशासनावर करण्यात येत आहे. वाहतुकीचा ताण मोठा असल्याने परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी पोलिसांना मोठी कसरत करावी लागत आहे.

## "नियम पाळा.. कुणीतरी तुमची वाट पाहत आहे"

### इनोव्हेटिव्ह वर्ल्ड स्कूल व RTO यांची भावस्पर्शी रोड सेफ्टी रॅली

**पिंपरी (दै. संध्या) :**

रस्त्यावर होणारा अपघात म्हणजे केवळ एक आकडा नसून, तो कुणाच्या तरी आयुष्याचा अंत, तर कुणाच्या तरी आयुष्यभराची वेदना असते. ही वेदना थांबावी, एकही जीव निष्कारण जाऊ नये, या संवेदनशील भावनेतून इनोव्हेटिव्ह वर्ल्ड स्कूल व प्रादेशिक परिवहन कार्यालय (RTO) यांच्या संयुक्त विद्यमाने रस्ता सुरक्षिततेबाबत जनजागृती करण्यासाठी प्रेरणादायी रोड सेफ्टी रॅलीचे आयोजन करण्यात आले.



या रॅलीस RTO विभागाचे प्रदीप शिंगारे (इन्स्पेक्टर ऑफ व्हेईकल) व शिवानी लाड (असिस्टंट इन्स्पेक्टर, मोटार व्हेईकल) हे मान्यवर अधिकारी उपस्थित होते. शाळेच्या वतीने संचालिका कमला बिष्ट, डॉ. संजय सिंह, शोभना सिंह, तसेच प्राचार्या, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

यावेळी प्रचिती इंटरनॅशनल स्कूलचे चेअरमन श्री. प्रशांत पाटील हे देखील उपस्थित होते. तसेच परिसरातील ज्येष्ठ नागरिकांनीही मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदवून या उपक्रमाला बळ दिले. रॅलीमध्ये सहभागी विद्यार्थ्यांनी हातात फलक घेत "हेल्मेट घाला – कुणाचं तरी घर सुरक्षित ठेवा", "वेग कमी करा, आयुष्य वाढवा", "वाहतूक नियम पाळा – तुमची वाट पाहणारी माणसं आहेत"असे हृदयाला भिडणारे संदेश नागरिकांपर्यंत पोहोचवले.

विद्यार्थ्यांच्या निरागस आवाजातील हा संदेश अनेक वाहनचालकांच्या मनाला थेट भिडला. रॅलीदरम्यान अनेक नागरिक थांबून हा उपक्रम पाहताना दिसून आले. काही वाहनचालकांनी त्या क्षणीच हेल्मेट घालणे, सीट बेल्ट लावणे यासारखे सुरक्षिततेचे नियम पाळण्यास सुरुवात केली. हीच या रॅलीची खरी यशस्वीता ठरली.

या प्रसंगी मान्यवरांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, "रस्ता सुरक्षितता ही केवळ कायद्याची सक्ती नसून प्रत्येक नागरिकाची नैतिक जबाबदारी आहे. विद्यार्थ्यांमधून ही जाणीव निर्माण होणे ही समाजासाठी अत्यंत आशादायक बाब आहे."

शिक्षणासोबतच संस्कार, सामाजिक भान आणि जबाबदारीची जाणीव रुजवणारा हा उपक्रम इननोव्हेटिव्ह वर्ल्ड स्कूलच्या सामाजिक बांधिलकीचे जिवंत उदाहरण ठरला. रॅली संपली... पण तिचा संदेश प्रत्येकाच्या मनात खोलवर कोरला गेला.. "नियम पाळा... कारण कुणीतरी तुमची वाट पाहत आहे."

## स्वीकृत नगरसेवकांची संख्या पाचवरून १०; पदासाठी रस्सीखेच सुरू

**पिंपरी (दै. संध्या) :**

**■ भाजपला सात तर राष्ट्रवादीला तीन स्वीकृत नगरसेवक मिळणार**

पिंपरी-चिंचवड महापालिकेतील स्वीकृत नगरसेवकांची संख्या पाचवरून दहा करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. याबाबत राज्य शासनाने मार्च २०२३ मध्ये आदेश काढले आहेत. त्यानुसार महापालिकेतील संख्याबळाचा विचार करून स्वीकृत नगरसेवकांची संख्या दहा करण्यात आली आहे. यापूर्वी पाच स्वीकृत नगरसेवक होते.




महापालिकेतील विद्यमान संख्याबळानुसार भाजपला सात तर राष्ट्रवादी काँग्रेसला तीन स्वीकृत नगरसेवक मिळण्याची शक्यता आहे. त्यामुळे इच्छुकांची संख्या वाढली असून, दोन्ही पक्षांतर्गत लॉबिंग जोरात सुरू आहे. पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या नुकत्याच पार पडलेल्या निवडणुकीत भाजपने ८४ जागांवर विजय मिळवत स्पष्ट बहुमत मिळवले आहे. राष्ट्रवादी काँग्रेसला ३६ जागा मिळाल्या आहेत. शिवसेना, काँग्रेस आणि इतर पक्षांची संख्या तुलनेने कमी असल्याने स्वीकृत नगरसेवकांच्या नियुक्तीत प्रामुख्याने भाजप आणि राष्ट्रवादी यांनाच स्वीकृत नगरसेवक पद देता येणार आहे. राज्य शासनाच्या नवीन आदेशानुसार १२ नगरसेवकांच्या मागे एक स्वीकृत याप्रमाणे विभागणी करण्यात आली आहे. त्यानुसार ८४ संख्या बळ असलेल्या भाजपला ७ स्वीकृत नगरसेवक पदे देण्यात येणार आहे. तर ३६ इतके संख्या बळ असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसला तिघांना स्वीकृतपदी संधी देण्यात येईल. भाजपकडून या सात स्वीकृत जागांवर पक्ष संघटनेत दीर्घकाळ काम केलेले पदाधिकारी, निवडणुकीत पराभूत झालेले पण प्रभावी नेते, तसेच सामाजिक क्षेत्रात कार्यरत असलेल्या काही नावांची चर्चा सुरू आहे. विशेषतः पक्षासाठी आर्थिक, संघटनात्मक आणि प्रचारात योगदान दिलेल्यांना प्राधान्य देण्याचा विचार असल्याचे भाजपच्या वरिष्ठ नेत्यांकडून सांगण्यात येत आहे. यामुळे भाजपमधील इच्छुकांची संख्या मोठी असून, अंतिम यादी ठरवताना पक्ष नेतृत्वासमोर मोठे आव्हान उभे राहिले आहे. दुसरीकडे राष्ट्रवादी काँग्रेसकडे तीन स्वीकृत नगरसेवकांची संधी असून, त्यासाठीही पक्षांतर्गत चढाओढ सुरू आहे. निवडणुकीत कमी मतांनी पराभूत झालेले उमेदवार, तसेच शहर पातळीवरील अनुभवी नेते यांना संधी देण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

महापालिकेतील प्रभाव टिकवून ठेवण्यासाठी स्वीकृत नगरसेवकांची भूमिका महत्त्वाची ठरणार असल्याने राष्ट्रवादीकडूनही ही निवड अत्यंत रणनीतीने केली जाणार आहे. स्वीकृत नगरसेवकांची संख्या वाढल्याने महापालिकेतील सत्ताधारी भाजपचे संख्याबळ आणखी मजबूत होणार आहे. याचा परिणाम स्थायी समिती, विषय समित्या तसेच विविध महत्त्वाच्या निर्णयांवर दिसून येणार आहे. त्यामुळे या नियुक्त्यांकडे संपूर्ण राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

# निवडणुक संपली, निकाल लागला, आता कसोटी उत्तरदायित्वाची

**पिंपरी (दै. संध्या) :**

महापालिका निवडणुकीचा निकाल जाहीर होताच शहरात जल्लोषाचे वातावरण निर्माण झाले. विजयी उमेदवारांच्या मिरवणुका, ढोल-ताशांचा गजर, कार्यकर्त्यांची गर्दी आणि सोशल मीडियावरील अभिनंदनाचा वर्षाव शहरभर पाहायला मिळाला.

मतदान प्रक्रिया संपली असली तरी शहराच्या कारभाराची खरी परीक्षा आता सुरू झाली आहे. कारण लोकशाहीचा खरा निकाल मतमोजणी केंद्रात नाही, तर पुढील पाच वर्षांत रस्ते, पाणीपुरवठा, आरोग्यसेवा, शिक्षण, वाहतूक, स्वच्छता आणि नागरिकांच्या दैनंदिन जीवनात दिसून येतो.

निवडणूक प्रचारादरम्यान सर्वच उमेदवारांनी विकासाची



विविध आश्वासने दिली. कुणी स्मार्ट सिटीचे स्वप्न दाखवले, कुणी ट्रॅफिक मुक्त शहराची संकल्पना मांडली, कुणी २४ तास पाणीपुरवठा, स्वच्छ शहर, तर कुणी पर्यावरणपूरक विकासाची दिशा सांगितली. मात्र आता ही आश्वासने केवळ घोषणांपुरती मर्यादित राहणार की प्रत्यक्षात उतरवली जाणार, हा प्रश्न नागरिकांच्या मनात निर्माण झाला आहे.

पिंपरी-चिंचवड शहर हे राज्यातील सर्वात वेगाने वाढणाऱ्या महानगरांपैकी एक मानले जाते. औद्योगिकीकरण, आयटी क्षेत्राची वाढ, मोठ्या प्रमाणातील स्थलांतर आणि रोजगाराच्या संधींमुळे शहराची लोकसंख्या सातत्याने वाढत आहे. या वाढत्या लोकसंख्येसोबतच पायाभूत सुविधांवरील ताणही वाढत चालला आहे.

वाहनांची संख्या, रस्त्यांवरील कोंडी, पाण्याची टंचाई, कचरा व्यवस्थापन, हवेतील वाढते प्रदूषण आणि आरोग्य सेवा यांसारख्या समस्यांचा भार महापालिकेवर वाढत आहे. अशा परिस्थितीत नव्याने निवडून आलेल्या नगरसेवकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरणार आहे.

महापालिका निवडणुकीचा निकाल लागून जल्लोष संपला असला, तरी शहराचा खरा संघर्ष आणि खरा विकासाचा प्रवास आता सुरू झाला आहे. पुढील पाच वर्षांत नगरसेवक, प्रशासन, विरोधी पक्ष आणि नागरिक या सर्वांच्या भूमिकेवर पिंपरी-चिंचवड शहराचा चेहरा कसा असेल, हे ठरणार आहे. लोकशाहीचा उत्सव निवडणुकीपुरता मर्यादित न राहता प्रत्यक्षात उतरतो का, हेच आता पाहावे लागणार आहे.

महापालिकेतील नगरसेवक हा शहर प्रशासनाचा पहिला संपर्कबिंदू असतो. रस्ता, पाणी, ड्रेनेज, कचरा, वीज, आरोग्य सेवा, शाळा, उद्याने, बससेवा अशा मूलभूत सुविधांसाठी नागरिक सर्वप्रथम नगरसेवकांकडेच जातात. त्यामुळे नगरसेवक हा केवळ प्रतिनिधी नसून तो आपल्या प्रभागाचा कारभारी असतो.

प्रभागातील प्रश्न महापालिकेच्या सभागृहात मांडणे, प्रशासनाकडून निधी मिळवणे, विकासकामे वेळेत पूर्ण करणे, ठेकेदारांवर नियंत्रण ठेवणे, आणि नागरिकांच्या तक्रारींचे निराकरण करणे, ही नगरसेवकांची मूलभूत जबाबदारी असते. सभागृहात अभ्यासपूर्ण भूमिका घेणे, शहराच्या विकास आराखड्यावर लक्ष ठेवणे, प्रशासनाला प्रश्न विचारणे आणि आवश्यक असल्यास दबाव टाकणे, ही नगरसेवकांची खरी कसोटी असते. त्यामुळे आगामी काळात नव्याने निवडून आलेल्या नगरसेवकांची कार्यशैली कशी असेल, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

महापालिकेतील विरोधी पक्ष हा लोकशाहीचा महत्त्वाचा घटक मानला जातो. सत्ताधारी पक्षाच्या निर्णयांवर नजर ठेवणे, खर्च आणि कंत्राटांवर प्रश्न उपस्थित करणे, सत्ताधाऱ्यांच्या धोरणांमध्ये सुधारणा सुचवणे आणि प्रशासनाला जबाबदार धरणे, ही विरोधी पक्षाची भूमिका असते.

सक्षम विरोधी पक्ष नसल्यास सत्ताधाऱ्यांच्या निर्णयांवर अंकुश राहत नाही, असा अनुभव नागरिकांनी व्यक्त केला आहे. सभागृहात केवळ गोंधळ घालण्यापेक्षा आकडेवारी, माहिती आणि अभ्यासाच्या आधारे प्रश्न उपस्थित करणे, ही विरोधी पक्षाची खरी जबाबदारी आहे. त्यामुळे या महापालिकेत विरोधी पक्षाची भूमिका किती प्रभावी ठरणार, हे येणाऱ्या काळात पाहण्यासारखे आहे.

**नियोजनबद्ध विकासकामांची अपेक्षा**

दरवर्षी महापालिकेच्या माध्यमातून कोट्यवधी रुपयांचा निधी रस्ते, ड्रेनेज, इमारती, उद्याने, पाणीपुरवठा आणि स्वच्छतेवर खर्च केला जातो. मात्र अनेकदा या कामांच्या गुणवत्तेवर प्रश्न उपस्थित होतात. रस्ता बांधल्यानंतर काही महिन्यांतच तो खोदला जातो, ड्रेनेजची कामे अपुरी राहतात, अशी उदाहरणे शहरात वारंवार पाहायला मिळतात. त्यामुळे नागरिकांमध्ये केवळ कामे होण्यापेक्षा दर्जेदार, टिकाऊ आणि नियोजनबद्ध विकासकामे होण्याची अपेक्षा वाढली आहे. यासाठी नगरसेवक आणि प्रशासन यांच्यात समन्वय असणे आवश्यक आहे. कामांचे नियोजन आणि काम पूर्ण झाल्यानंतरची देखभाल या सर्व टप्प्यांवर पारदर्शकता राखणे गरजेचे आहे. अन्यथा विकासाच्या नावाखाली निधी खर्च होतो, पण नागरिकांच्या समस्यांचा प्रश्न कायम राहतो.

# महाराष्ट्र राज्य मुख्याध्यापक महामंडळाच्या पाठपुराव्याला मोठे यश

## दहावी-बारावी बोर्ड परीक्षेसाठी कर्मचाऱ्यांची अदलाबदल रद्द



**जेजुरी (दै. संध्या)**

महाराष्ट्र राज्य मुख्याध्यापक महामंडळाच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश मिळाले असून यंदाच्या दहावी व बारावी बोर्ड परीक्षांसाठी केंद्र संचालक, पर्यवेक्षक, शिपाई तसेच इतर कर्मचाऱ्यांची अदलाबदल रद्द करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. हा निर्णय महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे आणि महाराष्ट्र राज्य मुख्याध्यापक महामंडळ, मुंबई यांच्या संयुक्त सहविचार सभेत घेण्यात आला.

ही बैठक आज पुणे येथील राज्य मंडळाच्या कार्यालयात पार पडली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी राज्य मंडळाचे अध्यक्ष डॉ. त्रिगुण कुलकर्णी होते. यावेळी महाराष्ट्र राज्य मुख्याध्यापक महामंडळाने मांडलेल्या मागण्यांना सकारात्मक प्रतिसाद देत डॉ. कुलकर्णी यांनी कर्मचाऱ्यांची अदलाबदल रद्द करण्याचे आदेश येत्या दोन दिवसांत काढण्यात येतील, असे स्पष्ट केले.

या बैठकीत बोर्ड परीक्षांबाबत अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. बोर्ड परीक्षेच्या सर्व प्रकारच्या मानधनांमध्ये १० ते १५ टक्के वाढ करण्यात येणार आहे. तसेच बोर्डाच्या कामकाजाची सविस्तर माहिती सर्व संबंधितांना उपलब्ध व्हावी यासाठी एस.ओ.पी. (मानक कार्यपद्धती) तयार करून मार्गदर्शक पुस्तिका शाळांना वितरित करण्यात येणार आहे.

मुख्याध्यापकांवर कस्टोडियन, केंद्रप्रमुख आदी विविध जबाबदाऱ्या असल्याने त्यांना उत्तरपत्रिका तपासणीच्या कामातून वगळण्याबाबत सकारात्मक विचार करण्यात आला असून त्यासाठी नवीन पॅनल तयार करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. यापुढे फक्त मान्यताप्राप्त शिक्षकांनाच उत्तरपत्रिका तपासणीसाठी नियुक्त केले जाणार असून मानधन तत्त्वावर असलेल्या शिक्षकांना या कामातून वगळण्यात येणार आहे.

प्रश्नपत्रिकांची कस्टडीपासून शाळेपर्यंत वाहतूक करताना पोलिस किंवा होमगार्डचे संरक्षण देण्यात येणार आहे. एक हजारपेक्षा जास्त विद्यार्थीसंख्या असलेल्या परीक्षा केंद्रांना प्रश्नपत्रिका व उत्तरपत्रिका वाहतुकीसाठी वाहन सुविधा देण्यात येणार आहे. तसेच उत्तरपत्रिका पोस्ट खाते कस्टडीवरून संकलित करणार आहेत.

विद्यार्थ्यांच्या नावामध्ये बदल असल्यास जनरल रजिस्टर बोर्डात न नेता मुख्याध्यापक व शिक्षणाधिकारी यांनी साक्षांकित केलेली प्रत ग्राह्य धरली जाणार आहे. बोर्ड परीक्षांसाठी शाळांना लागणाऱ्या स्टेशनरी व छपाई खर्चासाठी स्वतंत्र खर्च मंजूर करण्यात येणार आहे.

विद्यार्थ्यांना गुणपत्रक व प्रमाणपत्र एकत्र देण्यात येणार असून त्यावर सुरक्षा मानकांसह क्यू.आर. कोड उपलब्ध करून दिला जाणार आहे. विद्यार्थ्यांची नावे इतर अधिकृत नोंदीप्रमाणे दुरुस्त करण्यासही मान्यता देण्यात आली आहे.

नवीन शाळांना मंडळ संकेतांक देताना फक्त पहिल्या वर्षी प्रत्यक्ष तपासणी करण्यात येईल. त्यानंतर पुढील चार वर्षे ऑनलाईन पद्धतीने मान्यता दिली जाणार आहे. जुन्या शाळांना कायमस्वरूपी संकेतांक मान्यता देण्याची प्रक्रिया लवकरच सुरू करण्यात येणार आहे. सीसीटीव्ही संदर्भात शाळा व संस्थांनी सकारात्मक प्रतिसाद द्यावा, असे आवाहनही यावेळी करण्यात आले.

तसेच शिक्षण संक्रमण (Education Migration) ही प्रक्रिया ऑनलाईन पद्धतीने वेबसाईटवर उपलब्ध करून देण्यात येणार असून त्यासाठी आकारली जाणारी फी अल्प दरात ठेवण्यात येईल, असेही बैठकीत स्पष्ट करण्यात आले.

या सर्व मागण्यांसाठी महाराष्ट्र राज्य मुख्याध्यापक महामंडळाने राज्य मंडळाकडे सातत्याने पाठपुरावा केला होता. आजच्या बैठकीसाठी बोर्डाचे दिपक माळी यांच्यासह इतर अधिकारी उपस्थित होते.

महामंडळाच्या वतीने राज्य सचिव,राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त प्राचार्य नंदकुमार सागर, उपाध्यक्ष सुनील पंडित, डॉ. डी. एस. घुगरे, विद्या समिती सचिव संजयकुमार झांबरे, महेंद्र गणपुले, कोल्हापूर विभाग अध्यक्ष बी. बी. पाटील, सुधाकर जगदाळे, कोल्हापूर जिल्हा मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष राहुल पवार, सचिव आर. वाय. पाटील, पुणे जिल्हा अध्यक्ष प्रसाद गायकवाड, सांगली जिल्हा सचिव संतोष नाईक, ज्ञानदेव बेरड (अहमदनगर), कुंडलिक मेमाणे आदी मान्यवर उपस्थित होते.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### ॲड. मालिनी शिंदे यांची चाकण मंडल अध्यक्षपदी निवड

चाकण (दैनिक संध्या) : भारतीय जनता पार्टीच्या संघटनात्मक बांधणीला अधिक बळकटी देण्यासाठी येथील ॲड. मालिनी प्रीतम शिंदे यांची भाजप महिला मोर्चा चाकण मंडल अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आल्याचे पत्र मंडल अध्यक्ष भगवान मेदनकर यांच्या हस्ते देण्यात आले. चाकण शहरात गेल्या अनेक वर्षापासून ॲड. मालिनी शिंदे या सामाजिक, शैक्षणिक व महिला सक्षमीकरणाच्या क्षेत्रात सक्रियपणे कार्यरत आहेत. कायदेविषयक ज्ञान, संघटन कौशल्य आणि तळागाळातील महिलांशी असलेला त्यांचा थेट संपर्क यामुळे त्या पक्षाच्या कार्यात नियमित अग्रेसर राहिल्या आहेत. त्यांच्या कार्याची दखल घेऊन पक्षाच्या वरिष्ठ नेतृत्वाने त्यांच्यावर ही महत्त्वाची जबाबदारी सोपवली आहे. महिला मोर्चाच्या माध्यमातून केंद्र व राज्य सरकारच्या विविध लोककल्याणकारी योजना प्रत्येक महिलांपर्यंत पोहोचवणे, महिलांना राजकीय सामाजिक दृष्ट्या सक्षम करणे आणि संघटन अधिक मदत करणे हेच माझे प्रमुख उद्दिष्ट राहील, असे ॲड. मालिनी शिंदे यांनी सांगितले.

### वाफगाव-रेटवडी गटात तिरंगी लढत

राजगुरुनगर (दैनिक संध्या) : खेड तालुक्यातील वाफगाव-रेटवडी जिल्हा परिषद गटाच्या सर्वसाधारण महिला जागेसाठी निवडणूक रंगतदार ठरण्याची चिन्हे असून निवडणुकीपूर्वीच प्रचारामुळे उमेदवारांमध्ये मोठी चुरस निर्माण झाली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) कडून संभाव्य उमेदवार अश्विनी पाचारणे व माजी जि. प. सदस्या डॉ. रोहिणी राक्षे, तर शिवसेनेकडून (उद्धव बाळासाहेब ठाकरे) दीप्ती भोगाडे आणि शिवसेना (शिंदे गट) कडून रोहिणी थिगळे या चार महिला नेत्या निवडणुकीच्या रिंगणात आहेत. जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांसाठी दि. 16 जानेवारीपासून उमेदवारी अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू झाली असली, तरी वाफगाव-रेटवडी गटात आजपर्यंत (दि. 19) एकही अर्ज दाखल झालेला नाही. त्यामुळे कोणत्या पक्षाकडून नेमकी कोण उमेदवार असेल, याकडे मतदारांचे लक्ष लागले आहे. चारही संभाव्य उमेदवार सक्षम व सक्रिय नेतृत्व करणाऱ्या असल्याने लढत अधिकच चुरशीची होण्याची शक्यता आहे. या गटात पिण्याच्या पाण्याची व शेतीसाठी मुबलक पाण्याची समस्या, ठाकर वस्त्यांचा सर्वांगीण विकास, रस्ते, सुरळीत बससेवा, शिक्षण व आरोग्य असे अनेक प्रश्न प्रलंबित आहेत. निवडणुकीपूर्वीचा प्रचारखर्च पाहता उमेदवार सक्षम असल्याचे चित्र आहे. मात्र हे प्रश्न प्रत्यक्षात कितपत सोडवले जातील, हे पुढील काळात स्पष्ट होणार आहे. निवडणूक जाहीर होण्यापूर्वीच काही उमेदवारांनी गटातील गाव-वाड्या पिंजून काढत आरोग्य शिबिरे, मोफत तपासणी व औषधवाटप, साड्यांचे वाटप, तसेच देव-देवतांच्या सहलींचे आयोजन करून मतदारांशी संपर्क वाढविला आहे. सार्वजनिक कार्यक्रमांत सहभाग, लोकांच्या सुख-दुःखात उपस्थिती आणि सर्व वयोगटांशी थेट संवाद यावर भर देण्यात आला आहे. निवडणूक जाहीर झाल्यानंतरही कार्यकर्ते व कुटुंबीयांच्या माध्यमातून संपर्क मोहिम सुरूच आहे.

### शिरूरच्या बेट भागात राष्ट्रवादीत मोठे बंड

शिरूर (दैनिक संध्या) : तालुक्यातील बेट भागात जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या तोंडावर मोठा राजकीय भूकंप झाला आहे. कवठे येमाई-टाकळी हाजी जिल्हा परिषद गटात राष्ट्रवादी काँग्रेसकडून राजेंद्र गावडे यांची उमेदवारी कापून दामूआण्णा घोडे यांना संधी देण्यात आल्याने गावडे घराण्याने राष्ट्रवादीला रामराम ठोकण्याचे संकेत दिले आहेत. गेल्या अनेक वर्षांपासून पक्षाशी एकनिष्ठ राहिलेल्या गावडे कुटुंबाला डावलल्यामुळे ते आता भाजपमध्ये प्रवेश करण्याच्या तयारीत असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. जिल्हा परिषदेसाठी हा गट सर्वसाधारण झाल्यापासून राजेंद्र गावडे यांनी जोरदार प्रचार सुरू केला होता. माजी आमदार पोपटराव गावडे यांनी राष्ट्रवादीला साथ देत दिलीप वळसे पाटील यांच्या नेतृत्वाखाली काम केले होते. मात्र, दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र आल्यानंतर अचानक राजकीय समीकरणे बदलली. राष्ट्रवादी (शप) पक्षाकडून इच्छुक असलेल्या टाकळी हाजीच्या माजी सरपंचांना राष्ट्रवादीकडून उमेदवारी जाहीर झाल्याने गावडे समर्थकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. या अनपेक्षित निर्णयामुळे राजेंद्र गावडे यांची आठ वर्षांची मेहनत आणि जनसंपर्क दुर्लक्षित झाल्याची भावना कार्यकर्त्यांनी व्यक्त केली आहे. या पार्श्वभूमीवर माजी आमदार पोपटराव गावडे यांनी कार्यकर्त्यांची तातडीची बैठक घेतली. कार्यकर्त्यांचा सन्मान सर्वोच्च असून, लवकरच पुढची भूमिका जाहीर करू, असे त्यांनी सांगितले.

## पुरंदर तालुक्यातून दोन अर्ज दाखल

**सासवड (दै. संध्या)**

पुरंदर तालुक्यातील जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राजकीय हालचालींना वेग आला असून आज उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या पहिल्याच टप्प्यात महत्त्वपूर्ण घडामोडी घडल्या. राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) यांच्या वतीने बेलसर-माळशिरस जिल्हा परिषद गटासाठी अमोल दत्तात्रय कामठे यांनी आपला उमेदवारी अर्ज अधिकृतरीत्या दाखल केला. आज एकूण दोन उमेदवारी अर्ज प्राप्त झाले असून, यामध्ये शिवसेनेकडून शिवाजी कामठे यांनी बेलसर पंचायत समितीच्या गणासाठी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. वकास, पारदर्शकता आणि जनतेच्या प्रश्नांना प्राधान्य हेच आपले प्रमुख मुद्दे असतील, अशी प्रतिक्रिया अमोल कामठे यांनी अर्ज दाखल केल्यानंतर दिली. दरम्यान, अर्ज विक्रीच्या बाबतीत आजचा दिवस ऐतिहासिक ठरला. एकाच दिवसात तब्बल 183 उमेदवारी अर्जांची विक्रमी विक्री झाल्याची माहिती निवडणूक कार्यालयाकडून देण्यात आली आहे. ही संख्या पाहता पुरंदर तालुक्यातील जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांमध्ये मोठ्या प्रमाणावर इच्छुक उमेदवार रिंगणात उतरण्याची शक्यता वर्तवली जात आहे. येत्या दोन दिवसांत अर्ज दाखल करण्यासाठी मोठी गर्दी होण्याची शक्यता असून प्रशासनाने त्यादृष्टीने तयारी केली आहे.

## शिवजयंतीनिमित्त १९ फेब्रुवारीला राज्यस्तरीय आंतरशालेय वकृत्व स्पर्धा

**चाकण (दै. संध्या)**



किल्लेदार पुरातत्व व वस्तूसंग्रहालये पुणे विभाग व किल्लेदार फिरंगोजी नरसाळा स्मारक प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने चाकण येथे शिवजयंती निमित्त गुरुवारी (दि.१९ फेब्रुवारी) भव्य राज्यस्तरीय आंतरशालेय वकृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आल्याची माहिती किल्लेदार फिरंगोजी नरसाळा स्मारक प्रतिष्ठानचे अध्यक्ष ॲड. किरण झिंजुरके यांनी दिली.

चाकण येथे वरील नियोजित दिवशी सकाळी ९:३० वाजता या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. भारतीय संस्कृती संजीवक छत्रपती शिवाजी महाराज, शहाजीराजे भोसले एक ध्येयवादी पिता, आई तू जिजाऊ हो, उज्वल उद्यासाठी दुर्गे अभ्यास व दुर्ग संवर्धन आणि श्री संग्रामदुर्ग शिवसंस्कार केंद्र व्हावे म्हणून... हे विषय वकृत्व स्पर्धेसाठी देण्यात आले आहेत. वकृत्व स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवणाऱ्या विजेत्यास रोख पाच हजार रुपये, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र, द्वितीय क्रमांकास रोख तीन हजार रुपये, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र, तृतीय क्रमांकास रोख दोन हजार रुपये, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे.

मुख्याध्यापक व शिक्षक यांनाही उत्कृष्ट मार्गदर्शक म्हणून सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र दिले जाणार आहे. त्याचप्रमाणे सर्व सहभागी विद्यार्थी व शाळांना सहभागाबद्दल प्रमाणपत्र दिले जाणार आहे. विशेष म्हणजे दोन्ही विद्यार्थ्यांचे मिळून सर्वाधिक गुण मिळवणाऱ्या शाळेला विजेतेपदाचा शौर्यभूमी श्री संग्रामदुर्ग करंडक प्रदान करण्यात येणार आहे.

कोण होणार महाशिववक्ता या अंतर्गत प्रत्येक शाळेच्या सहावी ते नववी या इयतेतील दोन विद्यार्थ्यांचा एकच गट स्पर्धेत सहभाग घेऊ शकतील. स्पर्धेमध्ये प्रवेश निश्चित करण्यासाठी शाळेने गुगल फॉर्म भरणे आवश्यक आहे.

या स्पर्धेत जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी भाग घेऊन आपले कौशल्य दाखवावे, असे आवाहन किल्लेदार फिरंगोजी नरसाळा स्मारक प्रतिष्ठानचे अध्यक्ष व स्पर्धेचे संयोजक ॲड. किरण झिंजुरके, सेवानिवृत्त शिक्षक राजेंद्र दीक्षित व डॉ. विलास वहाणे यांनी केले आहे.

## होतकरू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप

**लोणी काळभोर (दै. संध्या)**



आळंदी म्हातोबा येथील श्री म्हातोबा माध्यमिक विद्यालयात संदेश आव्हाळे यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने सामाजिक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. या प्रसंगी शाळेतील होतकरू व गरजू विद्यार्थ्यांना वह्या, पुस्तके व इतर शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.शिक्षण हेच खरे भविष्य घडविण्याचे साधन आहे, या भावनेतून हा उपक्रम राबविण्यात आला. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद आणि आत्मविश्वास दिसून येत होता.

या कार्यक्रमास अजय जवळकर, महेश जवळकर व प्रज्वल शेलार यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच शाळेचे मुख्याध्यापक व शिक्षक सेवक यांनीही उपस्थित राहून या उपक्रमाचे कौतुक केले.

यावेळी मुख्याध्यापकांनी आपल्या मनोगतातून सांगितले की, "वाढदिवस सामाजिक उपक्रमातून साजरा करण्याची ही प्रेरणादायी बाब असून विद्यार्थ्यांना नवी दिशा देणारी आहे."

संदेश आव्हाळे यांच्या या उपक्रमामुळे समाजोपयोगी जाणीव आणि शिक्षणाबाबतची बांधिलकी अधोरेखित होत असून, अशा उपक्रमांची गरज असल्याचे मत यावेळी उपस्थितांनी व्यक्त केले.

## पुणे जिल्ह्यात उलथापालथ

**राजगुरूनगर (दै. संध्या)**

उत्तर पुणे जिल्हा भाजपचे माजी अध्यक्ष तसेच पुणे जिल्हा परिषदेचे माजी सभापती शरद बुट्टेपाटील यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष व राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) मध्ये अधिकृत प्रवेश केला. तब्बल बारा वर्षांनंतर त्यांनी पुन्हा राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये पुनरागमन केल्याने उत्तर पुणे जिल्ह्यात हा निर्णय राजकीय चर्चेचा केंद्रबिंदू ठरला असून भाजपसाठी मोठा धक्का मानला जात आहे. वराळे (ता. खेड) येथे आयोजित कार्यकर्ता मेळाव्यात हा पक्षप्रवेश सोहळा पार पडला. यावेळी माजी आमदार दिलीप मोहिते पाटील, पक्षाचे सरचिटणीस सुरेश घुले, माजी जिल्हाध्यक्ष राजेंद्र कोरेकर, पिंपरी-चिंचवड महापालिकेचे माजी महापौर योगेश बहल, पीडीसीसी बँकेचे उपाध्यक्ष सुनील चांदेरे, तालुकाध्यक्ष कैलास सांडभोर, जिल्हा दूध संघाचे संचालक अरुण चांभारे, माजी जिल्हा परिषद सदस्य अनिलबाबा राक्षे, सुरेखा ठाकर, बाजीराव जाधव, माजी सभापती चांगदेव शिवेकर, अरुण चौधरी, लक्ष्मण टोपे, कैलास लिंभोरे, अजित बुट्टे पाटील, आशिष येळवंडे, युवक तालुकाध्यक्ष जयसिंग दरेकर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.



## जुन्नरमध्ये शिवसेना (ठाकरे) – दोन्ही राष्ट्रवादीचं जमलं

**नारायणगाव (दै. संध्या)**

जुन्नर तालुक्यात आगामी जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुका राष्ट्रवादी काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस (शप) आणि शिवसेना (उबाठा) हे तिन्ही पक्ष एकत्रितपणे 'घड्याळ' या चिन्हावर लढवणार आहेत. नारायणगाव येथे खासदार डॉ. अमोल कोल्हे यांच्या जनसंपर्क कार्यालयात आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत ही महत्त्वाची घोषणा करण्यात आली. यावेळी माजी आमदार अतुल बेनके, सभापती संजय काळे आणि महाविकास आघाडीचे विविध पदाधिकारी उपस्थित होते. खासदार कोल्हे यांनी सांगितले की, पुणे आणि पिंपरी चिंचवड महानगरपालिका निवडणुकीत दोन्ही राष्ट्रवादी एकत्र लढल्याचा फायदा पक्षाला झाला आहे. याच धर्तीवर राज्यातील १२ जिल्हा परिषदांच्या निवडणुकांमध्ये मतांची विभागणी टाळण्यासाठी शरद पवार आणि अजित पवार यांनी बारामती येथील बैठकीत एकत्र लढण्याचा निर्णय घेतला आहे. समविचारी मतांचे ध्रुवीकरण रोखण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला असून, जुन्नरमध्ये महाविकास आघाडीचे पूर्ण ताकदीने काम करण्याचे नियोजन आहे. खेडमध्ये शिवसेना उबाठासोबत चर्चा सुरू असून शिरूर आणि हवेलीबाबत दोन दिवसांत अंतिम निर्णय घेतला जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. यावेळी माजी आमदार अतुल बेनके यांनी इशारा दिला की, अधिकृत उमेदवारांच्या विरोधात काम करणाऱ्या किंवा पक्षविरोधी कृती करणाऱ्या कार्यकर्त्यांवर कडक कारवाई केली जाईल. तालुक्यातील जागावाटपाचे सविस्तर सूत्र येत्या दोन दिवसांत जाहीर करण्यात येणार आहे.

# कवठे-टाकळी हाजी गटात मोठा उलटफेर

## गावडेंचा पत्ता कट, दामू घोडेंना उमेदवारी






## चौरंगी लढतीचे संकेत

या गटात आता डॉ. सुभाष पोकळे, राजेंद्र गावडे, दामू घोडे आणि बाळासाहेब डांगे हे प्रमुख चेहरे आमने-सामने येण्याची चिन्हे असल्याने लढत चौरंगी आणि अटीतटीची होण्याची शक्यता आहे.

**पिंपरखेड (दै. संध्या)**

कवठे-टाकळी हाजी जिल्हा परिषद गटाच्या राजकारणात ऐन निवडणुकीत एक मोठा आणि अनपेक्षित उलटफेर झाला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने (अजित पवार गट) शेवटच्या क्षणी इच्छुक उमेदवार राजेंद्र गावडे यांचा पत्ता कट करत, त्यांचे कट्टर राजकीय प्रतिस्पर्धी आणि शरदचंद्र पवार गटाकडून इच्छुक असलेले दामू अण्णा घोडे यांना थेट उमेदवारी निश्चित केली आहे. या निर्णयामुळे माजी आमदार पोपटराव गावडे यांना मोठा राजकीय धक्का बसला आहे. संपूर्ण 'बेट' भागातील राजकारण ढवळून निघाले आहे. या अनपेक्षित खेळीमुळे माजी आमदार पोपटराव गावडे यांच्या बालेकिल्ल्याला मोठा सुरुंग लागला आहे. पुण्यात रविवारी रात्री झालेल्या वरिष्ठ नेत्यांच्या बैठकीत हा अनपेक्षित निर्णय घेण्यात आल्याची चर्चा सुरू आहे. विशेष म्हणजे, राजेंद्र गावडे यांनी प्रचाराची पहिली फेरी पूर्ण केली असतानाच त्यांची उमेदवारी कापण्यात आली. माजी आमदार पोपटराव गावडे आणि दामू घोडे यांच्यातील गेल्या चार-पाच वर्षांपासूनचे राजकीय वैर सर्वश्रुत असताना, पक्षाने थेट घोडेंच्या हाती "घड्याळ" दिल्याने राजकीय वर्तुळात आश्चर्य व्यक्त होत आहे. पक्षाने अचानक उमेदवारी कापल्याने गावडे समर्थकांना धक्का बसला आहे. 60 वर्षांच्या राजकीय कारकिर्दीत पोपटराव गावडेंसाठी हा सर्वात मोठा पेच मानला जात आहे. या गटात घडलेल्या नाट्यमय घडामोडीने मतदार संभमात पडले आहेत. जिल्हा परिषद गटात प्रचारात आघाडीवर असताना उमेदवारी नाकारली गेल्याने पोपटराव गावडे यांच्या समर्थकांमध्ये मोठी नाराजी असून, गावडेंना मतदारांची सहानुभूती मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे. शरदचंद्र पवार पक्षाचे निष्ठावान कार्यकर्ते आता "घड्याळ" चिन्हावर निवडणूक लढवणाऱ्या दामू घोडेंचे काम करणार का? इतर उमेदवारांना पाठिंबा देणार हा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. बेट भागातील या जिल्हा परिषद गटात या अनपेक्षित राजकीय घडामोडींमुळे कवठे-टाकळी हाजी गटातील निवडणूक आता प्रतिष्ठेची बनली आहे. या अनपेक्षित घडामोडीनंतर माजी आमदार पोपटराव गावडे यांनी जिल्हा परिषद गटातील प्रमुख कार्यकर्त्यांची तातडीची बैठक घेतली, त्यामध्ये ते भाजपमध्ये प्रवेश करण्याचे संकेत मिळत आहेत. पोपटराव गावडे यांचे विश्वासू सहकारी आर. बी. गावडे यांनी बुधवारी भाजपचा झेंडा हातात घेऊनच उमेदवारी अर्ज दाखल करण्यास जाणार असल्याचे सांगितल्याने गावडे गट भाजपमध्ये प्रवेश करणार, याबाबत चर्चा रंगू लागल्या आहेत. राजेंद्र गावडे यांनी सांगितले की, निवडणुका येतात जातात, पण शेवटपर्यंत मी जनतेसाठी लढत राहीन. पोपटराव गावडे यांनीही पक्षांतराचा निर्णय सर्वांच्या मताने घेतला जाईल, असे स्पष्ट केले. भाजप सत्तेत असून मुख्यमंत्री आपले मित्र असल्याचे वक्तव्य केल्याने त्यांच्या भाजपप्रवेशाची शक्यता अधिकच बळावली आहे. माजी मंत्री दिलीप वळसे पाटील यांच्याबरोबर सातत्याने ठाम भूमिका घेणारे माजी आमदार पोपटराव गावडे यांनी पुढील दिशा ठरविण्यासाठी बेट भागातील सर्व कार्यकर्त्यांची यांची तातडीची बेठक बोलावून संवाद साधला असून, आता कोणती भूमिका घेणार आणि राजेंद्र गावडे अपक्ष शड्डू ठोकणार, की इतर पक्षांच्या चिन्हावर निवडणूक लढवणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...

### रंगसखा वॉटर कलर पेंटिंग प्रदर्शनाचे आयोजन

पुणे (दैनिक संध्या) : मुळच्या विंग कमांडर (निवृत्त) आणि चित्रकार डॉ.मेधा देशपांडे यांच्या रंगसखा या पेंटिंग प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. हे प्रदर्शन 27 जानेवारी 2026 ते 2 फेब्रुवारी 2026 दरम्यान औंध येथील फेज 1 रोड येथील सनगार्ड बिल्डिंग,वेस्ट एंड सेंटर 1 मधील पीएनजी अॅन्ड सन्स येथे सकाळी 11 ते रात्री 8 दरम्यान सुरू राहणार आहे. या प्रदर्शनात निसर्गाने प्रेरित एकूण 25 वॉटर कलर पेंटींग्स प्रदर्शित केली जाणार आहेत. निसर्ग,लँडस्केप आणि शिल्पकला या प्रकारातील सुंदर पेंटिंग्स प्रेक्षकांना पाहायला मिळणार आहेत.

### रस्ते अपघातांचे प्रमाण कमी करण्यासाठी गृह विभागाचे मोठे पाऊल ! 923 कोटी मंजूर

अमरावती (दैनिक संध्या) : राज्यातील रस्ते अपघातांचे प्रमाण कमी करण्यासाठी आणि वाहतूक व्यवस्थेत सुसूत्रता आणण्यासाठी गृह विभागाने एक मोठे पाऊल उचलले आहे. महाराष्ट्रातील ३६ जिल्ह्यांमधील एकूण २१,४०० किमी लांबीच्या रस्त्यांवरील ८६१ अपघातप्रवण क्षेत्रांवर 'ब्लॅक स्पॉट्स' आता 'इंटिग्रेटेड ट्रॅफिक मॅनेजमेंट सिस्टीम' कार्यान्वित केली जाणार आहे. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी ९२३.०५ कोटी रुपयांच्या खर्चाला गृह विभागाने प्रशासकीय मान्यता दिली आहे. या प्रणालीचे वैशिष्ट्य म्हणजे ही पूर्णपणे बिनतारी वायरलेस तंत्रज्ञानावर आधारित असेल. यासाठी ४ जी आणि ५ जी मोबाइल तंत्रज्ञानाचा वापर केला जाणार आहे.

पश्चिम महाराष्ट्र व कोकण : पुणे, नाशिक, सातारा, कोल्हापूर यांसारख्या शहरांसाठी ३१५.५४ कोटी

मराठवाडा : छ. संभाजीनगर, नांदेड, लातूर आणि जळगावसह इतर जिल्ह्यांसाठी ३१४.९६ कोटी

विदर्भ : नागपूर, अकोला, अमरावती आणि चंद्रपूर या भागातील यंत्रणेसाठी २३२.५५ कोटी

विद्युत ऊर्जेसाठी सौरऊर्जेचा किंवा उपलब्ध स्रोतांचा वापर केला जाईल. यामुळे रस्ते सुरक्षेवर रिअल-टाइम लक्ष ठेवणे शक्य होणार आहे. सर्वोच्च न्यायालयाने रस्ते सुरक्षेबाबत दिलेल्या निर्देशांनुसार स्थापन करण्यात आलेल्या रस्ते सुरक्षा निधी नियंत्रण समिती"ने या प्रकल्पाचा प्रस्ताव तयार केला होता. दरम्यान, या प्रकल्पाची व्याप्ती मोठी असल्याने त्याचे विभाजन तीन मुख्य विभागात करण्यात आले आहे. या यंत्रणेद्वारे प्रामुख्याने मोकळ्या महामार्गावर वेगमर्यादा ओलांडणाऱ्या 3 वाहनांवर आपोआप कारवाई होईल. विरुद्ध दिशेने वाहन चालविणाऱ्यांमुळे होणारे अपघात रोखण्यासाठी 'रियल टाइम अलर्ट' मिळतील. तथा नियमांचे उल्लंघन झाल्यास थेट वाहनधारकाच्या मोबाइलवर आणि नियंत्रण कक्षात माहिती दिली. या अद्ययावत प्रणालीमुळे अतिवेग, चुकीच्या दिशेने वाहन चालवणे आणि वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कडक नजर ठेवता येईल, ज्यामुळे मृत्यूचे प्रमाण घटण्यास मदत होईल. संपूर्ण प्रकल्पाच्या वीज जोडणीसाठी स्वतंत्र ६० कोटींची तरतूद करण्यात आली आहे. विदर्भातील राष्ट्रीय महामार्ग, राज्य महामार्ग आणि महत्त्वाच्या जिल्हा मार्गावरील अशा ठिकाणांची निवड करण्यात आली आहे, जिथे अपघातांचे प्रमाण सर्वाधिक आहे. यासाठी अपघातांची जास्त संख्या असणारे मार्ग आणि जिल्ह्यांची निवड केली जाणार आहे. सबंधित जिल्ह्याला निधी देऊन यंत्रणा कार्यान्वित केली जाणार आहे.

### जन्मापासूनच वडिलांसोबत राहात नसलेल्या मुलाला लागणार आईची जात?

नागपूर (दैनिक संध्या) : जन्म झाल्यापासूनच वडिलांसोबत राहत नसलेल्या मुलाला आईची कागदपत्रे विचारात घेऊन जात वैधता प्रमाणपत्र जारी करण्यावर निर्णय घ्या, असा आदेश नागपूर खंडपीठाने भंडारा जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीला दिला. याकरिता समितीला २० फेब्रुवारीपर्यंत मुदत दिली. मुलाचे आई-वडील त्याच्या जन्मापूर्वीच विभक्त झाले. त्यामुळे तो जन्मापासून आईसोबत राहत आहे. वडिलांचा त्याच्या पालनपोषणाला काहीच हातभार लागला नाही. आईनेच कष्ट करून त्याला लहानाचे मोठे केले. उच्चशिक्षणाकरिता पात्र केले. मुलाचे वडील मध्यप्रदेश तर, आई महाराष्ट्रातील रहिवासी आहे. दोघेही लोहार जातीचे असून ही जात या दोन्ही राज्यांमध्ये भटक्या जमाती प्रवर्गामध्ये मोडते. असे असताना वडिलांच्या जातीची कागदपत्रे सादर केली नाही, या कारणामुळे जात प्रमाणपत्र पडताळणी समितीने मुलाला लोहार-भटक्या जमातीचे वैधता प्रमाणपत्र नाकारले. ९ डिसेंबर २०२१ रोजी हा वादग्रस्त निर्णय जारी केला. परिणामी, मुलाने उच्च न्यायालयात याचिका दाखल करून या निर्णयाला आव्हान दिले होते. याचिकेवर न्यायमूर्ती मुकुलिका जवळकर व नंदेश देशपांडे यांच्यासमक्ष अंतिम सुनावणी झाली. दरम्यान, मुलाचे वकील अॅड. शैलेश नारनवरे यांनी प्रकरणातील तथ्यांकडे लक्ष वेधून जातवैधता प्रमाणपत्रासाठी वडिलांची कागदपत्रे मागणे मुलाकरिता अन्यायकारक आहे, असा दावा केला. तसेच, मुलगा वडिलांची कागदपत्रे देऊ शकत नाही.

# मुंबईचा महापौर बसवण्याचे 'उबाठा' चे स्वप्न धुळीला मिळाले

**भाजपा माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन यांचा प्रहार**

मुंबई (दै. संध्या)

विकास, सुशासन आणि पारदर्शकतेला मतदारांनी महापालिका निवडणुकांमध्ये भाजपा-महायुतीला स्पष्ट कौल देऊनही संजय राऊत हे अस्तित्वाच्या भीतीपोटी नाहक नगरसेवक फोडाफोडी, महापौर कुणाचा होणार यावरून संशयकल्लोळ तयार करत आहेत. मुंबईचा महापौर हिंदू, मराठी होणार असे वारंवार भाजपाच्या वरिष्ठ नेत्यांनी सांगूनही, संजय राऊत सौदेबाजी करण्याची उबाठा गटाची परंपरा कायम राखून आहेत असे शरसंधान भारतीय जनता पार्टीचे माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन यांनी मंगळवारी साधले. भाजपा प्रदेश कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. बांगला देशी घुसखोरांच्या पाठिंब्यावर, पाकच्या पाठिंब्यावर मुंबईचा महापौर बसवण्याचे उबाठा गट, विरोधकांचे स्वप्न धुळीस मिळाले अशी बोचरी टीकाही श्री. बन यांनी केली.



श्री. बन म्हणाले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात महाराष्ट्र आणि मुंबईचा विकासाचा गाडा पुढे नेण्याचे काम भाजपा महायुती करत आहे. दिल्लीत भाजपा-महायुतीचे कोणते नेते गेले यावर राऊतांनी उच्चरवात बोलण्यापेक्षा ज्या मुंबई महापालिकेत 25 वर्षे सत्तेत असतानाही उबाठा गटाला सर्वाधिक नगरसेवक निवडून आणता आले नाहीत यावर आत्मपरिक्षण करावे अशी खोचक टिप्पणी केली. भाजपा महायुतीचे नेते दिल्लीत गेले तर त्यात गैर काय आहे असा सवाल श्री. बन यांनी केला. सत्तेसाठी दिल्लीत जाऊन राहुल गांधी यांचे लांगुलचालन करणे, सोनियांच्या पायावर पक्ष अर्पण करणे या कृत्यातून उद्धव ठाकरे आणि राऊतांनी राज्याचा अपमान केला आहे.

वंदनीय बाळासाहेब ठाकरेंचे विचार, वारसा, हिंदुत्वाला तिलांजली देऊन अजान स्पर्धा घेतली, पत्राचाळ घोटाळा केल्याबद्दल बाळासाहेबांनी राऊतांना लाथा घातल्या असत्या या शब्दांत श्री. बन यांनी राऊतांवर टीकास्त्र सोडले. वंदनीय बाळासाहेब ठाकरेंचे नाव घेण्याचाही अधिकार राऊतांना नाही. त्यांच्या विचारांशी प्रतारणा करणाऱ्यांना महाराष्ट्रातील मतदारांनी महापालिका निवडणुकीत जागा दाखवली असेही त्यांनी स्पष्ट केले.

दावोसमध्ये महापौरपदाची चर्चा करण्याचे कारण नाही. महापालिका निवडणुकीत मतदारांनी भाजपा महायुतीच्या विकासाच्या धोरणाला स्पष्ट कौल देत विजयी केले आहे. भाजपा विजयाचा उन्माद कधीच करत नाही.

निकाल लागल्यानंतर मुख्यमंत्री लागलीच दावोसमध्ये गेले. महाराष्ट्रात जास्तीत जास्त परकीय गुंतवणूक आणणे हेच त्यांचे ध्येय आहे. राज्यात जर दावोस भेटीतून थेट परकीय गुंतवणुकीचा ओघ येत असेल तर राऊतांना पोटदुखी का व्हावी असा खोचक सवाल श्री. बन यांनी केला.

## आगामी केंद्रीय अर्थसंकल्पासाठी AMCCIE कडून विविध मागण्या

पुणे (दै. संध्या)

■ पंतप्रधान व अर्थमंत्र्यांना सविस्तर पत्र





आगामी केंद्रीय अर्थसंकल्पाच्या पार्श्वभूमीवर अग्रवाल मारवाडी चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज अँड एज्युकेशन (AMCCIE) यांनी देशाचे माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदी व माननीय केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांना पूर्व-अर्थसंकल्पीय मागण्यांचे सविस्तर पत्र सादर केले आहे. या पत्रात एमएसएमई, व्यापारी वर्ग, जीएसटी सुधारणा, शिक्षण, उत्पादन क्षेत्र, स्टार्टअप्स, रिअल इस्टेट, रत्न व आभूषण उद्योग तसेच रोजगारनिर्मिती या प्रमुख मुद्द्यांवर ठोस मागण्या मांडण्यात आल्या आहेत.

AMCCIE च्या वतीने बोलताना श्री राजेश अग्रवाल, राष्ट्रीय अध्यक्ष, AMCCIE यांनी सांगितले की, येणारा अर्थसंकल्प विकासाभिमुख, व्यापारी-हितैषी आणि किमान अनुपालनाचा असावा. अशा धोरणांमुळे "विकसित भारत" या राष्ट्रीय संकल्पनेला बळ मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

या मागण्यांना AMCCIE चे राष्ट्रीय उपाध्यक्ष श्री नरेंद्र गोयल, संचालक श्री कमलराज बन्सल, संचालक श्री उमेश मंडोत तसेच चेंबरचे सर्व संचालक व सदस्य यांनी पाठिंबा दर्शविला आहे.

**AMCCIE च्या प्रमुख अर्थसंकल्पीय मागण्या**

जीएसटी सुधारणा : जीएसटी प्रणाली केवळ 0%, 5% आणि 10% अशा तीन स्लॅबमध्ये मर्यादित ठेवावी व 18% आणि 28% स्लॅब रद्द करावेत. लघु व्यापाऱ्यांसाठी त्रैमासिक जीएसटी रिटर्न आणि जलद रिफंड प्रणाली लागू करण्याची मागणी करण्यात आली आहे.

रत्न व आभूषण उद्योग : मोठ्या प्रमाणावर रोजगारनिर्मिती व निर्यातीत योगदान देणाऱ्या या उद्योगासाठी जीएसटी दर फक्त 1% ठेवावा, अनुपालन प्रक्रिया सुलभ करावी आणि निर्यातस्नेही धोरणे राबवावीत, अशी ठाम मागणी करण्यात आली आहे.

एमएसएमई व लघु व्यापारी : ₹5 कोटींपर्यंत हमीविना कर्ज, व्याज अनुदान, एमएसएमई टर्नओव्हर मर्यादा वाढवणे आणि अनुपालनाचा भार कमी करण्याची आवश्यकता अधोरेखित करण्यात आली आहे.

मॅन्युफॅक्चरिंग व 'मेक इन इंडिया' : पारंपरिक उद्योगांना PLI योजनांमध्ये समाविष्ट करणे, वीजदर कमी करणे, तांत्रिक उन्नतीसाठी भांडवली अनुदान आणि सिंगल विंडो क्लिअरन्स प्रणाली लागू करण्याची मागणी करण्यात आली आहे.

शिक्षण व कौशल्य विकास : कमी व्याजदरातील शैक्षणिक कर्ज, कौशल्य विकासासाठी करसवलती तसेच खाजगी व सामुदायिक शिक्षण संस्थांना शासकीय पाठबळ देण्यावर भर देण्यात आला आहे.

स्टार्टअप्स व उद्योजकता: स्टार्टअप इंडिया अंतर्गत करसवलतीचा कालावधी 10 वर्षांपर्यंत वाढवणे, एंजेल टॅक्स पूर्णपणे रद्द करणे आणि टियर-2 व टियर-3 शहरांतील स्टार्टअप्ससाठी विशेष निधी उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली आहे.

## टायटनच्या Edge ब्रँडकडून 'Fumage' चे अनावरण

पुणे (दै. संध्या)

टायटनच्या प्रीमियम घड्याळ ब्रँड Edge by Titan ने 'Fumage' या नव्या कलेक्शनचे अनावरण केले आहे. नवीन भूमिती, पुनर्रचित सिरेमिक ब्रेसलेट आणि फ्युमे (fumé) डायलसह सादर झालेले हे घड्याळ Edge पोर्टफोलिओमधील तीन वर्षांनंतरचे पहिले नवीन सिरेमिक केस आहे. हे लाँच ब्रँडसाठी एक महत्त्वाचा टप्पा ठरून, अधिक स्लीक प्रोफाइल, टिकाऊ केस आर्किटेक्चर आणि हाताने तयार केलेल्या ग्रेडियंट डायलसह साहित्याच्या दिशेतील बदल अधोरेखित करते. धुराच्या तरल हालचालींनी प्रेरित झालेली Fumage ची रचना नियंत्रित अराजक (Controlled Chaos) ही संकल्पना मांडते. जिथे हालचाल आहे, पण ती अचूकतेत बांधलेली आहे. Edge ची ओळख असलेली पातळ, मिनिमल आणि आधुनिक शैली जपतानाच, या नव्या कलेक्शनमध्ये अधिक



धारदार दृष्टीकोन आणि जिवंतपणा दिसून येतो. नवीन केस आर्किटेक्चर आणि इंटिग्रेटेड सिरेमिक ब्रेसलेटमुळे घड्याळाचा ग्लॉसी सिलुएट अधिक ठसठशीत झाला आहे. सॅटिन फिनिश बेझल, पॉलिश्ड बेव्हल्स आणि सिरेमिक लिंक्समुळे प्रकाशाचा नियंत्रित खेळ दिसून येतो. ही रचना दैनंदिन वापरासाठी टिकाऊ असतानाच मनगटावर उठून दिसणारी आहे. फ्युमे डायल मल्टी-स्टेज लॅकरिंग प्रक्रियेद्वारे तयार करण्यात आला असून, कडेला गडद आणि मध्यभागी उजळ असा ग्रेडियंट इफेक्ट धुराच्या हालचालींचे कलात्मक रूपांतर करतो.

## मेळघाट कुपोषण बळींवरून हायकोर्ट सरकारवर नाराज

मुंबई (दै. संध्या)

मेळघाटात कुपोषणाने अर्भके, गर्भवती आणि स्तनदा मातांचे मृत्यू होत असताना या समस्येवर उपाय करण्याबाबत सरकार ठोस प्रयत्न करीत नसल्याबद्दल मुंबई उच्च न्यायालयाने सोमवारी तीव्र नाराजी व्यक्त केली. तसेच मृत्यूची मूळ कारणे शोधून त्यावर प्रभावी उपाययोजना करण्याची आणि 'झिरो टॉलरन्स' धोरण राबवण्याची सूचनाही न्यायालयाने सरकारला केली. समस्या अनेक आहेत. त्यावर मात करण्यासाठी सरकारकडे इच्छाशक्ती आणि निर्धार असायलाच हवा, अशी टिप्पणी न्या. रवींद्र घुगे आणि न्या. अभय मंत्री यांच्या खंडपीठाने केली. मेळघाटात कुपोषणामुळे होणाऱ्या मृत्यूंबाबत उच्च न्यायालयात अनेक याचिका दाखल करण्यात आल्या आहेत. त्यावर सोमवारी सुनावणी झाली.

कुपोषणामुळे अर्भके, गर्भवती महिला आणि स्तनदा माता असे ११५ हून अधिक मृत्यू झाल्याची माहिती उजेडात आल्यानंतर न्यायालयाने, 'आपल्याला तीव्र धक्का बसला आहे', असे नमूद केले. तथापि, सर्व मृत्यू केवळ कुपोषणामुळे नाही तर त्यामागे अन्य कारणे आहेत, अशी माहिती सरकारी वकिलांनी न्यायालयाला दिली. मेळघाटात बहुसंख्य मुलींचे लग्न वयाच्या १३ व्या वर्षी होते आणि त्यानंतर लगेचच त्या गर्भवती राहतात. अनेकदा अकाली प्रसूती होते. त्यातूनच वैद्यकीय गुंतागुंत निर्माण होते, असे सरकारी वकिलांनी सांगितले. गेल्या दोन-तीन दशकांपासून हे मृत्यू होत आहेत. सामान्य कारणांमुळे असे मृत्यू होऊ नयेत, यासाठी सरकारने 'शून्य सहनशीलते'चा दृष्टिकोन स्वीकारला पाहिजे, असे न्यायालयाने स्पष्ट केले.

## एलअँडटी फायनान्स लि. च्या नफ्यामध्ये ७६० कोटी रूपयांची वाढ

पुणे (दै. संध्या)

एलअँडटी फायनान्स लि. (पूर्वीची एलअँडटी फायनान्स होल्डिंग्ज लि.) या भारतातील आघाडीच्या नॉन-बँकिंग फायनान्शियल कंपनीने (एनबीएफसी) 31 डिसेंबर 2025 रोजी समाप्त झालेल्या तिसऱ्या तिमाहीत (आर्थिक वर्ष 26 ची तिसरी तिमाही) करोत्तर नफ्यामध्ये (पीएटी) 760 कोटी रूपयांच्या आतापर्यंतच्या सर्वोच्च वाढीची नोंद केली (नवीन कामगार संहिता तरतुदीच्या एक वेळच्या परिणामापूर्वी), ज्यामध्ये वार्षिक 21 टक्क्यांची वाढ झाली. नवीन कामगार संहिताच्या एक वेळच्या परिणामानंतर पीएटी आर्थिक वर्ष 26 च्या तिसऱ्या तिमाहीत 18 टक्के वाढीसह 739 कोटी रूपयांपर्यंत पोहोचला. या तिमाहीदरम्यान रिटेल बुक आकार 1,11,990 कोटी रूपयांपर्यंत पोहोचला, ज्यामध्ये वार्षिक 21 टक्के वाढ झाली.

एकत्रित कर्ज बुक वार्षिक 20 टक्के वाढीसह 1,14,285 कोटी रूपयांपर्यंत पोहोचले. कंपनीने 31 डिसेंबर 2025 रोजी समाप्त झालेल्या तिमाहीसाठी 22,701 कोटी रूपयांच्या आतापर्यंतच्या सर्वोच्च तिमाही रिटेल वितरणाची नोंद केली, ज्यामध्ये वार्षिक 49 टक्के वाढ झाली. कंपनीने टू-व्हीलर फायनान्समध्ये 3,217 कोटी रूपयांच्या आतापर्यंतच्या सर्वोच्च वितरणाची आणि फार्मर फायनान्समध्ये 2,783 कोटी रूपयांच्या वितरणाची देखील नोंद केली, ज्यामध्ये अनुक्रमे वार्षिक 33 टक्के आणि वार्षिक 12 टक्के वाढ झाली. 31 डिसेंबर 2025 रोजी रिटेलायझेशन एकूण बुकच्या 98 टक्के राहिले.

या आर्थिक निकालांबाबत मत व्यक्त करत एलटीएफचे व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. सुदिप्ता रॉयम्हणाले, "आर्थिक सेवा क्षेत्रासाठी आर्थिक वर्ष 26 ची तिसरी तिमाही अनुकूल आर्थिक घटकांच्या प्रबळ संयोजनामुळे निर्णायक ठरली आहे. जीएसटी 2.0 ची अंमलबजावणी, उत्तम मान्सून आणि रेपो दरांमध्ये कपात यामुळे वापरामध्ये वाढ झाली आणि विकासासाठी अनुकूल वातावरण निर्माण झाले. आर्थिक वर्ष 26 च्या तिसऱ्या तिमाहीत एलटीएफने व्यवसाय विभागांमध्ये उत्तम कामगिरी करण्यावर स्थिर लक्ष केंद्रित केले.

आम्ही 22,701 कोटी रूपयांच्या आतापर्यंतच्या सर्वोच्च तिमाही वितरणाची नोंद केली, ज्यामध्ये वार्षिक 49 टक्के वाढ झाली आणि रिटेल पोर्टफोलिओ 1,11,990 कोटी रूपयांपर्यंत पोहोचला, ज्यामध्ये वार्षिक 21 टक्के वाढ झाली, ज्यामुळे करोत्तर नफा वार्षिक 21 टक्के वाढीसह 760 कोटी रूपयांपर्यंत पोहोचला."

# टाटा मोटर्सकडून १७ नेक्स्ट-जनरेशन ट्रक्स लाँच

**सुरक्षितता, लाभक्षमता आणि प्रगतीसाठी नवीन मानक स्थापित केले**

कमाईची क्षमता वाढवण्यासाठी आणि मालकीचा एकूण खर्च कमी करण्यासाठी डिझाइन केलेले, टाटा मोटर्सच्या ट्रक श्रेणीमध्ये केलेले अपग्रेड्स मूर्त फायदे देतात, जे थेट नफा वाढवतात. स्मार्ट सुधारणांमुळे पेलोड क्षमता 1.8 टनांपर्यंत वाढली आहे, तर प्रगत 6.7-लिटर कमिन्स डिझेल इंजिनच्या नेतृत्वाखालील ड्राइव्हट्रेन अपग्रेडमुळे 7% पर्यंत अधिक इंधन कार्यक्षमता मिळते. या अभियांत्रिकी सुधारणांना पूरक डिजिटली सक्षम सपोर्ट इकोसिस्टम आहे, जी फ्लीट दृश्यमानता आणि अपटाइम वाढवते. फ्लीट एज प्रोयोरिटीच्या लाँचसह ग्राहकांना आता त्यांच्या फ्लीटबाबत अधिक माहिती मिळू शकते, जसे रिअल-टाइम वेईकल हेल्थबाबत माहिती, अंदाजात्मक विश्लेषण आणि ट्रिप व्यवस्थापनाला सानुकूल करण्यासाठी सल्ले.

नवी दिल्ली (दै. संध्या)

भारतातील ट्रकिंग क्षेत्रात आमूलाग्र परिवर्तन घडवून आणण्याच्या दिशेने मोठे पाऊल उचलत टाटा मोटर्स या भारतातील सर्वात मोठ्या व्यावसायिक वाहन उत्पादक व गतीशीलता सोल्यूशन्स प्रदाता कंपनीने आज आपल्या 17 ट्रक्सचा नेक्स्ट-जनरेशन पोर्टफोलिओ लाँच केला. हे ट्रक्स 7 टन ते 55 टन कन्फिग्युरेशन्समध्ये उपलब्ध आहेत. यासह सुरक्षितता, नफा व प्रगतीमध्ये नवीन मापदंड स्थापित केले आहे. या सर्वसमावेशक लाँचमध्ये ऑल-न्यू अझुरा सिरीज, अत्याधुनिक टाटा Trucks.ev श्रेणी आणि प्रस्थापित प्राइमा, सिग्ना व अल्ट्रा प्लॅटफॉर्म्समधील मोठ्या अपग्रेड्सचा समावेश आहे. जागतिक सुरक्षितता मानकांचे (ECE R29 03) काटेकोरपणे पालन करण्यासाठी डिझाइन करण्यात आलेले हे ट्रक्स उत्पन्न क्षमता वाढवतात, एकूण मालकीहक्क खर्च कमी करतात आणि वेईकल अपटाइम वाढवतात, ज्यामुळे वाहतूकदारांना मोठे यश मिळते.

नवीन ट्रक्स लाँच करत टाटा मोटर्स लि.चे एमडी व सीईओ श्री. गिरीश वाघ म्हणाले, "भारतातील ट्रकिंग क्षेत्रात झपाट्याने परिवर्तन होत आहे, ज्याला प्रगतीशील राष्ट्रीय धोरणे, आधुनिक पायाभूत सुविधा आणि सुरक्षित, अधिक स्वच्छ व अधिक कार्यक्षम लॉजिस्टिक्ससाठी वाढत्या मागणीने गती दिली आहे. टाटा मोटर्स मापदंड स्थापित करण्यामध्ये नेहमी अग्रस्थानी आहे, जे उद्योगाच्या भविष्याला आकार देतात. लाँच करण्यात आलेल्या आमच्या नेक्स्ट-जनरेशन पोर्टफोलिओमध्ये ऑल-न्यू अझुरा सिरीज, दोन प्रगत उच्च-कार्यक्षम पॉवरट्रेन्स, आमच्या नवीन आय-एमओईव्ही आर्किटेक्चरवर आधारित भारतातील शून्य-उत्सर्जन इलेक्ट्रिक ट्रक्स व ट्रिपर्सची व्यापक श्रेणी, युरोपियन मानक केबिन्स व उद्योग-अग्रणी सुरक्षितता वैशिष्ट्यांमध्ये मोठ्या प्रमाणात अपग्रेड्स, अधिक पेलोड क्षमता आणि इंधन कार्यक्षमतेचा समावेश आहे, जे सर्व फ्लीट एज डिजिटल सेवांसह एकीकृत करण्यात आले आहेत. यासह आम्ही या वारशाला अधिक पुढे नेत आहोत. 'बेटर ऑल्वेज तत्त्वामधून प्रेरित आमची नाविन्यतेप्रती अविरत मोहिम, स्थानिकीकरणाप्रती दृढ कटिबद्धता आणि ग्राहकांना यशस्वी करण्यावरील निरंतर



फोकस 'आत्मनिर्भर भारतच्या दृष्टिकोनाशी संलग्न आहेत, ज्यामुळे शाश्वत गतीशीलतेमध्ये नेतृत्व करण्याप्रती भारताचा आत्मनिर्भरपणा व महत्त्वाकांक्षा अधिक दृढ झाली आहे.

टाटा मोटर्सने ऑल-न्यू अझुरा श्रेणीला प्रदर्शित केले. ही श्रेणी इंटरमीजिएट व लाइट कमर्शियल वेईकल विभागात उच्च दर्जाची कार्यक्षमता, आरामदायीपणा आणि अपटाइम देण्यासाठी उद्देशासह डिझाइन करण्यात आली आहे. उत्पादकता, सुरक्षितता व आरामदायीपणाला चालना देण्यासाठी डिझाइन करण्यात आलेल्या अझुरामध्ये आकर्षकतेसह उद्देशपूर्ण वैशिष्ट्यांचा समावेश आहे, ज्यामुळे ड्रायव्हिंग करताना थकवा न येता उत्साहवर्धक अनुभव मिळतो.

दर्जात्मक कामगिरी व कार्यक्षमता देणाऱ्या नवीन 3.6-लिटर डिझेल इंजिनची शक्ती असलेला अझुरा विश्वसनीयता व अपटाइमसाठी नवीन मापदंड स्थापित करतो. अझुरा श्रेणी 7 टन ते 19-टन कन्फिग्युरेशन्समध्ये सादर करण्यात येईल, जी ई-कॉमर्स व एफएमसीजी वितरणापासून व्हाइट गुड्स डिलिव्हरी, बांधकाम साहित्याची वाहतूक, कृषी व औद्योगिक सामानांची वाहतूक, तसेच इंटरसिटी, मध्यम अंतराच्या व प्रादेशिक लॉजिस्टिक्सपर्यंत विविध उपयोजनांसाठी अनुकूल आहे.

टाटा मोटर्सने रस्ता सुरक्षिततेसाठी नवीन मापदंड स्थापित केले आहे, जेथे ECE R29 03 जागतिक क्रॅश सेफ्टी मानकांची (युरो क्रॅश नॉर्म्स) पूर्तता करण्यासाठी आपल्या संपूर्ण ट्रक पोर्टफोलिओसह सिग्ना, प्राइमा, अल्ट्रा आणि ऑल-न्यू अझुरा श्रेणीमध्ये सर्वसमावेशक अपग्रेड केले आहे. या ट्रक्समध्ये संपूर्ण पुढील बाजूस, रोलओव्हर व साइड-इम्पॅक्टपासून संरक्षणासाठी डिझाइन करण्यात आलेल्या केबिन्स आहेत, तसेच जवळपास भारतातील रस्त्यांना अनुसरून 23 पर्यंत प्रगत सक्रिय सुरक्षितता तंत्रज्ञान आहेत, जसे अॅडप्टिव्ह क्रूझ कंट्रोल, लेन डिपार्चर वॉर्निंग आणि कोलिजन मिटीगेशन सिस्टम्स. नेक्स्ट-जनरेशन कनेक्टेड वेईकल प्लॅटफॉर्म फ्लीट एजच्या माध्यमातून ड्रायव्हिंग वर्तणूकीवर रिअल-टाइम देखरेख सुरक्षिततेमध्ये अधिक वाढ करते, ज्यामुळे टाटा मोटर्स या प्रख्यात आंतरराष्ट्रीय मानकांची पूर्तता करणाऱ्या आपल्या ट्रक्समध्ये अधिक सुधारणा करणारी भारतातील एकमेव उत्पादक कंपनी ठरली आहे. एकत्रितपणे, हे नावीन्यपूर्ण बदल वाहतूकदारांना प्रत्येक गुंतवणुकीवर अधिक नफा मिळवण्यासाठी उत्कृष्ट पेलोडचा फायदा, लक्षणीय इंधन बचत आणि मालमत्तेचा इष्टतम वापर करून देतात. भारताच्या हरित लॉजिस्टिक्सप्रती परिवर्तनाला गती देत टाटा मोटर्सने टाटा Trucks.ev ब्रँडअंतर्गत नवीन आय-एमओईव्ही (इंटेलिजण्ट मॉड्युलर इलेक्ट्रिक वेईकल) आर्किटेक्चरवर आधारित 7 टन ते 55 टन कन्फिग्युरेशन्समधील इलेक्ट्रिक ट्रक्सचा सर्वसमावेशक पोर्टफोलिओ लाँच केला. हे ट्रक्स ई-कॉमर्स, बांधकाम व पोर्ट (बंदर) उपयोजनांमधील शाश्वत कार्यसंचालनांसाठी डिझाइन करण्यात आले आहेत.

# ...म्हणून भरत गीते यांच्यासारख्या मराठी उद्योजकांचा अभिमान

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे गौरवोद्गार; सामंजस्य करारानंतर वर्षभरात उद्योग उभारणीचे दावोस येथे कौतुक



दावोस (दै. संध्या)

"जागतिक आर्थिक परिषदेत (वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम) गेल्या वर्षी करण्यात आलेल्या ५०० कोटी रुपयांच्या सामंजस्य कराराची 'ॲल्युमिनियम मॅन ऑफ इंडिया' म्हणून ओळखले जाणारे उद्योजक भरत गीते यांनी अवघ्या एका वर्षात यशस्वी अंमलबजावणी करून प्रत्यक्ष उत्पादन सुरू केले आहे. वर्षभरात उद्योग उभारणी करणाऱ्या गीते यांच्यासारख्या मराठी उद्योजकांचा मला अभिमान वाटतो," असे गौरवोद्गार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काढले.

दावोस येथे सुरु असलेल्या जागतिक आर्थिक परिषदेत देवेंद्र फडणवीस आणि भरत गीते यांच्यातील संवादावेळी ते बोलत होते. या भेटीदरम्यान उद्योग उभारणीतील नियोजन, वेगवान अंमलबजावणी, प्रशासन आणि उद्योजकांमधील समन्वय तसेच उत्पादन क्षेत्राचे अर्थव्यवस्थेतील वाढते महत्त्व यावर सविस्तर चर्चा झाली. 'आत्मनिर्भर भारत', 'मेक इन इंडिया' आणि 'व्होकल फॉर लोकल' या केंद्र सरकारच्या उपक्रमांना बळ देणाऱ्या या उपक्रमांतून कमी कालावधीत उद्योग उभारणी शक्य असल्याचा प्रेरणादायी संदेश देशभरातील उद्योजकांना मिळाला आहे. देवेंद्र फडणवीस म्हणाले, "अहिल्यानगर जिल्ह्यातील सुपा एमआयडीसी येथे उभारण्यात आलेल्या 'तौरल इंडिया'च्या अत्याधुनिक ॲल्युमिनियम कास्टिंग्ज उत्पादन प्रकल्पाने अल्पावधीतच उत्पादन सुरू करत राज्यासमोर आदर्श औद्योगिक मॉडेल उभे केले आहे. या प्रकल्पामुळे परिसरातील स्थानिक तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या असून, स्थानिक औद्योगिक विकासाला मोठी चालना मिळाली आहे."

"सामंजस्य करार कागदापुरता न राहता एका वर्षात प्रत्यक्ष उत्पादनात रूपांतरित होऊ शकतो, याचे भरत गीते आणि तौरल इंडिया हे उत्तम उदाहरण आहे. मराठी उद्योजकांमध्ये जागतिक स्तरावर स्पर्धा करण्याची क्षमता आहे. त्यांना योग्य धोरणात्मक पाठबळ दिल्यास महाराष्ट्र उद्योग क्षेत्रात नवे शिखर गाठेल," असा विश्वासही मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केला.

भरत गीते म्हणाले, "तौरल इंडियाने २०१६ पासून औद्योगिक विस्तार करत ऊर्जा क्षेत्र, संरक्षण उत्पादन, आरोग्य उपकरणे तसेच एरोस्पेस क्षेत्रासाठी आवश्यक अचूक ॲल्युमिनियम कास्टिंग्ज निर्मितीत भरीव योगदान दिले आहे. विविध क्षेत्रांतील या योगदानामुळे राज्याच्या औद्योगिक प्रगतीला बळ मिळत असून, आर्थिक वाढीस हातभार लागत आहे.

"उत्पादन क्षेत्र हे मजबूत अर्थव्यवस्थेचा कणा असून, वाहन उद्योग, अभियांत्रिकी, पायाभूत सुविधा, इलेक्ट्रॉनिक्स, इलेक्ट्रिक मोबिलिटी, संरक्षणपूरक उद्योग, कृषी प्रक्रिया आणि उच्च-मूल्य निर्यातक्षम उत्पादन क्षेत्र मजबूत झाल्यास राज्याचा औद्योगिक पाया अधिक भक्कम होईल," असा विश्वास गीते यांनी व्यक्त केला.



# अठरापगड जातींचे कार्यकर्ते रा.स्व. संघात सक्रियपणे कार्यरत

■ सुहास हिरेमठ

■ श्री देवदेवेश्वर संस्थान अंतर्गत सारसबाग मंदिरातील श्री सिद्धिविनायक देवतेचा वार्षिक महोत्सवात व्याख्यानाचे आयोजन

पुणे (दै. संध्या)

संघावर करण्यात येणाऱ्या आरोपांपैकी एक महत्त्वाचा आरोप म्हणजे संघ हे केवळ ब्राह्मणांचे संघटन आहे, असा पसरवलेला गैरसमज. आजही अनेक गावांमध्ये हा समज आढळतो. प्रत्यक्षात संघाचे कार्य हे संपूर्ण समाजासाठी असून, संघामध्ये सर्व जाती-धर्मांचे कार्यकर्ते सुरुवातीपासूनच कार्यरत आहेत. महात्मा गांधींच्या हत्येनंतर समाजात ब्राह्मणद्वेष उफाळून आला आणि त्याचा फटका संघालाही बसला. नथुराम गोडसे आणि गांधीहत्येशी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा कोणताही संबंध नव्हता, तरीही २०१४ पर्यंत संघाविरुद्ध अपप्रचार सुरूच राहिला. मात्र आज परिस्थिती बदलली असून, अठरापगड जातींचे कार्यकर्ते संघात सक्रियपणे कार्यरत आहेत, असे मत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जेष्ठ प्रचारक आणि केंद्रीय कार्यकारणी सदस्य सुहास हिरेमठ यांनी व्यक्त केले.


श्री देवदेवेश्वर संस्थान अंतर्गत सारसबाग मंदिरातील श्री सिद्धिविनायक देवतेचा वार्षिक महोत्सवाच्या पहिल्या दिवशी सुहास हिरेमठ यांचे 'राष्ट्रीय स्वयंसेवक संघ: आक्षेप आणि वास्तव' या विषयावर व्याख्यान झाले. यावेळी श्री देवदेवेश्वर संस्थानचे प्रमुख विश्वस्त रमेश भागवत, संस्थानचे विश्वस्त सुधीर पंडित, पुष्कर पेशवा, जगन्नाथ लडकत, आशिष कुलकर्णी उपस्थित होते. सुहास हिरेमठ म्हणाले, राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर प्रसारमाध्यमे व काही राजकीय प्रवाहांकडून सातत्याने अपप्रचार केला गेला आहे. अनेक वेळा स्वतः संघात सहभागी होता न आल्यामुळे किंवा वैचारिक मतभेदांमुळे संघावर टीका केली जाते. राजकीय स्वार्थासाठी मतपेटीच्या गणितात, संघाला लक्ष्य केले जाते. त्यामुळे संघावरील जुने आरोप आता कालबाह्य ठरत आहेत. संघाबाबत आणखी एक गैरसमज म्हणजे संघात महिलांना स्थान नाही किंवा संघ महिला-विरोधी आहे. प्रत्यक्षात उत्कृष्ट आणि संस्कारित माणसे घडवणे हे संघाचे प्रमुख कार्य आहे. याच विचारातून १९३६ साली राष्ट्रसेविका समितीची स्थापना करण्यात आली. आज अनेक कार्यक्रमांमध्ये पुरुषांपेक्षा महिलांची उपस्थिती अधिक असते, हे संघाच्या कार्याचा जिवंत पुरावा आहे.

ते पुढे म्हणाले, ब्रिटिशांनी हिंदू समाजाला एका सांप्रदायिक चौकटीत अडकवण्याचा प्रयत्न केला. मुस्लिम आणि ख्रिश्चन हे एकेश्वरवादी धर्म आहेत; त्यांची ठराविक देवकल्पना, एक ग्रंथ आणि एकसंध उपासना पद्धती आहे. मात्र हिंदू समाज तसा नाही. हिंदू हा एक देव, एक पूजा पद्धत किंवा एक ग्रंथ यापुरता मर्यादित नाही. हिंदू समाजात देवपूजा करणारेही हिंदू आहेत आणि देवपूजा न करणारेही हिंदू आहेत. धर्म आणि संप्रदाय यामध्ये मूलभूत फरक आहे. संप्रदाय विशिष्ट श्रद्धा व उपासना पद्धतींवर आधारित असतो, तर हिंदू ही केवळ धार्मिक ओळख नसून एक व्यापक राष्ट्रीय ओळख आहे. हिंदू हा शब्द पूजा पाठाशी संबंधित नाही तर ते राष्ट्रीयत्व आहे.

जगन्नाथ लडकत यांनी सुहास हिरेमठ यांचा परिचय करून दिला.

# कारचालक महिलेनं ३४ वर्षांच्या तरुणाला दोन किमी फरफटत नेलं

पुणे (दै. संध्या)



संगमवाडी ते येरवडा रस्त्यावर किरकोळ अपघातानंतर कारचालक महिलेने एकाला फरफटत नेले. याबाबतचा व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर पोलिसांनी कारचालक महिलेला अटक केली. याप्रकरणी कारचालक महिला मेरसेदे रसुलीफर (वय ४५) हिला अटक करण्यात आली. या घटनेत राम लक्ष्मण राठोड (वय ३४) हे जखमी झाले आहेत. याप्रकरणी लक्ष्मीनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे, अशी माहिती लक्ष्मीनगर पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक रवींद्र कदम यांनी दिली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मोटारचालक महिला शनिवारी (दि.१७ जानेवारी) येरवड्यातील सादलबाब दर्गा रस्त्याने संगमवाडीकडे निघाली होती. त्या वेळी तेथून निघालेल्या कारचालक राम राठोड याच्याबरोबर किरकोळ अपघातानंतर वाद झाला. राठोड याने कार थांबवून कारचालक महिला मेरसेदे हिला कारमधून बाहेर येण्यास सांगितले. मात्र, तिने कार सुरूच ठेवली. कारच्या समोर राठोड थांबले. कार सुरू ठेवल्याने राठोड यांनी मोटार अडविण्याचा प्रयत्न केला. कारचालक महिलेने कार तशीच पुढे नेली. प्रसंगावधान राखून राठोड यांनी बोनेट धरून ठेवले. मेरसेदे हिने कार दोन किलोमीटर पुढे नेली. या घटनेची चित्रफित प्रसारित झाल्यानंतर तिला अटक करण्यात आली.

# पिसर्वे येथे बँक ऑफ इंडियाकडून पत्रकार व महिलांचा सन्मान

पुरंदर (दै. संध्या)



नुकताच झालेला ६ जानेवारी रोजीचा पत्रकार दिन व मकर संक्रांतीचा सण याचे औचित्य साधून पुरंदर तालुक्यातील पूर्व भागातील बँक ऑफ इंडियाच्या वतीने परिसरातील पत्रकार व महिलांचा सन्मान करण्यात आला.

गावातील ग्रामपंचायतीच्या सभागृहात झालेल्या या कार्यक्रमास बँक ऑफ इंडियाचे शाखाधिकारी हर्षद खरात व सेवानिवृत्त बँक अधिकारी हेमंत ताकवले उपस्थित होते. महिलांना व पत्रकारांना भेटवस्तू व तिळगुळ देऊन त्यांचा यथोचित सन्मान करण्यात आला.

बँक व भागातील महिला व पत्रकार यांच्यात सुसंवाद राहावा, बँकेच्या विविध योजना जनमानसात पोहचाव्या या साठी या दोन्ही दिनाचे निमित्ताने सन्मान होत आहे असे शाखाधिकारी हर्षद खरात यांनी सांगितले. बँक ऑफ इंडिया अशा स्वरूपातील कार्यक्रम करून स्तुत्य उपक्रम राबवत आहे असे हेमंत ताकवले यांनी म्हटले आहे.पत्रकार मंगेश गायकवाड व नायगाव सोसायटीचे अध्यक्ष चंद्रकांत चौंडकर तसेच महिला ग्रामसंघाच्या अध्यक्षा शोभा जमदाडे व पुष्पा नायडू यांनीही मनोगतातून शुभेच्छा दिल्या. संदीप बनसोडे यांनी सूत्रसंचालन केले तर रुपेश वाघमारे यांनी आभार मानले. यावेळी मामा गायकवाड, हनुमंत वाघले, नितीन यादव, मुनीर शेख, दिपक धेंडे, अक्षय कोलते या पत्रकारांसह येथील समुदाय आरोग्य अधिकारी रेणुका खोडवे, आशा वर्कर प्रियंका जगताप हर्षदा कोलते, सोनाली वाघमारे, ग्रामसखी पुजा कोलते,लिपिका हेमलता केदारी, अंजली वाघमारे, सुमित्रा बनसोडे,शोभा कोलते, अश्विनी कोलते, वंदना वाघमारे, कस्तुरा कोटेलगी व अन्य महिला उपस्थित होत्या.

# मोठ्या पडद्यावर 'सुड शकारंभ'ची ठसठशीत छाप

## ज्योती पाटील प्रस्तुत आणि राजनील फिल्म प्रोडक्शन निर्मित या दमदार मांडणीला मिळतोय उत्कृष्ट प्रतिसाद !!

पुणे (दै. संध्या)



सत्तेच्या संघर्षातून जन्माला आलेली आणि सूडाच्या आगीत आकार घेतलेली कहाणी आता प्रेक्षकांसमोर अखेर उलगडली आहे. ज्योती पाटील प्रस्तुत आणि राजनील फिल्म प्रोडक्शन निर्मित मराठी ॲक्शन-ड्रामा-थ्रिलर 'सुड शकारंभ' हा सिनेमा १६ जानेवारी २०२६ रोजी महाराष्ट्रभर प्रदर्शित झाला असून, प्रेक्षकांकडून या चित्रपटाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

ग्रामीण राजकारणाचं भयावह प्रतिबिंब आणि मानवी स्वभावातील बदल प्रभावीपणे मांडल्यामुळे, हा चित्रपट प्रदर्शित होताच प्रेक्षकांमध्ये त्याची मोठ्या प्रमाणावर चर्चा सुरू झाली आहे.

सध्या महाराष्ट्रभरच्या चित्रपटगृहात हा सिनेमा प्रेक्षकांच्या पसंतीस उतरत असून, सिनेरसिकांकडून सकारात्मक प्रतिक्रिया मिळत आहेत. प्रेक्षकांच्या मते "या चित्रपटाची संकल्पना खूपच वेगळी आणि आजच्या काळाशी भिडणारी आहे. नव्या पिढीला विशेषतः आकर्षित करणारा विषय आहे. सुरुवातीपासून शेवटपर्यंत रहस्य आणि थराराने भरलेली कथा कुठेही सैल होत नाही. सिनेमाचा शेवट इतका धक्कादायक आहे की तो अक्षरशः मन हादरवतो. 'सुड शकारंभ' हा अनुभव मोठ्या पडद्यावरच घ्यायला हवा प्रत्येकाने थिएटरमध्ये जाऊन हा सिनेमा पाहायलाच हवा."

इतकच नव्हे तर चित्रपटाच्या प्रदर्शनादरम्यान झालेल्या एका विशेष स्क्रीनिंगला 'सुड शकारंभ'च्या कलाकारांसह संपूर्ण टीमही उपस्थित होती. या वेळी प्रेक्षकांशी थेट संवाद साधत त्यांनी चित्रपटामागील प्रवास, अनुभव आणि भावना मोकळेपणाने शेअर केल्या. प्रेक्षकांकडून मिळणारा चांगला प्रतिसाद पाहून निर्माते आणि टीम भावूक झाली होती. महाराष्ट्राच्या विविध भागांतील कलाकारांना एकत्र घेऊन असा प्रभावी सिनेअनुभव घडवता आला, याचा त्यांना विशेष आनंद असल्याचं त्यांनी नमूद केलं. चित्रपटाला मिळणाऱ्या प्रेमामागे संपूर्ण टीमची मेहनत, समर्पण आणि एकजूट कारणीभूत असल्याचं सांगत, या यशात प्रत्येक सहकाऱ्याचा वाटा अमूल्य असल्याचं त्यांनी आवर्जून अधोरेखित केलं.

या सिनेमात मनीषा मोरे, आयुष उलघडे, ओम पानस्कर, सुनील सूर्यवंशी, ऐश्वर्या मल्लिकार्जुन, सोनाली घाडगे, सलोनी लोखंडे, राज साने आणि मारुती केंगार यांच्या दमदार अभिनयामुळे प्रत्येक पात्र स्वतंत्र ठसा उमटवतं. विकी वाघ यांच्या संगीत आणि पार्श्वसंगीताने कथेला अधिक तीव्रता मिळाली असून, मनीष राजगिरे, हर्षवर्धन वावरे, विकी वाघ आणि मयुरी जाधव यांच्या स्वरांनी गाण्यांना भावनिक खोली लाभली आहे.

# शिरूर तालुक्यात अवैध धंद्यांचा सुळसुळाट

कवठे येमाई (दै. संध्या)

शिरूर शहरासह तालुक्यातील ग्रामीण भागातील बहुतांश गावांमध्ये अवैध दारूधंदे, गुटखा व अमली पदार्थांची खुलेआम विक्री सुरू असल्याचे उघड वास्तव समोर येत आहे. याकडे पोलिस व राज्य उत्पादन शुल्क विभाग जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. दोन दिवसांपूर्वी स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेच्या पोलिस पथकाने तब्बल दोन कोटी रुपयांचे अमली पदार्थ जप्त करत मोठी धडक कारवाई केली. या कारवाईचे सर्वत्र कौतुक होत असले, तरी दुसरीकडे तालुक्यात अनेक ठिकाणी सुरू असलेल्या अवैध धंद्यांवर ठोस व सातत्यपूर्ण कारवाई होत नसल्याची जोरदार चर्चा रंगू लागली आहे. नागरिकांनी वारंवार तक्रारी केल्यानंतरही बहुतांश वेळा केवळ कामकाजाचा भाग म्हणून किरकोळ कारवाई केली जाते, असा आरोप नागरिकांकडून होत आहे. 'हॉटेलच्या आडोशाला दारू विक्री' असे नमूद करून छोट्या स्वरूपात गुन्हे दाखल केले जातात आणि प्रत्यक्षात हॉटेल चालक व अवैध धंदे करणाऱ्यांना अभय दिले जाते, अशीही चर्चा रंगली आहे. त्यामुळे पोलिसांना अवैध दारू, गुटखा व अमली पदार्थांच्या विक्रीची माहितीच नाही की जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जाते का, असा सवाल नागरिक उपस्थित करत आहेत. दरम्यान, टाकळी हाजी पोलिस दूरक्षेत्राच्या हद्दीतील कवठे येमाई येथे अवैध दारू विक्री होत असल्याची गोपनीय माहिती मिळाल्यानंतर रविवारी (ता. १८) पोलिस पथकाने छापा टाकला. हॉटेल साईरामच्या आडोशाला दारू विक्री करणाऱ्यावर कारवाई करत अवघ्या ४८० रुपयांची दारू जप्त केली. याप्रकरणी तुकाराम महादेव आवारे (रा. कवठे येमाई, ता. शिरूर) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला. मात्र, या कारवाईनंतरच उलट सुलट चर्चेला अधिक उधाण आले आहे. दरम्यान, अवैध दारूमुळे अनेक कुटुंबांचे संसार उद्ध्वस्त झाले आहेत.

याबाबत उपविभागीय पोलिस अधिकारी प्रशांत ढोले यांची प्रतिक्रिया जाणून घेण्याचा प्रयत्न केला असता त्यांनी कामानिमित्त बाहेर असल्याचे सांगितले त्यामुळे प्रतिक्रिया मिळाली नाही. एका व्यक्तीचा दारू पिण्याचा खर्च ५०० ते १००० रुपयांपर्यंत जातो.

## थोडक्यात पण महत्वाचे...

### आळंदीत 'ओळख श्री ज्ञानेश्वरीची' तर्फे राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन

आळंदी देवाची (दैनिक संध्या) : आजच्या विद्यार्थ्यांमध्ये वाढत चाललेली व्यसनाधीनता, वाईट संगत व मोबाईलचा अतिरेकी वापर लक्षात घेता मूल्याधारित शिक्षण व संस्कारांची गरज ओळखून 'ओळख श्री ज्ञानेश्वरी परिवार' यांच्या वतीने श्री ज्ञानेश्वर विद्यालय, आळंदी देवाची येथे दि. २४ व २५ जानेवारी २०२६ रोजी राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असल्याचे ज्ञानेश्वर चरीत्र समितीचे अध्यक्ष प्रकाश काळे यांनी सांगितले. आळंदी देवस्थान, श्री ज्ञानेश्वर शिक्षण संस्था, श्री ज्ञानेश्वर महाराज चरित्र समिती व संबंधित संस्थांच्या संयुक्त पुढाकारातून सुरू झालेल्या 'ओळख श्री ज्ञानेश्वरीची' या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मक बदल दिसून येत असून राज्यातील १५० हून अधिक शाळांनी हा उपक्रम स्वीकारला आहे. या उपक्रमात सहभागी शाळांतील विद्यार्थ्यांसाठी हरिपाठ पाठांतर, हरिपाठ अर्थ विवेचन तसेच 'ओळख श्री ज्ञानेश्वरीची' मुळे माझ्या जीवनावर झालेला परिणाम या विषयांवर वकृत्व स्पर्धा घेण्यात येणार आहे. स्पर्धेत महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांतील विद्यार्थी सहभागी होणार असून, विषयाची समज, भाषेची शुद्धता, विचारांची मांडणी व प्रभावी सादरीकरण या निकषांवर मूल्यमापन होणार आहे. विजेत्यांना आकर्षक पारितोषिके, सन्मानचिन्हे, प्रमाणपत्रे व रोख बक्षिसे दिली जाणार आहेत. उद्घाटन, पारितोषिक वितरण व पुस्तक प्रकाशन कार्यक्रमासाठी उपस्थित राहण्याचे आवाहन ज्ञानेश्वर शिक्षण संस्थेचे सचिव अजित वडगांवकर यांनी केले आहे.

### कामथडी-भोंगवली गटात रंगणार दिग्गजांची लढत

नसरापूर (दैनिक संध्या) : भोर तालुक्यातील कामथडी- भोंगवली या जिल्हा परिषद गटात अनेक माजी पदाधिकारी व मातब्बर नेते इच्छुक असल्याने दिग्गजांची लढत रंगणार आहे. या ठिकाणी उमेदवारी देताना पक्षाच्या नेते मंडळीची चांगलीच कसरत सुरू असून, तालुक्यातील पूर्व भागातील जनतेचे या गटाच्या उमेदवारी व होणाऱ्या लढतीकडे लक्ष लागले आहे. कामथडी, उंबरे व करंदी ही तीन गावे नव्याने समावेश होऊन जुन्या संगमनेर- भोंगवली गटाचे कामथडी- भोंगवली असे नामकरण झाले आहे. माजी आमदार दिवंगत काशिनाथराव खुटवड व राष्ट्रवादीचे प्राबल्य असलेल्या या गटाचे सन २०१७ मध्ये तालुक्यात तीन गट झाल्यावर या गटाचे विभाजन होऊन महामार्ग पट्ट्यातील गावांना घेऊन वेळू- भोंगवली असा गट तयार झाला होता. या निवडणुकीत राष्ट्रवादी व काँग्रेसला मात देत शिवसेनेने विजय मिळवला होता. तर, भोंगवली पंचायत समिती या एका गणात काँग्रेसने विजय मिळवला होता. आता गट पुन्हा पूर्व स्वरूपात झाला असल्याने याचा फायदा कोणता पक्ष उचलणार, हे पाहणे औत्सुक्याचे आहे. गटाची रचना तालुक्यातील पूर्व भागातील सारोळा ते गुणंद वाठार गावापर्यंतचा भाग, महामार्गावर कामथडी ते सारोळा हा भाग, कापूरव्होळ भोरफाटा ते वाकांबे धरण पट्ट्यातील भाग, तसेच कासुर्डी ते मोहरी हा गुंजवणी नदीलगतचा भाग, असा विस्तीर्ण मतदारसंघ आहे. कामथडी- भोंगवली गट सर्वसाधारण जागेसाठी खुला असून, गटातील भोंगवली पंचायत समितीदेखील सर्वसाधारण जागेसाठी खुली आहे, तर कामथडी पंचायत समितीसाठी सर्वसाधारण महिला राखीव आहे. तालुक्याचे सभापतिपद सर्वसाधारण महिलेसाठी राखीव असल्याने या कामथडी गणास महत्त्व आहे.

# पुरंदरच्या भूमिपुत्रांना विश्वासात घेतल्याशिवाय टोलनाका सुरू करू देणार नाही

## राष्ट्रवादी, संभाजी ब्रिगेड सह विविध संघटनांचा इशारा




जेजुरी (दै. संध्या)

पुणे -पंढरपूर राष्ट्रीय महामार्ग क्र.९६५ वरील तक्रारवाडी (ता. पुरंदर) येथे निर्माण करण्यात आलेला टोलनाक्याबाबत राष्ट्रवादी जेजुरी शहर, संभाजी ब्रिगेड, बहुजन हक्क परिषदेच्या वतीने राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण विभागाला निवेदन देण्यात आले असून महामार्गावरून प्रवास करणाऱ्या वाहनांकडून टोलवसुली सुरू करण्यापूर्वी पुरंदर मधील आजूबाजूच्या गावातील नागरिकांना विश्वासात घेऊन त्यांच्यासमवेत चर्चा करून टोलनाका सुरू करा अन्यथा स्थानिक ग्रामस्थ आंदोलनात्मक पवित्रा घेतील असा इशारा निवेदनाद्वारे देण्यात आला असून राष्ट्रवादी कांग्रेस पार्टी (अजित पवार गट ) जेजुरी शहराध्यक्ष रमेश लेंडे, बहुजन हक्क परिषदेचे शहराध्यक्ष यशवंत दोडके, संभाजी ब्रिगेडचे शहराध्यक्ष तथा देवसंस्थानचे माजी अध्यक्ष संदीप जगताप, माजी विश्वस्त शिवराज झगडे, मनसे तालुकाध्यक्ष उमेश जगताप आदींनी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण विभागाकडे निवेदनाद्वारे मागणी केली आहे, तसेच या निवेदनाची प्रत जेजुरी पोलीस ठाण्यासह संबंधित टोलनाका व्यवस्थापनाला देण्यात आली आहे, या निवेदनात म्हटले आहे की, जेजुरी, वाल्हा, दौडज, साकुर्डे, रानमळा, कोथळे, धालेवाडी, पिंगोरी, मांडकी बेलसर, नाझरे, पांडेश्वर, आदी पूर्व पुरंदर मधील शेतकरी वर्गाला आपला शेतमाल घेऊन सासवड येथे जावे लागते, तसेच सर्व प्रशासकीय कार्यालये, न्यायालय, रुग्णालये सासवड या तालुक्याच्या गावी असल्याने येथील पूर्व पुरंदर मधील स्थानिक शेतकरी, व्यवसायिक, कामगार व भूमिपुत्रांना या राष्ट्रीय महामार्गशिवाय पर्याय नाही, तसेच बहुतांश भूमीपुत्रांनी आपल्या जागा व, व्यवसायाची ठिकाणे राष्ट्रीय महामार्गाच्या रुंदीकरण करण्यासाठी दिलेल्या आहेत, पुरंदरवासीयांना या टोलवसुलीमधून सवलत व माफी मिळावी यासाठी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण व टोलनाका चालकाने काही नियमावली केली आहे काय? वाहन धारकांकडून किती रक्कमेचा टोल आकारण्यात आला आहे ?यांची माहिती आजूबाजूच्या ग्रामपंचायत लोकप्रतिनिधी, व सामाजिक संस्थांच्या प्रतिनिधींना मिळावी यासाठी बैठकीचे आयोजन करण्यात यावे तोपर्यंत टोलनाका सुरू करण्यात येऊ नये अशी मागणी करण्यात आली आहे.